कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | रविवार | दि. १ नोव्हेंबर २०२६ | अंक १४६ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

इमारतीवरून पडल्याने कामगाराचा मृत्यू

नवीन पनवेल : इमारतीवरून खाली पडल्याने सत्यबाजी पाईको (५५) या कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात एकदंत इंप्रेरिया एलएलपी कंपनीच्या नाईन मेरेकी प्रोजेक्टच्या संबंधित व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, दि.२८ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास एकदंत इंप्रेरिया एलएलपी कंपनीच्या नाइन मीरेकी प्रोजेक्ट शेडूंग या इमारतीच्या बांधकामाच्या ठिकाणी सत्यबाजी पाईको हे काम करीत होते. त्यांना कोणतेही सुरक्षा उपाययोजना न पुरवता बांधकामाच्या ठिकाणी काम करण्यास लावले होते. त्यावेळी ते काम करत असताना तोल जाऊन खाली पडले.

मुलासह १८ व्या मजल्यावरून उडी

पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवडमधील डांगे चौक परिसरात महिलेने आपल्या मुलासह इमारतीच्या १८ व्या मजल्यावरून उडी मारून आयुष्य संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना शुक्रवारी (दि.३०) सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास घडली. एकता मनोज भांगड आणि माधव मनोज भांगड अशी मृत माय-लेकाची नावे आहेत. मृत महिलेचा पती हा येरवडा येथील एका आयटी कंपनीत कामाला आहे. दरम्यान, वाकड पोलिसांना महिलेने जीवन संपवण्यापूर्वी लिहलेली चिठ्ठी सापडली आहे. त्यात मृत महिलेने आपल्या भावना व्यक्त केल्या असून, तिच्या मृत्यूनंतर पतीने पुन्हा लग्न करावे आणि •➤पान २ वर

वेधक

१२ लाखांची ऑनलाइन फसवणूक

रसायनी : सोशल मीडियावर झालेल्या ओळखीचा गैरफायदा घेत मंदिराच्या कामासाठी आणि घरबांधणीसाठी आर्थिक मदत करण्याचे आमिष दाखवून खालापूर तालुक्यातील एका व्यक्तीची तब्बल १२ लाख ४० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लोधीवली येथील रिलायन्स प्रकाश सीएचएस, अंबानी हॉस्पिटलजवळ राहणाऱ्या फिर्यादी यांची फेसबुकच्या माध्यमातून आरोपी क्रमांक १ याच्याशी ओळख झाली होती. त्यानंतर आरोपीने व्हॉट्सअॅप कॉल करून मंदिराच्या कामासाठी तसेच घरबांधणीसाठी आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिले. तसेच, युरो चलनाद्वारे फिर्यादी यांच्या कॅनरा बँक खात्यात पैसे पाठविल्याचे सांगितले. मात्र, ही रक्कम खात्यात जमा झाली नसल्याने आरोपी •➤पान २ वर

शॉक बसल्याने चार गुरांचा मृत्यू

नवीन पनवेल : विजेचा तारांचा शॉक लागून तीन गुरांचा मृत्यू झाल्याची घटना दुंद्रेपाडा जवळ घडली. महावितरणच्या जीर्ण झालेल्या तारा अनेक ठिकाणी तुटत असल्याने त्याचा फटका मुक्या जनावरांना बसत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दि.३१ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास दुंद्रेपाडा गावातील रस्त्यावर विजेची तार पडल्याने त्याचा शॉक लागून रिटघर येथील सुनील भोपी आणि खैरवाडी येथील हिरामण पाटील यांच्या प्रत्येकी दोन-दोन गुरांचा मृत्यू झाला. यात दोन बैल आणि दोन गायींचा समावेश आहे. दरम्यान, महावितरणने कितीही स्मार्ट मीटर घरोघरी बसवले तरी आजही ग्रामीण भागात विजेच्या तारांची दयनीय •➤पान २ वर

गेल कंपनीत चोरीचा प्रयत्न

रायगड : अलिबाग तालुक्यातील उसर येथील गेल कंपनीमध्ये येथील कामगारांनीच कॉपर केबल चोरण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली असुन, सुरक्षा रक्षकांनी तिघांना पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. परंतु, ही घटना घडून अनेक तास उलटून गेले, तरी अद्याप गुन्हा दाखल करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांकडूनच देण्यात आली आहे. अलिबाग तालुक्यातील उसर या ठिकाणी भारताचा पहिला प्रोपेन डिहायड्रोजनेशन आणि पॉलिप्रॉपिलीन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. औद्योगिक विकासाला गती देणारा हा प्रकल्प महत्वाकांक्षी •➤पान २ वर

लिफ्ट कोसळून आठ जण जखमी

मुंबई : नालासोपारा पश्चिमेकडील पाटणकर पार्क परिसरातील एका सात मजली इमारतीमध्ये शनिवारी (दि.३१) दुपारी लिफ्ट कोसळून भीषण दुर्घटना घडली. यात ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. प्रत्यक्षदर्शी व स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास ८ जण लिफ्टमधून पाचव्या मजल्यावरून तळमजल्याच्या दिशेने येत होते; त्याचवेळी तांत्रिक बिघाडामुळे लिफ्ट वेगाने थेट खाली कोसळली. लिफ्ट कोसळल्याचा प्रचंड मोठा आवाज ऐकून इमारतीमधील नागरिक तळमजल्यावर धावले. रहिवाशांनी मोठी कसरत करून लिफ्टचा दरवाजा तोडला आणि आत अडकलेल्या जखमींना बाहेर काढले.

सदस्यांना डावलून त्रयस्थांना झुकते माप? १५ व्या वित्त आयोगावरून

जि.प. सभेत धुमश्चक्री?

■ पल्लवी भोईरांचा अध्यक्षांना घेराव, सर्वपक्षीय सदस्य आक्रमक

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि.३०) पनवेल येथील विसावा रिसॉर्टमध्ये अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. ऐन दुष्काळात रिसॉर्टमध्ये सभा घेतल्याने आधीच अडचणीत आलेल्या अध्यक्षांना ठाकरे गटाच्या सदस्यांनी जलजीवन मिशन आणि पंधराव्या वित्त आयोगाच्या निधी वितरणासह विविध विषयांवर धारेवर धरले. पंधराव्या वित्त आयोगाच्या विकासकामांच्या प्रशासकीय मान्यता आदेशांच्या मूळ प्रती त्रयस्थ व्यक्तीच्या ताब्यात गेल्याच्या मुद्द्यावरून सभागृहात जोरदार खडाजंगी झाली. शिहू गटातील ठाकरे गटाच्या जिल्हा परिषद सदस्या पल्लवी भोईर यांनी आक्रमक भूमिका घेत जि.प. अध्यक्षांना थेट जाब विचारला. त्यांच्या भूमिकेला उरणच्या सदस्या प्रेरणा पाटील यांच्यासह सर्वपक्षीय सदस्यांनी पाठिंबा दिल्याने सभा चांगलीच वादळी ठरली.



पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून स्थानिक गरजांनुसार विकासकामे सुचविण्याची जबाबदारी संबंधित गटातील निवडून आलेल्या जि.प. सदस्यांची असते. मात्र, शिहू जिल्हा परिषद गटातील सदस्यांनी अधिकृतपणे सुचविलेल्या विकासकामांच्या प्रशासकीय मान्यता आदेशांच्या मूळ प्रती त्रयस्थ व्यक्तीच्या ताब्यात कशा गेल्या? त्या व्यक्तीला हे आदेश कोणी दिले? अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता आणि अन्य प्रशासकीय प्रक्रिया करण्याचे अधिकार त्या व्यक्तीला कोणी दिले? असे सवाल पल्लवी भोईर आणि प्रेरणा पाटील यांनी उपस्थित केले. लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींना डावलून त्रयस्थ व्यक्तींच्या माध्यमातून विकासकामांच्या प्रक्रियेत हस्तक्षेप होत असेल, तर लोकप्रतिनिधींच्या अधिकारांना अर्थ काय उरतो, असा सवालही त्यांनी केला.

या प्रकरणावरून दोन्ही महिला सदस्यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष आणि भाजपच्या सभापतींना प्रश्नांचा भडिमार करीत धारेवर धरले. चर्चेदरम्यान अध्यक्षांकडून स्पष्टीकरण देण्यात आले. मात्र, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी या गंभीर मुद्द्यावर अपेक्षित भूमिका मांडली नसल्याची नाराजी काही सदस्यांनी व्यक्त केली. या चर्चेत ठाकरे गटाचे गटनेते बाबू घारे यांनीही महिला सदस्यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला. विशेष म्हणजे सत्ताधारी गटातील राष्ट्रवादीच्या सदस्या गीता जाधव, अमित नाईक यांच्यासह अन्य सदस्यांनीही या प्रश्नावर सदस्यांच्या बाजूने भूमिका घेतली. पंधराव्या वित्त आयोगातील विकासकामे सुचविण्याची प्रक्रिया संबंधित गटातील निवडून आलेल्या सदस्यांच्या शिफारशींनुसारच पार पडत आली आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या अधिकृत शिफारशींना डावलून चुकीचा पायंडा पाडू नये, अशी ठाम भूमिका सदस्यांनी मांडली.

आज एका गटातील सदस्याला डावलले जात असेल, तर उद्या सभागृहातील अन्य सदस्यांच्या अधिकारांवरही गदा येऊ शकते. हा केवळ एका सदस्याचा प्रश्न नसून संपूर्ण सभागृहाच्या लोकशाही अधिकारांचा प्रश्न आहे, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. जिल्हा परिषद अध्यक्षांच्या निर्णयप्रक्रियेबाबत नाराजी व्यक्त करीत सदस्यांनी निषेध नोंदविला. अखेर सदस्यांनी सुचविलेल्या विकासकामांच्या प्रशासकीय मान्यता आदेशांच्या प्रती संबंधित सदस्यांना सुपूर्द करण्याबाबत सभागृहात सर्वानुमते ठराव करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

चौकशीची मागणी

पंधराव्या वित्त आयोगाच्या विकास निधी प्रकरणातील मूळ प्रशासकीय मान्यता आदेशांचा ताबा कोणाकडे होता? हे आदेश कार्यालयीन अभिलेखातून बाहेर कसे गेले? त्यांचा वापर करून कोणत्या तांत्रिक अथवा प्रशासकीय प्रक्रिया करण्यात आल्या? या सर्व बाबींची अधिकृत चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी सदस्यांकडून करण्यात आली.

अनधिकृत बांधकामावर पडणार हातोडा?

बांधकामसह महसूल विभागाची हालचाल सुरु

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शासनाचे नियम धाब्यावर बसवून काही धनदांडग्यांनी सीआरझेडचे उल्लंघन करून कोळगांव आणि बागदांडा (मिळकतखार) परिसरात बांधकामे केली आहेत. या बांधकामांवर लवकरच हातोडा पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यामुळे बांधकाम विभागासह महसूल विभागाने हालचाल सुरु केली असून, बांधकाम तोडण्याचा मुहूर्त प्रशासनाकडून कधी लागणार, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

> सीआरझेडचे उल्लंघन करून अनधिकृत केलेले बांधकाम निष्कासित करण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून खर्चाचे अंदाजपत्रक मागविण्यात आले. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहे. – एम.एम. धायतडक, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

समुद्रकिनारी अलिशान बंगला असावा, असे अनेकांना वाटत असते. निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या मांडवा परिसरात जागा घेऊन बंगले, फार्महाऊस बांधण्याचा क्रेझ दिवसेंदिवस वाढत आहे. मुंबईपासून जवळ असलेल्या अलिबाग तालुक्यातील मांडवा आणि रेवस परिसरात जागा घेऊन घर आणि बंगला बांधण्यावर अनेक जण भर देत आहेत. या परिसरात बंगला बांधणे ही एक उत्तम गुंतवणूक आणि स्वप्न पुर्ण करणारी कल्पना आहे. तसेच, एक लोकप्रिय वीकेंड स्थळ म्हणून या परिसराकडे पाहिले जाते. या परिसरात ठिकठिकाणी भरावातून बांधकाम करून उंच इमारती उभारण्याचा काही धनदांडग्यांकडून •➤पान २ वर

५३.८० लाखाचे अंदाजपत्रक

सार्वजनिक बांधकाम विभागाने अनधिकृत बांधकाम निष्कसीत करण्यासाठी ५३ लाख ८० हजार ८४२ रुपयांचे अंदाजपत्रक तयार केले आहे. त्यामध्ये बांधकाम निष्कासित करण्यासाठी कोळगांवमधील ४० लाख ७३ हजार ७२४, कोळगावमधील ५ लाख ११ हजार१८१, नवेदर नवगांवमधील ९ लाख ९३ हजार ७५१ आणि मिळकतखारमधील २ हजार १८६ रुपयांच्या अंदाज पत्रकांचा समावेश आहे.

आंबोली ग्रामपंचायतीत लाखोंचा भ्रष्टाचार?

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

मुरूड तालुक्यातील आंबोली ग्रामपंचायत वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. गेल्या अनेक वर्षापासून या ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकामार्फत चालत आहे. केलेल्या कामांचा आणि खरेदी केलेल्या वस्तूंचा हिशोब देण्यास टाळाटाळ होत असून, त्यामध्ये लाखोचा भ्रष्टाचार असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते राकेश आरकशी यांनी केला आहे. याबाबत मुरूडच्या गटविकास अधिकारी राजेंद्र कुमार खताल यांच्याकडे चौकशीची मागणी करण्यात आली आहे. परंतु, त्यांच्याकडून कारवाई करण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे आंबोली ग्रामपंचायतीसह पंचायत समितीच्या प्रशासकीय कारभाराबाबत संशय वाढल्याची चर्चा सुरु आहे.



■ सामाजिक कार्यकर्ते राकेश आरकशी यांचा आरोप

■ गटविकास अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यास टाळाटाळ

> आरटीआय कार्यकर्ते राकेश आरकशी यांनी मागितलेली माहिती देण्यात आली आहे. ग्रामपंचायतीच्या कामांमध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार झाला नाही. ज्या वस्तू खरेदी केल्या त्यांची बिले उपलब्ध आहेत. त्यामुळे त्यांचे आरोप खोटे आहेत.
> – लक्ष्मण बेंदूक, ग्रामविकास अधिकारी, आंबोली

सामाजिक कार्यकर्ते राकेश आरकशी यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुरूड तालुक्यातील आंबोली ग्रामपंचायत हद्दीत आंबोली, खारआंबोली, जोसरंजन, उंडरगाव, तिसले •➤पान २ वर

ध्वजारोहणाने कुंभमेळ्याची सुरुवात

। नाशिक । प्रतिनिधी ।

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याची सुरुवात ध्वजारोहणाने करण्यात आली. या सोहळ्याला भारतीय संस्कृती, आध्यात्मिक परंपरा आणि सनातन धर्म श्रद्धेचे महापर्व मानले जाते. दोन वर्षे हा सोहळा रंगणार असून, या सोहळ्यात शनिवारी (दि.३१) महागंगा आरतीचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक सोहळ्यात राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत साडेसहा हजार आदिवासी महिला आणि पुरूष भाविकांनी या गंगा महाआरतीमध्ये सहभाग घेतला. या नयमरम्य सोहळ्याची नोंद गिनीज बुकमध्ये होणार असल्याचे म्हटले जात आहे.

नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याची सुरुवात ध्वजारोहणाने झाली आहे. यावेळी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या



प्रमुख उपस्थितीत डोळ्यांची पारणे फेडणारी महागंगा आरतीचा सोहळा रंगला. या महागंगा आरतीची नोंद गिनिज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये होणार आहे. या महागंगा आरतीचा आनंद घेण्यासाठी गोदाघाट जवळील परिसरातील शहरवासी टेरेसवर उभे राहीले होते. यावेळी नाशिक कुंभमेळ्याची सुरुवात २०२६च्या अखेरीस होणार आहे. तर, मुख्य धार्मिक आयोजन आणि अमृत स्नान २०२७ मध्ये आयोजित केले जाणार आहे. तसेच, या संपूर्ण कार्यक्रमांची सांगता २४ जुलै २०२८ रोजी होणार आहे.

इंडिया आघाडीचा प्रतिकात्मक महाभियोग

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवरून विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी ज्ञानेश कुमार निष्पक्ष नसल्याचा आरोप केला आहे. विरोधकांना निष्पक्ष निवडणूक आयोग हवा असून, देशात कथित मतचोरी होत असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. इंडिया आघाडीच्यावतीने दिल्लीतील काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी शनिवारी (दि.३१) मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमरांविरूद्ध प्रतीकारात्मक महाभियोगाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

या प्रतीकात्मक महाभियोगात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात महाभियोगाची




प्रक्रिया राबवण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह विरोधी पक्षांचे अनेक खासदार उपस्थित होते. या कार्यक्रमात मल्लिकार्जुन खरगे यांनी, केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. २०१४ पासून सत्ता मिळवण्यासाठी आणि ती टिकवून ठेवण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांचा वापर केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ते पुढे म्हणाले की, खासदारांना फोडणे, राजकीय पक्षांमध्ये फूट पाडणे आणि सरकार पाडण्याचे प्रकार झाले. याशिवाय निवडणूक रोखे, ईडी आणि सीबीआय यांचाही वापर करण्यात आला. आता मतांची चोरी केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. •➤पान २ वर

तळोज्यात लाखोंचा गुटखा जप्त

। पनवेल । प्रतिनिधी ।

तळोजा पोलिसांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकासह तळोजा येथील घोटगाव परिसरात छापा टाकून लाखोंचा माल जप्त करण्यात आला आहे. यावेळी तब्बल ६ लाख ६८ हजार १५२ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केल्याची माहिती समारे आली आहे. या कारवाईमुळे तळोजा परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, संबंधित वितरक, पुरवठादार आणि उत्पादकांचा शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तळोजा घोटगाव परिसरातील एका घरामध्ये प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याचा मोठ्या



प्रमाणात साठा करून ठेवल्याची माहिती तळाजा पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार तळोजा पोलिसांनी अन्न व औषध प्रशासन विभागाचे सुरक्षा अधिकारी सचिन आढाव आणि त्यांच्या पथकासह संबंधित घरावर छापा टाकला. तपासणीदरम्यान खोलीमध्ये विविध ब्रँडचा गुटखा, पानमसाला, सुगंधी तंबाखू, जर्दा, खैनी आणि सुगंधी सुपारी असा मोठा साठा आढळून आला. पोलिसांनी आणि अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने हा संपूर्ण माल जप्त केला.

उल्हास नदी परिसरात नीलगायचे दर्शन | प्राणीप्रेमींसह स्थानिकांमध्ये चिंतेचे वातावरण

भीमाशंकर जंगलातील प्राणी रस्त्यावर

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील भीमाशंकर अभयारण्य आणि जंगल परिसरात टोरंट प्रकल्पासाठी प्रचंड जंगलतोड करण्यात आली आहे. त्यामुळे येथील प्राणी अन्यत्र आपल्या निवाऱ्यासाठी जंगल शोधत असून, नीलगाय आणि त्याचे पिल्लू उल्हासनदी लगत असलेल्या वावे गावाच्या हद्दीत दिसून आले. त्यामुळे स्थानिक आणि प्राणीप्रेमींमधून चिंता व्यक्त केली जात आहे.

गुजरातच्या टोरंट प्रकल्पासाठी भीमाशंकर पासून काही अंतरावर असलेल्या सायडोंगरावर मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू आहे. या



वृक्षतोडीला सर्व स्तरातून विरोध होत आहे. नुकतेच विविध पक्षातील नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी येथील वृक्षतोडीची पाहणी करत सरकारवर नाराजी व्यक्त केली. शासन येथील ३२,४८० झाडे तोडणार असल्याचे म्हणत आहे. परंतु, प्रत्यक्षात मात्र येथील ३ लाख झाडे तुटणार असल्याचे स्थानिक आणि पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे. त्यामुळे या जंगल तोडीचा सर्वाधिक मोठा फटका येथील प्राणी आणि पक्षांना बसत आहे. सध्या येथील ५,००० झाडे तोडण्यात आली असून, उर्वरित २७ हजार झाडे तुटल्यानंतर येथील प्राणी आणि पक्षी कुठे राहतील, असा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, या जंगलतोडीमुळे येथील प्राणी पक्षांचा अधिवास धोक्यात आला असून, त्यांनी नव्याने आपला अधिवास शोधण्यास सुरुवात केली आहे.

नुकतीच एक नीलगाय सायंकाळच्या सुमारास टोरंट धरणासाठी जंगल तोडलेल्या ठिकाणापासून २० किलोमीटर अंतरावर वावे गावच्या हद्दीत उल्हास नदी परिसरात निदर्शनास आली. यावेळी तिच्या सोबत तिचा बछडा देखील दिसून आला. ही निलगाय भाताच्या शेतात दिसून आल्याने अनेक शेतकरी चिंतेत पडले आहेत. नुकतेच भातपीक कापणीला आले असून, निलगाय सारखे प्राणी शेतात धावले तर उभे पिक आडवे होऊन •➤पान २ वर



दिवेआगर ग्रामपंचायतीत घडलेला घटना दुर्दैवी

■ सरपंच विजय तोडणकर



। बोर्ली पंचतन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर ग्रामपंचायत कार्यालयात मंगळवारी (दि.२७) रिसॉर्टच्या असेसमेंट नोंदीवरून सरपंच आणि उपसरपंच यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली. काही व्यक्तींच्या रिसॉर्ट बांधकामांची ग्रामपंचायतीच्या असेसमेंट नोंदवहीत नोंद करण्याच्या मुद्द्यावरून दोन्ही पदाधिकारी ग्रामस्थांसमोर आमनेसामने आले. यावेळी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. परिस्थिती चिघळल्याने पोलिसांना पाचारण करण्यात आले असून, दोन्ही पदाधिकाऱ्यांनी एकमेकांविरोधात पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्याची माहिती आहे.

दिवेआगर हे रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचे पर्यटन केंद्र असून, येथे पर्यटन व्यवसायाच्या विस्ताराबरोबरच रिसॉर्ट आणि व्यावसायिक बांधकामांची संख्या वाढत आहे. अशाच काही रिसॉर्टच्या असेसमेंट नोंदी करण्याच्या प्रक्रियेवरून हा वाद निर्माण झाल्याचे समजते. ग्रामपंचायत कार्यालयातच ग्रामस्थांसमोर हा प्रकार घडल्याने उपस्थितांमध्येही आश्चर्य व्यक्त करण्यात आले. या घटनेबाबत सरपंच विजय तोडणकर यांनी आपली भूमिका मांडताना सांगितले की, सरपंचपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर सर्वांना सोबत घेऊन गावाच्या विकासाची कामे करण्याचा प्रयत्न सुरू आहे. याच काळात ग्रामपंचायतीतील काही जुन्या कामांची चौकशी सुरू केल्याने मला बदनाम करण्याच्या हेतूने हा वाद घडवून आणण्यात आला. रिसॉर्टच्या असेसमेंटचा विषय ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत मांडून त्यावर सविस्तर चर्चा करता आली असती. त्यासाठी अधिकृत व्यासपीठ उपलब्ध असताना काही ग्रामस्थांना सोबत घेऊन वाद निर्माण करण्यात आला. या प्रकाराचे व्हिडिओ चित्रित करून समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात आले. त्यामुळे माझ्यासह ग्रामपंचायतीच्या प्रतिमेलाही धक्का पोहोचला आहे. ग्रामपंचायतीच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी अधिकृत सभेचा मार्ग उपलब्ध असताना अशा प्रकारे वाद घडणे दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया सरपंच विजय तोडणकर यांनी दिली.

पर्यटनाच्या नकाशावर महत्त्वाचे स्थान असलेल्या दिवेआगर ग्रामपंचायतीतील वादाचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर या अंतर्गत वादाची चर्चा गावाच्या सीमा ओलांडून बाहेर पोहोचली आहे. गावाच्या विकासकामांसह प्रशासकीय कामकाज चालणाऱ्या ग्रामपंचायत कार्यालयातच लोकप्रतिनिधींमध्ये अशा प्रकारे वादावादी होत असल्याने दिवेआगरमधील ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

बेपत्ता तरुणांचे गूढ कायम

। रसायनी । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातून बेपत्ता दोन तरुणांचा २० दिवसानंतरही शोध न लागल्याने त्यांच्या बेपत्ता होण्याचे गुढ वाढले आहे. मूळचा नागपूरचा व नोकरीनिमित्त पुण्यात असलेला २३ वर्षीय राहुल सुमित मिश्रा हा खोपोलीतील गगनगिरी आश्रमात दर्शनासाठी आला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी गारमाळ भागात दुचाकीवरून गेला. त्यानंतर राहुलची दुचाकी मोबाईल, बॅग आणि चप्पल मॉर्निंग वाकसाठी आलेल्या नागरिकांना आढळून आली. त्यानंतर त्याचा तपास लागलेला नाही. दुसरा बेपत्ता तरुण खालापूर तालुक्यातील माजगाव येथील आहे. डोक्याने गतिमंद असलेला ४० वर्षे वयाचे योगेश गजानन जाधव कामावर जाण्यासाठी घराबाहेर पडले. परंतु, त्यानंतर ते घरी परत न आल्याने त्यांची बेपत्ता झाल्याची तक्रार खालापूर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली.



खड्ड्यांकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

नवीन पनवेलकडून पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या पुलावर सध्या मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, वाहनचालकांना या मार्गावरून प्रवास करताना कसरत करावी लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हे खड्डे धोकादायक ठरत असून, अपघाताला निमंत्रण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या पुलावरून दररोज मोठ्या संख्येने दुचाकी, चारचाकी आणि अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. मात्र, रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग अचानक कमी करावा लागतो. तसेच, खड्डे चुकवण्याच्या प्रयत्नात दुचाकीस्वारांचा तोल जाण्याची आणि मागून येणाऱ्या वाहनांशी धडक होण्याची भीती असते. रात्रीच्या वेळी हे खड्डे स्पष्टपणे दिसत नसल्याने धोका अधिकच वाढत आहे. एकीकडे शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीवर भर दिला जात असल्याचे सांगितले जाते, तर दुसरीकडे महत्त्वाच्या पुलावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या समस्येकडे पनवेल महानगरपालिका प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींचे लक्ष आहे की नाही, असा सवाल वाहनचालक आणि नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शाळेला सौर ऊर्जा पॅनलची देणगी



। तळा । प्रतिनिधी ।

तळे येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत एक स्तुत्य आणि भविष्यवेधी उपक्रम राबवण्यात आला. शाळेला सौर ऊर्जा पॅनलची सौजन्यपूर्ण देणगी मिळाली असून, त्यामुळे शाळेचा वीज प्रश्न कायमचा मार्गी लागला आहे. ही देणगी इनर व्हील क्लब ऑफ मुंबई नरीमन पॉईंट, डिस्ट ३१४ यांच्यावतीने देण्यात आली आहे. क्लबच्या अध्यक्षा कविता सोनी, सचिव शिवानी कजरिया यांसह शालिनी अग्रवाल व हेमा यांच्या माध्यमातून हा उपक्रम साकार झाला. यासाठी समाजसेवक कृष्णा महाडिक यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी केंद्र प्रमुख मुबिन वासकर, मुख्याध्यापिका सुप्रिया जामकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भास्कर गोळे यांच्यासह सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी उपाययोजना

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

सध्याच्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सिडको प्राधिकरण क्षेत्रातील विविध नोडमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करणे, पाण्याचे न्याय्य वितरण सुनिश्चित करणे आणि गैरवापर रोखणे यासाठी सिडकोने कठोर उपाययोजना केल्या आहेत. सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुदगल यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठ्याशी संबंधित समस्यांचा आढावा घेऊन त्या तातडीने सोडविण्यासाठी उच्चस्तरीय बैठकांचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत विविध उपाययोजना आखण्यात आल्या. त्यात, पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व ३४ टँकर्सवर जीपीएस प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून, त्यांच्या मार्गांवर आणि पाणी वितरणाच्या ठिकाणांवर देखरेख ठेवली जात आहे. सर्व ११ प्रमुख टँकर भरणा केंद्रांवर सीसीटीव्हा प्रणालीद्वारे देखरेख ठेवून दररोजच्या पाणी वितरणाच्या नोंदींचे निरीक्षण केले जात आहे. जीपीएस व्ह्यू आणि ओटीपी आधारित सुविधांसह सर्वसमावेशक जलपोर्टल विकसित करण्यात येत आहे. तोपर्यंत दैनंदिन माहिती अद्ययावत ठेवण्यासाठी गुगल शीटचा वापर सुरू आहे. कळंबोलीतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी सातत्याने समन्वय साधण्यात येत आहे. तसेच, नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. बांधकाम व विकासकामांसाठी विकासकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास मनाई करण्यात आली आहे.



टँकरद्वारे पुरविलेल्या पाण्याचा वापर जलतरण तलावासाठी होत असल्याचे आढळल्यास संबंधित सोसायटीचा टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा तात्काळ बंद करण्यात येईल. दक्षता विभागाकडून यापूर्वी प्राप्त तक्रारींची तपासणी सुरू असून, पाणीपुरवठ्यातील गैरप्रकार सिद्ध झाल्यास संबंधितांवर दंडात्मक व कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा उपाययोजन मांडण्यात आल्या. तसेच, नागरिकांना नियमित, पुरेसा आणि न्याय्य पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी सिडको प्रशासन कटिबद्ध आहे. नागरिकांनी आणि गृहनिर्माण संस्थांनी पाण्याचा जपून वापर करावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकतीचे मालक १.मिनाक्षी लक्ष्मण ताम्हाणे २. रोशन जगदीश हरपुडे ३. कैलास रामचंद्र ताम्हाणे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर/प्लॉट नंबर	क्षेत्रफळ चौ.मी	आकार रु. पै.
९०	ब/२६	२३१-००	२३-१०

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/११/२०२६

ॲड. समीर आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री शशिकांत दशरथ तानपाटील २) श्री.उमेश दशरथ तानपाटील ३) श्री.अशोक दशरथ तानपाटील ४) श्री.संतोष दशरथ तानपाटील ५) श्री.मनोज दशरथ तानपाटील ६) नंदा नथुराम खाडे सर्व रा. बेलखार, पो.कोकबन, ता.रोहा, जि.रायगड. यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र व उपविभाग क्र.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पै.)
कोकबन ता.रोहा	३१२	०-१८-०० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-२०-००	०.१४

सदर वर नमूद केलेली मिळकत हि या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

सही/-
अलिबाग — ॲड.शैलेश प्रभाकर पाटील
तारीख ०१/११/२०२६ — दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो.अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.

जाहीर नोटीस

दि. ३१/१०/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या मिळकती कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतींच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक रत्नाकर भालचंद्र ठाकुर रा.९८१ आठवडा बाजार, आंबेपुर, पो.पोयनाड, ता.अलिबाग जि.रायगड यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकती या निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतींच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

-: मिळकतींचे वर्णन :-

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार
तळाशेत ता.अलिबाग	२०	एकुण क्षेत्र ०-२१-००	४.८७
तळाशेत ता.अलिबाग	१९	एकुण क्षेत्र ०-०६-००	०.१२
तळाशेत ता.अलिबाग	१८	एकुण क्षेत्र ०-७६-४० पो.ख ०-०५-३० एकुण ०-८१-७०	१९.७५

भुमापन क्र.उपविभाग १८ क्षेत्र ०-८१-७० हे.आर या मिळकती पैकी रत्नकार भालचंद्र ठाकुर यांच्या हिश्यातील क्षेत्र ०-२०-०० हे आर आकार ५.१७

वर वर्णन केलेल्या मिळकती या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वर नमुद केलेल्या मिळकतीं संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतींच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्क्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे
मु.(पळी आंबेघर), पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

पान १ वरुन

मुलासह १८व्या मजल्यावरून उडी

आपले आयुष्य नव्याने उभे करावे, असे नमूद केले आहे. तसेच, मुलाच्या भविष्याबद्दल आणि आपल्या अनुपस्थितीशी तो कसा जुळवून घेईल, याबद्दलच्या तिच्या चिंतेबाबतही तिने लिहले आहे. तिच्या मृत्यूनंतर मुलगा वारंवार आईबद्दल विचारत राहील, या भीतीपोटी तिने आपल्यासोबत आपल्या मुलालाही नेण्याचा निर्णय घेतल्याचे त्या चिठ्ठीत नमूद केल्याचे समजते. तसेच, लहान मूल सोबत असल्यास पतीला दुसरे लग्न करण्यास अडचण येऊ शकते, अशी भीतीही तिने व्यक्त केली होती. पोलीस या चिठ्ठीतील मजकुराची छाननी करत आहेत.

आंबोली ग्रामपंचायतीत लाखोंचा भ्रष्टाचार?

इत्यादी गावे व वाड्यांचा समावेश आहे. या हद्दीत सुमारे ३ हजारहून अधिक लोकसंख्या आहे. या ग्रामपंचायतीवरील राजकीय कार्यकिर्द संपल्यानंतर गेल्या अडीच वर्षांपासून या ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकीय राजवटीनुसार चालत आहे. सध्या प्रशासक म्हणून वसंत दळवी आणि ग्रामसेवक म्हणून लक्ष्मण बुंदके काम पहात आहेत. दरम्यान, दि.२० ऑगस्ट रोजी आंबोली ग्रामपंचायतीची ग्रामसभा घेण्यात आली होती. या सभेत काही ग्रामस्थांनी गावातील विकास कामांवर दृष्टीक्षेप टाकला. तसेच, यावेळी ग्रामपंचायतीला विविध मार्गातून प्राप्त झालेल्या निधीचा वापर, अंदाजपत्रकानुसार केलेली कामे, खरेदी केलेली घंटा गाडी, फॉगींग मशीन आणि शुद्ध पाण्यासाठी बसवण्यात आलेले आर ओ प्लांट याबाबत विचारणा केली. मात्र, ग्रामपंचायतीच्या प्रशासकांकडून कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आली नाही.

गावातील कचरा संकलीत करण्यासाठी ग्रामपंचायतीने साधारणपणे ५ लाख रुपयांना घंटा गाडी विकत घेतली. प्रत्यक्ष बाजारात या गाडीची किंमत दीड लाख आहे. डासांपासून संरक्षण करण्यासाठी १ लाख रुपयांना फॉगिंग मशीन खरेदी केली. प्रत्यक्ष बाजारात या मशीनची किंमत साधारणपणे १० हजार रुपये आहे. तसेच, गावांमध्ये ५ लाख रुपये खर्च करून आर ओ प्लांट बसविण्यात आले. प्रत्यक्ष या प्लांटची किंमत दीड लाख रुपये आहे. जलजीवन योजनेअंतर्गत १ कोटी ७५ लाख रुपयांची योजना गावामध्ये राबविण्यात आली. मात्र, जलवाहिनी टाकण्याचे कामही निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून, करोडो रुपये खर्च करूनही अद्याप गावातील घरांमध्ये पाण्याचा एक थेंबही पोहचलेला नाही. त्यामुळे योजना राबविताना भ्रष्टाचार झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते राकेश आरकशी आणि काही ग्रामस्थांनी केला आहे.

याबाबत राकेश आरकशी यांनी, मुरूडचे गटविकास अधिकारी राजेंद्र कुमार खताल यांना निवेदन देऊन चौकशीची मागणी केली. हे पत्र देऊन एक महिना होत आला. मात्र, गटविकास अधिकारी यांच्याकडून कारवाई करण्यास टाळाटाळ झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे आंबोली ग्रामपंचायत प्रशासक, ग्रामसेवक आणि गटविकास अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. गटविकास अधिकारी यांच्याकडून चौकशी झाली नाही, तर पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषणाला बसणार, असा इशारा देखील आरकशी यांनी दिला आहे. याबाबत गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताल आणि प्रशासक वसंत दळवी यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

गावात केलल्या कामांचा हिशोब आणि निधीचा वापर याची विचारणा ग्रामसभेत करण्यात आली. माहितीच्या अधिकारातही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु, ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांसह प्रशासकांकडून माहिती देण्यात आली नाही. फॉगिग मशीनसह घंटागाडी खरेदीमध्ये घोटाळा अर्थात भ्रष्टाचार झाल्याचा संशय आहे. याबाबत गटविकास अधिकारी यांना पत्र देऊन चौकशी करण्याची मागणी केली. परंतु, पत्रच मिळाले नाही, असे कारण सांगून त्यांनी टाळाटाळ केली आहे.

– राकेश आरकशी, सामाजिक कार्यकर्ते

इंडिया आघाडीचा प्रतिकात्मक महाभियोग

दरम्यान, इंडिया आघाडीकडून दि.१ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर मोठ्या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेत कथित अनियमितता झाल्याचा आरोप करत ही रॅली काढण्यात येणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणीही विरोधकांनी केली आहे. या रॅलीसाठी काँग्रेस आणि मित्रपक्षांकडून जोरदार तयारी सुरू आहे. काँग्रेसने या सभेला १० लाख लोक उपस्थित राहतील, असा दावा केला आहे.

भीमाशंकर जंगलातील प्राणी रस्त्यावर

प्रचंड नुकसान होण्याची भीती वर्तविली जात आहे. त्यामुळे येथील शेतकरी त्या निलगायचा रात्रभर शोध घेत तिचा पाठलाग करत होते.

येथील सायडोंगर जंगलात निलगायसारखे असंख्य प्राणी छोटे मोठे प्राणी आहेत. त्यात हिंस्र प्राण्यांचा देखील समावेश आहे. जंगलातील त्यांचा अधीवास संपुष्टात आला तर ते आजुबाजुच्या परिसरात, गाव-वाड्यांत शिरण्याची भीती आहे. त्यामुळे नीलगाय सारखे असंख्य प्राणी बाहेर पडल्याने त्यांच्या जीवासह तेथील मानवी वस्तीलाही धोका असल्यामुळे प्राणिमित्र आणि स्थानिकांमधून भीती व्यक्त होत आहे.

१२ लाखांची ऑनलाइन फसवणूक

क्रमांक १ याने आरोपी क्रमांक २ हा भारतीय स्टेट बँकेतील अधिकारी असल्याचे सांगून त्याच्याशी संपर्क साधण्यास सांगितले. त्यानंतर आरोपी क्रमांक २ याने परदेशातून आलेली रक्कम भारतीय चलनात खात्यात जमा करण्यासाठी कर भरावा लागेल, असे सांगून फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. या दोन्ही आरोपींच्या बोलण्यावर विश्वास ठेवून फिर्यादी यांनी दि.२२ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत वेळोवेळी आपल्या एचडीएफसी बँक व स्टेट बँक खात्यांतून आरोपींनी सांगितलेल्या खात्यांवर एकूण १२ लाख ४० हजार रुपये पाठविले. मात्र, आश्वासन दिलेली आर्थिक मदत मिळाली नाहीच, शिवाय पाठविलेली रक्कमही परत न मिळाल्याने आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे फिर्यादी यांच्या लक्षात आले. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल कंपनीत चोरीचा प्रयत्न

ठरणारा आहे. गेल्या दोन वर्षांपासून या प्रकल्पाचे काम सुरु असुन, या प्रकल्पाचे काम वेगाने सुरु आहे. त्यामुळे २०२७ पर्यंत हे काम पुर्ण होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या प्रकल्पासाठी वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य कंपनीत आणण्यात आले आहे. मात्र, कंपनीत काम करणाऱ्या काही कामगारांकडूनच कंपनीतील साहित्य चोरीच्या चर्चा सुरु आहेत. गेल कंपनीत शुक्रवारी (दि.३०) रात्री कॉपर केबल चोरण्याचा प्रयत्न तेथील कामगारांनीच केल्याची बाब सुरक्षा रक्षकांच्या निदर्शनास आली. त्यांनी तिघांना ताब्यात घेऊन कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आणले. त्यानंतर रेवदंडा पोलिसांना पाचारण करण्यात आले.रेवदंडा पोलिसांनी तिघांना ताब्यात घेऊन रात्री पोलीस ठाण्यात नेले. मात्र, काही तासांत त्यांना सोडण्यात आले.ही घटना घडून कित्येक तास उलटून गेले. मात्र, याबाबत अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. याबाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक गडदे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी चौकशीसह गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु असल्याचे सांगितले. याबाबत कंपनी प्रशासनाला विचारणाला केल्यावर त्यांनी ही बाब पोलिसांच्याकडील असल्याने त्यावर काहीही बोलू शकत नाही. मात्र, चोरी झाल्याची माहिती समजते, असे त्यांनी सांगितले.

शॉक बसल्याने गुरांचा मृत्यू

अवस्था आहे. काही ठिकाणच्या तारा जीर्ण झालेल्या असून, महावितरण त्याकडे लक्ष देताना दिसत नाही. गेल्या काही महिन्यांत देखील अशाच प्रकारे तार तुटल्याने गुरांचा मृत्यू झाला होता. आता पुन्हा चार जनावरांचा मृत्यू झाल्याने पनवेलच्या ग्रामीण भागात आजही महावितरणचा भोंगळ कारभार दिसून येत आहे.

अनधिकृत बांधकामावर पडणार हातोडा?

प्रयत्न सुरु आहेत. सिनेकलाकारांसह उद्योजक अशा अनेक मंडळींनी कोळगांव आणि बागदांडा (मिळकतखार) या परिसरात जागा घेऊन बंगले बांधले आहेत. मात्र, हा परिसर समुद्रकिनार पट्टीचा भाग म्हणून ओळखळा जातो. तसेच, हा भाग समुद्राच्या भरती ओहोटीच्या प्रभावाखाली येणारा किनारपट्टीचा भाग आहे. त्यामुळे या ठिकाणी सीआरझेड नियमांचे काटकोर पालन करावे लागते. समुद्रकिनाऱ्यापासून ठराविक अंतराच्या आत बांधकामाला परवानगी दिली जाते. मात्र, काही धनदांडग्यांनी सीआरझेचे उल्लंघन करून बांधकाम केल्याची बाब समोर आली आहे.

अलिबाग तालुक्यातील मिळकतखार (बागदांडा), कोलगाव, नवेदर नवगाव या परिसरात चार ठिकाणी असलेले बांधकाम उल्लंघन करून केले असल्याचा ठपका महसूल विभागाने ठेवला आहे. सीआरेझेडचा भंग करून केलेल्या विकास कामांबाबत महसूल विभागासह सार्वजनिक बांधकाम विभागाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. सीआरझेडचे उल्लंघन करणाऱ्या चार धनदांडग्यांविरोधात कारवाईची मोहिम हाती घेतली आहे. त्यामध्ये दोन कोळगावमधील असून, इतर दोन नवेदर नवगांव आणि मिळकतखार येथील असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता एम.एम. धायतडक यांनी अनधिकृत बांधकाम निष्कसीत करण्यासाठी ५३ लाख ८० हजार ८४२ रुपयांचे अंदाजपत्रक तयार केले असून, ते पत्रक मंजुरीसाठी महसूल प्रशासनाकडे पाठविण्यात आले आहे. त्यामुळे आता प्रशासन अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासाठी कधी मुहूर्त लावणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे. दरम्यान, सर्वसामान्यांच्या बांधकामांवर महसूल विभागाकडून तातडीने कारवाई केली जाते. मात्र, धनदांडग्याच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई उशीर का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.



कंपनी प्रशासनाकडून मागण्या मान्य

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील खोपटे येथील मास्टर मरीन मेहर यार्ड कंपनीविरोधात गेट बंद आंदोलन करण्यात आले होते. स्थानिक बेरोजगारांना आणि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना रोजगार व व्यवसायाच्या संधींमध्ये सामावून घ्यावे, या प्रमुख मागण्यांसाठी गुरुवार दि.२९ ऑक्टोबर रोजी हे आंदोलन कंपनीच्या गेटसमोर सुरू करण्यात आले होते. मात्र, लोकशाही, कायदेशीर व शांततेच्या मार्गाने केलेल्या या लढ्याला यश आले असून, शनिवारी (दि.३१) कंपनी प्रशासनाकडून मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. त्यामुळे १९ स्थानिक बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांपैकी १० माणसे आणि उर्वरीत ९ माणसे नोव्हेंबर महिन्यात कामावर घेण्याचे मास्टर मरीन मेहर यार्ड कंपनी प्रशासनाने मान्य केले आहे. त्यामुळे स्थानिक बेरोजगार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी एकच जल्लोष केला. सर्व राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी कार्यकर्त्यांनी समाधान, आनंद व्यक्त केला. मात्र, सर्व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कामावर घेतले नाही, तर परत उग्र आंदोलन करण्याचा इशारा मोठेखार (वरचा भाग) प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेने दिला आहे.

रेल्वे भरती मंडळ

सीपीएम कन्व्हर्जन्स ऑफिस बिल्डिंग, पी. डी'मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई – ४०० ०१०

सूचक अधिसूचना

रोजगार सूचना क्र. RRC/CR/CULTURAL/03/2026 दिनांक ०५.११.२०२६

मध्य रेल्वे, वर्ष २०२६-२७ साठी सांस्कृतिक कोटा अंतर्गत (Cultural Quota) विविध क्षेत्रांमधील पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागवत आहे.

अर्ज सुरु होण्याची तारीख आणि वेळ	०५/११/२०२६ रोजी १०:०० वाजता
अर्ज बंद होण्याची तारीख आणि वेळ	०४/१२/२०२६ रोजी १८:०० वाजता

अक्र	स्तर	(वेतन श्रेणी)	सांस्कृतिक क्षेत्राचे नाव	पदांची संख्या
१	स्तर-२	५२००-२०२००	नाट्य कलाकार (पुरुष)	०१
२			हार्मोनियम वादक	०१

सविस्तर अधिसूचनेसाठी कृपया RRC/CR ची वेबसाइट **www.rrccr.com** ला भेट द्या; ही अधिसूचना ०५/११/२०२६ पासून उपलब्ध असेल.

दिनांक: १६/१०/२०२६ — अध्यक्ष, आर.आर.सी./सी.आर.

671

पावसाअभावी पाणीटंचाईचे सावट

शहरात सोसायट्यांमध्ये टँकरची वर्दळ ■ पाण्याच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

यंदा महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचे परिणाम आता शहरी भागातही जाणवू लागले आहेत. पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेता शहरातील विविध सोसायट्यांमध्ये पाण्याच्या टँकरची मागणी वाढताना दिसत आहे. त्यामुळे आगामी काळात पाणीपुरवठ्याचे नियोजन हे शहरांसमोरील महत्त्वाचे आव्हान ठरण्याची चिन्हे आहेत.

पनवेल पालिका क्षेत्रात परिसरातील अनेक सोसायट्यांमध्ये सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असल्याचे चित्र दिसत आहे. काही ठिकाणी नियमित पाणीपुरवठा अपुरा पडत असल्याने रहिवाशांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. दुसरीकडे, शहरातील विविध बांधकामांच्या ठिकाणीही टँकरद्वारे पाणी आणून त्याचा वापर बांधकामासाठी केला जात आहे.

प्रशासनाकडून कोणत्याही क्षणी पाणी कपातीची सूचना जाहीर होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांमध्ये आतापासूनच पाण्याबाबत चिंता व्यक्त होत आहे. विशेषतः पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. अनेक नागरिक घरगुती वापरासाठी तसेच पिण्यासाठी बाहेरून पाण्याचे जार आणि केन मागवत आहेत.



मात्र, टँकरमधून पुरवठा होणारे पाणी नेमके कोणत्या स्रोतामधून आणले जाते, त्याची गुणवत्ता काय आहे आणि ते पिण्यास योग्य आहे का, याची खात्री करणे गरजेचे आहे. बांधकामासाठी वापरले जाणारे पाणी आणि पिण्यासाठी पुरवठा होणारे पाणी यामध्ये स्पष्ट फरक असणे आवश्यक आहे. केवळ टँकर उपलब्ध झाला म्हणजे पाणी सुरक्षित आहे, असे गृहीत धरता येणार नाही.

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर महापालिका आणि संबंधित प्रशासनाने पाणीपुरवठ्याचे नियोजन, टँकरच्या पाण्याची गुणवत्ता तपासणी आणि पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर लक्ष ठेवण्याची गरज आहे. तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी नागरिकांनीही योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे.

टँकरची वाढती वर्दळ पाहता पनवेलकरांसमोर आता पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. ऐन उन्हाळ्यापूर्वीच पाणीटंचाईचे सावट शहरावर येणार का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा हा तातडीच्या संकटावरचा उपाय आहे. दीर्घकालीन दृष्टीने पावसाचे पाणी अडवणे, भूजल पुनर्भरण, पाणलोट क्षेत्र विकास, गाळ काढण्याची कामे आणि स्थानिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन यांना प्राधान्य द्यावे. मात्र, अशा कामांची निवड स्थानिक भूगर्भरचना आणि जलवैज्ञानिक अभ्यासाच्या आधारेच करणे आवश्यक आहे.

टंचाई रोखण्यासाठी पूर्वतयारी आवश्यक

संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रशासनाने मागील वर्षातील अनुभवाचा उपयोग करून यंदाचे नियोजन करणे आवश्यक आहे. ज्या गावांमध्ये दरवर्षी टँकरची गरज भासते, त्या गावांसाठी कायमस्वरूपी उपाययोजनांचा विचार करावा लागणार आहे. जलस्रोतांचे पुनर्भरण, पावसाचे पाणी साठविणे आणि पाण्याचा अपव्यय रोखणे या उपायांमुळे भविष्यातील संकटाची तीव्रता कमी होऊ शकते.

निवडक

दुचाकीस्वाराकडून सोनसाखळी लंपास

पनवेल : करवाचौथचा सण साजरा करून पतीसोबत दुचाकीवरून घरी परतणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सुमारे सव्वा लाख रुपये किमतीची सोनसाखळी दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेली. खारघर सेक्टर १८ येथे ही घटना घडली. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला करवाचौथचा सण साजरा केल्यानंतर पतीसोबत दुचाकीवरून घरी जात होती. सेक्टर १८ मधील संजीवनी शाळेमागील रस्त्यावर मारुती कृपा इमारतीसमोरून जात असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून घटनास्थळावरून पळ काढला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, खारघर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

बाजारात दिवाळीच्या आकाशकंदिलांची रेलचेल

पनवेल : दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने नवी मुंबई, पनवेल आणि उरण परिसरातील बाजारपेठांमध्ये खरेदीची लगबग सुरू झाली आहे. दिवाळीनिमित्त घरे, गृहनिर्माण सोसायट्या आणि दुकाने सजविण्यासाठी नागरिकांकडून आकाशकंदील, पणत्या, विद्युत माळा आणि विविध सजावटीच्या वस्तूंची खरेदी केली जात आहे. बाजारपेठांमध्ये रंगीबेरंगी आणि आकर्षक आकाशकंदिलांचे विविध प्रकार दाखल झाले असून, ग्राहकांकडून त्यांना चांगली पसंती मिळत आहे. यंदा बाजारात पारंपरिक कागदी कंदिलांसोबतच कापड, बांबूच्या पट्ट्या आणि विविध साहित्यांपासून तयार केलेले आकर्षक आकाशकंदील उपलब्ध आहेत. ताऱ्याच्या आकाराचे, गोलाकार, चौकोनी तसेच बहुरंगी कंदिल ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. कमळाच्या आकारातील, मोराच्या रचनेतील आणि राजवाड्यांच्या प्रतिकृती असलेल्या कंदिलांनाही मागणी आहे. नक्षीकाम आणि सजावटीच्या झालरी असलेल्या कंदिलांना विशेष पसंती मिळत आहे.आकार, वापरलेले साहित्य आणि सजावटीच्या प्रकारानुसार आकाशकंदिलांच्या किमती निश्चित करण्यात आल्या आहेत. साधे कागदी कंदील मध्यम आकाराचे आकर्षक कंदीले, तर मोठ्या आकाराचे आणि कलात्मक नक्षीकाम असलेले कंदील विक्रीसाठी उपलब्ध आहेत. दिवाळी जसजशी जवळ येत आहे, तसतशी बाजारपेठांमधील गर्दी वाढण्याची शक्यता आहे. पारंपरिक आणि आधुनिक सजावटीच्या वस्तूंची वाढती उपलब्धता यामुळे ग्राहकांमध्ये खरेदीचा उत्साह दिसून येत आहे.



नवीन पनवेल पुलावर खड्ड्यांचा विळखा

पनवेल : नवीन पनवेल ते पनवेलला जोडणाऱ्या महत्त्वाच्या पुलावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले असून, वाहनचालकांचा प्रवास धोकादायक बनला आहे. पुलावरील खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असताना पनवेल महापालिका प्रशासनाकडून मात्र या समस्येकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचे चित्र आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या पुलावरून दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. दुचाकी, चारचाकी आणि अवजड वाहनांची सतत ये-जा सुरू असताना रस्त्यावरील खड्डे अपघातांना निमंत्रण देत आहेत. खड्डे चुकवताना दुचाकीस्वारांचा तोल जाण्याची, तर अचानक ब्रेक लावल्याने मागून येणाऱ्या वाहनांची धडक होण्याची शक्यता आहे. रात्रीच्या वेळी खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. शहरातील रस्त्यांच्या विकासाच्या घोषणा होत असताना महत्त्वाच्या पुलाची साधी दुरुस्तीही होत नसल्याने महापालिका प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेकडे प्रशासनाचे इतके दुर्लक्ष का, असा सवाल उपस्थित होत आहे. पुलावरील खड्डे तातडीने बुजवून संपूर्ण रस्त्याची दर्जेदार दुरुस्ती करावी. केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी संतप्त वाहनचालकांकडून होत आहे.



गंगेचीवाडीतून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

रसायनी : रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गंगेचीवाडी, पो. आपटा येथे एका १५ वर्षे ११ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची घटना घडली आहे. (दि.३०) ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास ही मुलगी घरातून असताना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तिचे कायदेशीर पालकांच्या ताब्यातून अपहरण केले. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाचकर करीत असून, अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

अंनिसतर्फे पोलीस निरीक्षकांचा सत्कार

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

पती नांदवत नसल्याच्या कारणावरून अंधश्रद्धेच्या आहारी जात जादूटोणा करणाऱ्या एका भोंदू मांत्रिकासह पाच जणांना श्रीवर्धन पोलिसांनी नुकतीच धडक कारवाई करत अटक केली आहे. पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद गरड यांच्या विशेष सतर्कतेमुळे व तात्काळ घेतलेल्या भूमिकेमुळे हा गंभीर प्रकार उघडकीस आला.

या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जिल्ह्याची टीम तात्काळ श्रीवर्धन येथे दाखल झाली. भविष्यात अशा प्रकारच्या अंधश्रद्धा पसरवणाऱ्या घटनांना वेळीच आळा बसावा, यासाठी श्रीवर्धन परिसरात अंनिसची नवीन शाखा सुरू करण्याचा मानस पोलीस निरीक्षक गरड यांनी व्यक्त केला.त्यासाठी पोलिसांकडून सहकार्य करण्याचे आश्वासन देण्यात आले.



अंधश्रद्धेविरुद्ध तातडीने कठोर पावले उचलल्याबद्दल ममअंनिसफ रायगड शाखेच्या वतीने पोलीस निरीक्षक सुरेंद गरड यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांना महाराष्ट्र जादूटोणाविरोधी कायद्याचे पुस्तक भेट म्हणून देण्यात आले. याप्रसंगी संदेश गायकवाड, विवेक सभेकर, अमित निंबाळकर, रमेश गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

हेल्प फाऊंडेशनकडून अजगराची सुखरुप सुटका

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोली शहराची आध्यात्मिक ओळख असलेल्या गगनगिरी महाराजांच्या आश्रम परिसरात अडकलेल्या सुमारे आठ फुटांच्या अजगराची दोन दिवसांच्या अथक प्रयत्नांनंतर (दि.३१) ऑक्टोबर रोजी सकाळी सुखरूप सुटका करण्यात आली. सर्पमित्रांच्या जिद्दीतून आणि जीवदयेच्या भावनेतून या मोहिमेने सर्वांचे लक्ष वेधले. ३० ऑक्टोबर रोजी पहाटे तीनच्या सुमारास आश्रमाच्या प्रवेशद्वारासमोरील गटाराच्या चेंबरमध्ये अजगर अडकल्याचे सुरक्षारक्षकांच्या निदर्शनास आले. यानंतर हेल्प फाऊंडेशनच्या सर्पमित्रांना पाचारण करण्यात आले.



अजगराची घुसमट होऊ नये, यासाठी गुरुनाथ साठेलकर यांनी स्वतः अंडरग्राउंड चॅनेलमध्ये उतरून त्याच्या श्वसनाचा मार्ग मोकळा केला. आश्रम व्यवस्थापनाने प्लंबरच्या मदतीने सुरक्षित मार्ग तयार केला. ३१ ऑक्टोबर रोजी पहाटे बाहेर पडताना त्याच्या शरीरात अडकलेली लोखंडी रिंग सर्पमित्रांनी प्रयत्नपूर्वक काढली.

या मोहिमेत प्रवीण तावडे, अमोल कदम,दिनेश ओसवाल, सुनील पुरी, अमोल ठकेकर, अरविंद गुरव, गुरुनाथ साठेलकर, चंदन कदम, मंगेश घोडके व निलेश यादव यांनी योगदान दिले.

इंटरनॅशनल कंपनीत मालाचा अपहार

। रसायनी । प्रतिनिधी ।

मुंबईतील चेंबूर येथील बीपीसीएल कंपनीतून रसायनी-पाताळगंगा येथील हायटेक इंटरनॅशनल कंपनीत पोहोचविण्यासाठी दिलेल्या बेस ऑईल कच्च्या मालाचा परस्पर अपहार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी संबंधित ट्रान्सपोर्ट चालकाला रसायनी पोलिसांनी अटक केली आहे. बीपीसीएल चेंबूर कंपनीतून हायटेक इंटरनॅशनल कंपनी, चावणे, पाताळगंगा, रसायनी येथे पोहोचविण्यासाठी एकूण ८ लाख २३ हजार ८८० रुपये किमतीचा बेस ऑईल कच्चा माल जय अंबे ट्रान्सपोर्ट, गव्हाणपाडा, चेंबूर येथील चालकाकडे विश्वासाने सोपविण्यात आला होता. मात्र, चालकाने हा माल नियोजित ठिकाणी पोहोचविण्याऐवजी अन्यत्र उतरवून किंवा स्वतःच्या फायद्यासाठी इतर कोणाला विक्री करून त्याचा अपहार केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्याते गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील आरोपीला ३० ऑक्टोबर रोजी रात्री अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक फौजदार कोळेकर करीत आहेत.

घोडीवली वाडीच्या स्मशानभूमीची दुरवस्था

। खोपोली । प्रतिनिधी ।

गावात विकासकामांचे दावे होत असताना खालापूर तालुक्यातील घोडीवली वाडीत मात्र मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे चित्र समोर आले आहे. गावातील स्मशानभूमीची अत्यंत दयनीय अवस्थाझाली असून, अंत्यविधीसाठी मृतदेह घेऊन जाण्यासाठी धड रस्ताही उपलब्ध नाही. स्मशानभूमीवरील पत्रे उडाली असून, अन्य कोणत्याही आवश्यक सुविधा नसल्याने ग्रामस्थांना अंत्यसंस्कार करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तिच्या देखभाल-दुरुस्तीकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.



स्मशानभूमीपर्यंत जाणारा रस्ता व्यवस्थित नसल्याने अंत्यविधीच्या वेळी नागरिकांची गैरसोय होते. विशेषतः पावसाळ्यात चिखल आणि प्रतिकूल हवामानामुळे या अडचणी अधिकच गंभीर होतात. स्मशानभूमीवरील पत्रे उडाल्याने पावसापासून संरक्षणाची सुविधाही उपलब्ध नाही.

घोडीवली वाडी ही छोटी वस्ती असल्याने विकासकामांच्या बाबतीत सातत्याने दुजाभाव केला जात असल्याची भावना स्थानिकांमध्ये आहे. प्रभागातून लोकप्रतिनिधी निवडून येतात; मात्र गावातील मूलभूत प्रश्नांकडे लक्ष दिले जात नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे. जिवंतपणी मूलभूत सुविधांसाठी संघर्ष आणि मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठीही गैरसोय, अशी परिस्थिती निर्माण झाली असताना ग्रामपंचायत प्रशासन नेमके कोणत्या विकासाला प्राधान्य देत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. स्मशानभूमीची दुरुस्ती, अंत्यविधीसाठी पक्का रस्ता, आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही ग्रामपंचायतीची प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र, या प्रश्नाकडे अद्याप गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याने ग्रामस्थांमध्ये संताप वाढत आहे.

जेएसडब्ल्यूच्या वीज वाहिनीला शेतकऱ्यांचा विरोध

। नागोठणे । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या कानसई-नागोठणे ते डोलवी येथील जेएसडब्लू (जिंदाल स्टील वर्क) कंपनीत ४००/२२० के.व्ही. ही उच्च वीज दाब वाहिनी टाकण्याच्या कामात बाधित शेतकऱ्यांना अंधारात ठेवून जेएसडब्ल्यू कंपनी प्रशासन व संबधित ठेकेदार कंपनी बी.एन.सी पॉवर प्रोजेक्ट लि. च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची मनमानी सुरूच आहे. त्यामुळे या उच्च वीज दाब वाहिनी विरोधात पाटणसई येथील शेतकरी आक्रमक झाले आहेत. शेतकऱ्यांनी विद्युत मनोरे उभारण्याचे काम बंद पाडले आहे.

याप्रकरणी शेतकऱ्यांनी पाटणसई येथे माजी सरपंच सदानंद गायकर यांच्या प्रांगणात शुक्रवारी (दि.३०) उच्च दाबाच्या वीज वाहिनीच्या विरोधात बैठक घेऊन बीएमसी पॉवर प्रोजेक्ट कंपनीच्या अधिकाऱ्यांसमोर तीव्र संताप व्यक्त केला. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाच लाट उसळली आहे.



पाटणसई गावाच्या हद्दीत चार विद्युत मनोरे उभारण्याचे काम कंपनीने शेतकऱ्यांना कोणतीही नोटीस न बजावता, कोणतीही परवानगी न घेता पाटणसई ग्रामपंचायतची कोणतीही परवानगी न घेता शेतकऱ्यांना अंधारात ठेवून सुरू केले. पाटणसई गावाच्या हद्दीतील ज्या शेतकऱ्यांच्या जागेतून ही उच्च दाबाची वीज वाहिनी जाणार आहे त्या जागेसह वीज वाहिनीच्या दोन्ही बाजूला सुमारे २३ मीटर अंतरापर्यंत संबंधित शेतकऱ्यांना भातशेती करता येणार नाही. जमिनीवरून जाणाऱ्या उच्च दाबाच्या वीज वाहिनीमुळे अशी जमीन भविष्यात कुणीही विकत घेणार नाही अथवा शेतकरी या जागेचा विकासही करु शकणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल होणार आहेत.

त्यामुळेच जेएसडब्ल्यू व ठेकेदार कंपनी प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात व उच्च दाब वीज वाहिनीमुळे बाधित होणारे पाटणसईमधील सुमारे २५ ते ३० संबंधीत शेतकरी आक्रमक झाले आहेत.

याप्रसंगी सदानंद गायकर, सुरेश गायकर, हेमंत गायकर, गजानन गायकर, रामदास कोलवाल, संजय गायकर, विशाल गायकर, अनिल कोतवाल, शंकर कोतवाल, प्रतीक गायकर, सुनिल कोतवाल, रविंद्र कोतवाल, गजानन दाभाडे, संतोष राणे, गणेश कोतवाल, निलेश कोतवाल, छबिलदास कोतवाल, दत्ताराम कोतवाल, परशुराम कोतवाल, प्रल्हाद दाभाडे, दिपक गायकर आदी उपस्थित होते.

जिते नदीपात्रात केमिकलयुक्त पाणी

। महाड । प्रतिनिधी ।

महाड औद्योगिक वसाहतीमधून नदीपात्रात रासायनिकयुक्त पाणी सोडण्याचे प्रकार पुन्हा समोर येत असून, जिते ग्रामपंचायत हद्दीतील नदीपात्रात मोठ्या प्रमाणात केमिकलयुक्त पाणी सोडण्यात आल्याची तक्रार ग्रामपंचायतीने प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे लेखी स्वरूपात तक्रार केली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून महाड एमआयडीसी परिसरात रासायनिक प्रदूषणाच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. जिते येथील नदीपात्रातील पाणी दूषित झाल्याने परिसरात दुर्गंधी पसरली असून, गावाच्या प्रवेशद्वारावरही दुर्गंधीचा त्रास जाणवत आहे. या नदीपात्रात गुरेढोरे तसेच इतर प्राणी पाणी पिण्यासाठी जात असल्याने त्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होण्याची शक्यता ग्रामपंचायतीने व्यक्त केली आहे. या तक्रारीची दखल घेत प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी म्हात्रे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाण्याचे नमुने गोळा केले आहेत. हे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विशेष म्हणजे, पावसाळ्यात नदीपात्रात रासायनिक पाणी सोडण्याचे प्रकार घडत असताना आता संभाव्य पाणीटंचाईच्या काळातही नदीपात्रात केमिकल सोडले जात असल्याने ग्रामस्थांची चिंता वाढली आहे. भविष्यात पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास या दूषित पाण्याचा परिणाम नागरिकांसह पशुधनावरही होऊ शकतो.

वारंवार तक्रारी करूनही प्रदूषण रोखण्यासाठी ठोस उपाययोजना होत नसल्याची नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि स्थानिक प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित प्रदूषणाच्या स्रोताची चौकशी करावी आणि दोषी आढळणाऱ्या कारखान्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिते ग्रामपंचायतीने केली आहे.



प्रदूषणामुळे जलचरांना धोका | पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविले

म्हसोबा तलावात हजारो मासे मृत

। पनवेल । प्रतिनिधी ।

कळंबोली वसाहतीतील रोडपाली येथील म्हसोबा देवस्थानच्या तलावात हजारो मासे मृत पावल्याची घटना समोर आली आहे. तलावाच्या पाण्याला दुर्गंधी येत असून, गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात झालेल्या मूर्ती विसर्जनामुळे पाणी प्रदूषित झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. मृत माशांमुळे परिसरातील दुर्गंधीत आणखी वाढ होत असल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.



महापालिकेने सुशोभित केलेल्या या तलावात चिलापी, कटला, फंटूस आणि जिताडा यांसारख्या माशांचे संवर्धन करण्यात आले होते. मात्र, गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात पीओपीच्या मूर्तींचे विसर्जन तसेच निर्माल्य आणि घट तलावात टाकल्यामुळे पाण्याचे प्रदूषण वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी तीन ते चार किलो वजनाचे आणि दीड ते दोन फूट लांबीचे मोठे मासेही मृत पावले आहेत. विशेष म्हणजे, नवरात्रोत्सव संपून आठवडा उलटला तरी माशांचा मृत्यू सुरूच असल्याचे नागरिकांनी सांगितले.

तलावात मृत मासे तरंगत असून ते वेळेत न काढल्याने कुजण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पाण्याची गुणवत्ता आणखी खालावत आहे. तलावातील विसर्जित मूर्ती, निर्माल्य आणि कचरा तातडीने हटवून संपूर्ण तलावाची स्वच्छता करावी, तसेच उर्वरित माशांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

तलावात निर्माल्य टाकण्यास सुरक्षा रक्षकांकडून मनाई केली जात असतानाही काही नागरिकांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी दंडात्मक कारवाई करण्याची मागणीही पुढे आली आहे. दरम्यान, तलावातील पाण्याचे नमुने तपासणीसाठी अलिबाग येथील मत्स्य विभागाच्या पथकाकडे पाठविण्यात आले आहेत.

> रोडपाली तलावाची पाहणी करण्यात आली असून, मासे मृत होण्यामागील कारणांचा तपास सुरू आहे. एक ते दोन दिवसांत पाण्याच्या नमुन्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक उपाययोजना करून तलावातील माशांचे संरक्षण केले जाईल
> - विलास चव्हाण
> पनवेल महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अधिकारी

अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशी माहिती पनवेल महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अधिकारी विलास चव्हाण यांनी दिली आहे.



नको असलेले प्रकल्प आणायला उत्सुक

उदय पाटील यांचा सरकारवर आरोप



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातून जाणारा भीमाशंकर महामार्ग याचे काम २० वर्षापासून रखडले आहे. त्या ठिकाणी रस्ता तयार करण्यास झाडे आडवी येत आहेत, वन विभाग परवानगी देत नाही. मग टोरंटसाठी धरण बांधायला वन विभागाला सायडोंगर येथील झाडे दिसली नाहीत काय? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते उदय पाटील यांनी उपस्थित केला आहे. उरण पनवेल नेरळ भीमाशंकर हा घाटरस्ता भूमिपूजन होऊन देखील रखडला आहे, याबद्दल सरकार बोलायला तयार नाही पण जनतेला नको असलेले प्रकल्प आणायला उत्सुक आहे, असा आरोप पाटील यांनी केला.

पुणे जिल्हा मुंबईच्या आणखी जवळ यावा, यासाठी पनवेल-नेरळ-कशेळे-भीमाशंकर-मंचर असा घाटरस्ता शासनाच्या १९८०चे रस्ते विकास आराखड्यात मंजूर आहे. भीमाशंकर घाटातून जाणाऱ्या या रस्त्याचे कामाचे भूमीपूजन तत्कालीन अर्थमंत्री सुनील तटकरे यांनी २००९ साली केले होते. या रस्त्यामुळे मुंबई ते शिरूर हे अंतर साठ किलोमीटरने कमी होईल असे सांगितले गेले. वेळेची बचत, इंधनाची बचत, पर्यायाने प्रदूषण कमी होणारा हा रस्ता सर्वांसाठीच खूप गरजेचा होता.हा रस्ता साडे चार किलोमीटर वन खात्याच्या जमिनीतून जात होता. त्याकरिता सर्वजनिक बांधकाम विभागाने वन खात्याला कोलाड येथे जमीन खरेदी करून दिली. त्याचसोबत त्या जागेला कुंपण करणे, झाडे लावणे आणि जगवणे याचा संपूर्ण खर्च दिला. तरीदेखील त्यांच्या अनेक जाचक अटींची पूर्तता करण्यात सर्वजनिक बांधकाम विभागाला अनेक वर्ष लागत आहेत. बांधकाम खात्याने येथील रस्ता बनवण्यासाठी निधी मंजूर केला, रस्त्याच्या कामाला सुरुवात देखील झाली; परंतु नंतर वन विभागाने घाटातील रस्ते कामाला परवानगी नाकारली. तेंव्हापासून बांधकाम विभाग वन विभागाच्या नागपूर भोपाळ येथे फेऱ्या मारत असून वन विभागाने परवानगी नाकारली आहे.

याच जंगलात शेखरू नावाचा दुर्मिळ प्राणी आढळला त्यामुळे पुन्हा निर्बंध आले. एकूणच नागरिकांच्या गरजेचा आणि इंधनाच्या माध्यमातून शासनाचे हजारो करोड रुपये वाचवणारा हा महामार्ग अजूनही होऊ शकला नाही. या भागाचे खासदार श्रीरंग बारणे आणि ज्यांचे हस्ते रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन झाले ते सुनील तटकरे आज खासदार झाले आहेत. जो रस्ता पंचवीस वर्ष वनविभाग यांनी अडवला आहे. त्याच्या फक्त दोन चार किलोमीटर पुढे याच पाली सायडोंगर आहे. याच डोंगर रांगेत असलेल्या जंगलात शेकडो एकरवरील लाखो झाडे तोंडायला एक महिन्यात परवानगी मिळून वनखत्याच्या अधिकाऱ्यांच्या साक्षीने शेकडो झाडांची कत्तल झाली आहे. एका खाजगी उद्योजकाला लाखभर झाडे तोडायला वनविभाग तातडीने परवानगी देतो, आणि शासकीय रस्ता पंचवीस वर्ष अडवला जातो. पण जनतेला नको असलेला प्रकल्प सरकार लादत असून सरकारचा या धोरणाचा कर्जत तालुका विरोध करीत असल्याचे उदय पाटील यांनी स्पष्ट केले.

ज्येष्ठ नागरिक दिन साजरा

श्रीवर्धन : श्रीवर्धन तालुका ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने गुरुवारी (दि.२९) श्रीवर्धन येथील भाऊ जोशी यांच्या कार्यालयात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे तालुका अध्यक्ष नरेश पुलेकर होते. प्रथम सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमात ऐंशी वर्षांवरील ज्येष्ठांचा सत्कार करून भेटवस्तू देण्यात आली. यावेळी बोर्ली पंचतन येथील वय वर्षे ९१चे ज्येष्ठ सदस्य व आजही विविध शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत असलेले रविदादा कुळकर्णी, सुभाष गंद्रे, डॉ.शुभांगी जोशी, माजी तहसिलदार रोहिणी क्षीरसागर, प्रविता माने, कार्यवाह चंद्रकांत केळस्कर, उपाध्यक्ष नारायण पांढरकामे यांनी आपले विचार मांडले.

निवडक



■ (छायाचित्र : संजय गायकवाड)

डॉ. मोहन काळे पुरस्काराने सन्मानित

कर्जत : फार्मसी शिक्षणाच्या विकासासाठी आणि फार्मसी व्यवसायाच्या प्रगतीसाठी प्रदीर्घ काळ योगदान देणाऱ्या ज्येष्ठ शिक्षकांना गौरविण्यासाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्यावतीने 'फार्मा रत्न सन्मान' सुरू करण्यात आला आहे. या प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्काराने कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर महाविद्यालय कर्जतच्या डॉ. मोहन कृष्णराव काळे यांना सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात देशातील विविध राज्यांमधील सुमारे शंभर निवडक ज्येष्ठ फार्मसी शिक्षकांचा गौरव करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्रातील केवळ ११ ज्येष्ठ शिक्षकांचा समावेश होता. त्यामध्ये डॉ. मोहन के. काळे यांचे नाव अभिमानाने झळकले आहे. डॉ. मोहन काळे हे मूळचे शेतकरी परिवारातून आलेले आहेत. भिडी येथील मातीतील संस्कार, कष्ट, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव हीच त्यांच्या यशाची खरी शिदोरी आहे. त्यांना यापूर्वी बेस्ट प्रिन्सिपल, शिक्षा गौरव पुरस्कार यासह अनेक प्रतिष्ठित सन्मान प्राप्त झाले आहेत. त्यांना प्रसिद्ध राष्ट्रीय संस्थांकडून त्यांनी एक कोटी रुपयापर्यंतची संशोधन अनुदाने प्राप्त केली आहेत. त्यांनी अनेक फार्मसी पुस्तके लिहिली असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये अनेक संशोधन निबंध प्रकाशित केले आहेत.



शैक्षणिक साहित्यासह फराळाचे वाटप

पाली/सुधागड : नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने हाती घेतलेल्या 'एक हात मदतीचा शिक्षणासाठी' या उपक्रमांतर्गत जमा झालेले शैक्षणिक साहित्य आणि इतर वस्तू साई आधार (थळ्याचा पाडा, वसई) या संस्थेतील गरजू मुलांपर्यंत पोहोचवण्यात आले. या उपक्रमासाठी स्थानिक रहिवासी, पदाधिकारी, मित्र परिवार तसेच अनेक अनोळखी दानशूर व्यक्तींनी विश्वास दाखवत शालेय वह्या, पेन, पेन्सिल, बॅग, इतर शैक्षणिक साहित्य, कपडे, बेडशीट, रुमाल, खाऊ आणि दिवाळीचा फराळ मंडळाकडे आणून दिला होता. नुकताच मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी साई आधार संस्थेला भेट दिली. या संस्थेत जवळपास ७० लहान मुले वास्तव्यास आहेत. पदाधिकाऱ्यांनी मुलांशी संवाद साधला. त्यानंतर संस्थेतील मुलांना शैक्षणिक साहित्य आणि फराळाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला सहकार्य करणाऱ्या सर्व देणगीदारांचे आणि विश्वास दाखविलेल्या सर्वांचे मंडळाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.



■ (छायाचित्र : संजय गायकवाड)

ऐनाचीवाडी शाळेचा कायापालट

कर्जत : कर्जत तालुक्यातील रा.जि.प. शाळा ऐनाचीवाडी या शाळेचा श्री विद्या ट्रस्ट व डिजिटल एज यांच्या अमूल्य सहकार्यातून संपूर्ण कायापालट करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक व सुविधायुक्त शैक्षणिक वातावरण मिळावे, या उद्देशाने शाळेत विविध भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये शाळेची आकर्षक रंगरंगोटी, खिडक्यांना लोखंडी ग्रिल, विद्युतीकरण, पंखे, ट्यूबलाइट, संगणक, प्रिंटर तसेच नवीन टेबल, खुर्च्या व कपाट अशा फर्निचरची व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व सुविधांचे लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमात डिजिटल एजच्या वतीने साईराम प्रसाद, कमलेश हरचंदानी, मनीष सान्सी, राहुल सागर, प्रसून घटक, मिलिंद तेरेदेसाई, देवांशू पंडिया, राहुल यादव यांनी सहकार्य केले. तसेच श्री विद्या ट्रस्टच्या वतीने गीता शेट्टी, चंद्रहास शेट्टी, सरपंच बेबीताई पादीर, केंद्रप्रमुख अमोल चोळके, दिनेश माळी, स्वप्निल पितळे, वसंत ढोले, शाळा व्यवस्थापन समिती, पालकवर्ग व ऐनाचीवाडी ग्रामस्थ यांचे योगदान लाभले. या सहकार्यातून शाळेचे स्वरूप अधिक सुंदर, सुरक्षित आणि आधुनिक झाले असून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.



शिक्षण परिषद उत्साहात

सुतारवाडी : खरबाचीवाडी वस्ती केंद्राची ऑक्टोबर २०२६ ची शिक्षण परिषद उत्साहात पार पडली. या परिषदेत शैक्षणिक गुणवत्ता, मूल्यवर्धन उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. या परिषदेला तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अतुल जगताप, कोलाड बीटाचे विस्तार अधिकारी नंदकुमार तेलंगे, मूल्यवर्धन उपक्रम मार्गदर्शक आशिष पवार आणि केंद्रसमन्वयक विजय इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक जगन राठोड आणि उपशिक्षक अमोल राठोड यांनी परिषदेच्या आयोजनात सहभाग घेतला. परिषदेला शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुनिता वालेकर, सदस्य गंगाराम काटकर, पांडू पवार, दुलबाजी पवार, अंगणवाडी सेविका सीता पवार आणि अंगणवाडी मदतनीस प्रमिला गोळे उपस्थित होते. शिक्षक, शैक्षणिक अधिकारी आणि ग्रामस्तरावरील प्रतिनिधी यांच्या सहभागामुळे परिषदेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा परिषदांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

राजेंद्र बांद्रे यांचे निधन

म्हसळा : आर.डी.सी. बँकेचे नुकतेच सेवानिवृत्त झालेले अधिकारी राजेंद्र तानु बांद्रे (म्हसळा-कुंभळे) यांचे मंगळवारी (दि.२७) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि सून, आई असा आप्त परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य दि.६ नोव्हेंबर रोजी त्यांचे मूळगाव कुंभळे ता.म्हसळा येथे होणार आहेत, अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली.



माथेरानमध्ये रानडुक्करांची झुंड

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान येथील जंगलात गेली महिनाभर सातत्याने बिबट्याचे दर्शन होत आहे. त्यामुळे प्रामुख्याने शाळेत जाणारी मुले आणि त्यांचे पालक भयभीत झाले आहेत. त्यात आता रानडुक्कर यांच्या कळपाने पालक आणि नागरिकांचे भीतीमध्ये आणखी वाढ झाली आहे.

माथेरान या वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वनसंपदा आहे, त्यामुळे वन्यजीव यांचा देखील मोठा अधिवास या भागातील जंगलात आहेत. परंतु आता हे वन्यजीव मानवी वस्तीत फिरताना दिसत असल्याने स्थानिक भयभीत झाले आहेत. दोन दिवसांपूर्वी रानडुक्कर यांच्या एक मोठा कळप कॉन्व्हेन्ट शाळेचे परिसरात दिसून आला. अनेक डुक्कर एकत्र फिरत असल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. ही रानडुक्कर यांची झुंड पाहून अनेक जण भयभीत झाले आहेत. त्यामुळे वन विभागाने यावर तत्काळ मार्ग काढावा, अशी मागणी पुढे आली आहे. तर वन विभाग केवळ जनजागृती करण्याचे सूचना देण्याचे काम करीत असल्याने वन विभागाने कडक पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.



शाळेत स्पोर्ट युनिफॉर्मचे वाटप

माथेरान : माथेरानमध्ये मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये सर्वसामान्य कष्टकरी लोकांची मुले शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासह क्रीडा साहित्य उपलब्ध असावे, यासाठी नेहमीच कुणी ना कुणी मदतीचा हातभार लावतो. मुंबई येथील निवृत्त रिझर्व्ह बँक अधिकारी दाम्पत्य शेखर वावीकर आणि टिनाज वावीकर यांच्या माध्यमातून शुक्रवारी (दि.३०) प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर माथेरान या शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्ट युनिफॉर्मचे वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रमेश ढोले, शिक्षक संघपाल वाठोरे, विनोद जाधव, अन्य शिक्षक वृंद यांच्यासह कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मुरूड बाजारपेठेत शिवमय वातावरण

■ मावळे, महाराजांच्या मूर्ती खरेदीसाठी चिमुकल्यांची लगबग

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

दिवाळी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. या सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठा सजू लागल्या आहेत. यंदा दिवाळीनिमित्त लहान मुलांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले उभारण्याचा उत्साह ओसंडून वाहत आहे. ऐतिहासिक गड-किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करून त्याभोवती मावळ्यांची मांडणी करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीसाठी मुलांची मुरूड बाजारपेठेत मोठी गर्दी होत आहे.

विशेष म्हणजे, किल्ल्यांची शोभा वाढविण्यासाठी मातीचे मावळे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या आकर्षक मातीच्या प्रतिमांना विशेष मागणी आहे. बाजारात एक मावळा १५ रुपये, तर महाराजांच्या मातीच्या प्रतिमा ५० ते ८० रुपये दराने विक्रीस उपलब्ध आहेत. आपल्या आवडीचे मावळे आणि महाराजांची प्रतिमा निवडताना मुलांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत आहे.



■ (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

दिवाळीत किल्ले बनविण्याची परंपरा आजही नव्या पिढीने जपली आहे. केवळ मनोरंजन नव्हे, तर या उपक्रमातून मुलांना शिवरायांचा पराक्रम, स्वराज्याची स्थापना, मावळ्यांचे शौर्य आणि महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास जवळून समजण्याची संधी मिळत आहे. आधुनिक युगातही शिवरायांच्या गड-किल्ल्यांविषयी मुलांच्या मनात असलेले आकर्षण कायम असल्याचे या गर्दीवरून दिसून येत आहे. त्यामुळे दिवाळीच्या निमित्ताने बाजारपेठेत खऱ्या अर्थाने शिवमय वातावरण निर्माण झाले आहे.

लक्ष्मीपूजनासाठी लाल रंगाच्या चोपड्यांची खरेदी

■ नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात करण्यासाठी व्यापारी सज्ज

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पनवेलच्या बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दीपावलीचा प्रत्येक दिवस आनंद, उत्साह आणि मांगल्याचा संदेश देणारा असतो. त्यातही लक्ष्मीपूजनाला व्यापारी वर्गात विशेष महत्त्व आहे. या दिवशी धनाची देवता लक्ष्मीचे पूजन करून नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात करण्याची परंपरा आहे.

व्यापारी वर्गासाठी लक्ष्मीपूजन म्हणजे केवळ धार्मिक विधी नसून नव्या आर्थिक वर्षाच्या व्यवहारांचा शुभारंभ करण्याचा दिवस असतो. त्यामुळे या दिवशी नवीन हिशेबाच्या चोपड्यांचे पूजन करण्याची परंपरा आजही जपली जाते. पनवेलच्या बाजारपेठेत लक्ष्मीपूजनासाठी खास लाल रंगाच्या आकर्षक चोपड्या विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. विविध आकारांतील या चोपड्यांना व्यापाऱ्यांकडून पसंती दिली जात आहे.



काही व्यापारी लक्ष्मीपूजनाच्या शुभमुहूर्तावर नवीन चोपड्या खरेदी करून त्यांचे पूजन करतात. डिजिटल व्यवहार आणि संगणकीय हिशेबाच्या युगातही पारंपरिक हिशेबाच्या चोपड्यांचे महत्त्व कमी झालेले नाही. अनेक व्यापारी आजही शुभमुहूर्तावर चोपड्यांमध्ये पहिली नोंद करून नवीन आर्थिक वर्षाचा श्रीगणेशा करतात.



शेतकऱ्यांना विळेवाटप

कोर्लई : मुरुड तालुका कृषी विभागातर्फे मजगाव ग्रामपंचायत हद्दीतील खारमजगाव येथे तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे यांच्या हस्ते शेतकऱ्यांना विळ्यांचे वाटप करण्यात आले. ९० शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला. यावेळी तालुका कृषी अधिकारी प्रमोद नरळे, कृषी सहाय्यक पराग भोजने, मजगांव कृषीमित्र अनंत कांबळे, महिला शेतकरी उपस्थित होते. ऐन भात कापणी हंगामात विळ्यांचे वाटप केल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

खरोशी दुरशेत ग्रामस्थांच्या श्रमदानातून वनराई बंधारा

। खरोशी । प्रतिनिधी ।

मागील एक ते दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने सध्या वातावरणात उष्णतेचे प्रमाण वाढले असल्याचे मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. त्यामुळे जमिनीवर असणाऱ्या पाणवठ्याच्या ठिकाणांमधील पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. त्यामुळे पुढील काही दिवसात मोठ्या पाणी संकटाला सामोरे जाऊ लागू नये, यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत लोकसहभागातून वनराई बंधारे बांधण्याचे निश्चित केले आहे. त्या अनुषंगाने पेण तालुक्यातील खरोशी दुरशेत ग्रामस्थांच्या श्रमदानातून बाळगंगा नदीवर वनराई बंधारा बांधण्यात आला आहे. पाणी आडवा पाणी जिरवा या योजनेअंतर्गत खरोशी दुरशेत येथे शनिवारी (दि.३१) बंधारा बांधण्यात आला. पावसाचे पाणी अडवून साठा करणे, भूजलपातळी वाढविणे, रब्बी पिकांना आणि गुरांना पाणी उपलब्ध करून देणे या शासनाच्या उपक्रमात ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.



लिफ्ट कोसळून आठ जण जखमी

मुंबई : नालासोपारा पश्चिम येथील पाटणकर पार्क परिसरातील धनंजय एव्हेन्यू या सात मजली निवासी इमारतीतील लिफ्ट कोसळली. शनिवारी (दि.३१)दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून आठ जण लिफ्टने तळमजल्यावर येत होते. यादरम्यान अचानक लिफ्ट वेगाने खाली कोसळली. लिफ्टला जोरदार धक्का बसून मोठा आवाज झाला. आवाज ऐकताच इमारतीतील रहिवाशांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर अथक प्रयत्नाने लिफ्टचा दरवाजा तोडून आत अडकलेल्या जखमींना बाहेर काढण्यात आले. या दुर्घटनेत आठ जण गंभीर जखमी झाले आहेत.

तळा येथे भ्रष्टाचाराविरुद्ध जनजागृतीचा जागर

। तळा । प्रतिनिधी ।

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाच्या वतीने २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर या कालावधीत दक्षता जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रायगड जिल्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तळा तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन भ्रष्टाचार निर्मूलनाबाबत जनजागृती केली.

रायगड जिल्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने गावागावात भेटी देऊन नागरिकांना भ्रष्टाचार कसा केला जातो, त्याची तक्रार कोठे आणि कशी करावी, याबाबत सविस्तर माहिती दिली. शासनाच्या १०६४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

यावेळी अधिकाऱ्यांनी नागरिकांना स्पष्ट आवाहन केले की, जो कोणीही सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी तुमचे काम करून देण्यासाठी पैशाची मागणी करीत असेल, त्याची तक्रार आमच्याकडे द्या. तुमचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवून त्या भ्रष्ट अधिकाऱ्यावर कठोर कारवाई केली जाईल. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन लढले पाहिजे, असे यावेळी सांगण्यात आले.

बालमेळाव्यात चिमुकल्यांची अंतराळभरारी | **नागरिकांसह विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

दिवाळी महोत्सवात महिलांच्या उद्योजकतेला बळ

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

दीपावली सणाचे औचित्य साधून पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने गुजराती शाळेच्या मैदानावर उद्योजिका दिवाळी महोत्सव आणि बालमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारपासून सुरू झालेल्या या महोत्सवाला नागरिकांसह विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

महिला उद्योजिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना देण्याचा प्रयत्न या महोत्सवातून करण्यात आला आहे.



या महोत्सवाचे खास आकर्षण ठरले आहे ते म्हणजे मैदानावर उभारण्यात आलेले तारांगण. या तारांगणाच्या माध्यमातून अंतराळातील विविध घडामोडी, ग्रह-तारे आणि अवकाशात घडणाऱ्या हालचालींची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवता येत आहे. त्यामुळे शाळकरी मुला-मुलींसाठी हा अनुभव कुतूहल आणि आनंदाची पर्वणी ठरत आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी या महोत्सवात वैज्ञानिक, अभियंता, स्वयंपाकी अशा विविध भूमिका साकारत आपल्या कल्पकतेचे दर्शन घडवले. विज्ञान आणि शिक्षणाची सांगड घालत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उपक्रमांना उपस्थितांकडून चांगली दाद मिळत आहे. तारांगणात प्रवेश केल्यानंतर अवकाशविश्वाची सफर अनुभवताना विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला प्रोत्साहन देतानाच बालकांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणारा हा महोत्सव पनवेलकरांसाठी दीपावलीची अनोखी पर्वणी ठरत आहे.

व्यवसायवृद्धीसाठी संधी उपलब्ध

महिला बचत गट आणि स्थानिक महिला उद्योजिकांनीही या महोत्सवात मोठ्या संख्येने सहभाग घेतला आहे. विविध खाद्यपदार्थ, दिवाळी फराळ, सजावटीच्या वस्तू आणि महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांचे स्टॉल येथे मांडण्यात आले आहेत. त्यामुळे महिला उद्योजिकांना आपल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी आणि व्यवसायवृद्धीसाठी चांगली संधी उपलब्ध झाली आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ नोव्हेंबर

१) श्रीम. सुमित्रा नागप्पा नायक
वरसोली, अलिबाग
दि.१-११-१९४९
२) श्री.मारूती गजानन पाटील
मु.धेरंड,अलिबाग, दि.१-११-१९३६
३) श्री. रोहिदास कृष्ण म्हात्रे
मु.आवास अलिबाग,
दि.१-११-१९४०
४) श्री.रघुनाथ बापू म्हात्रे
श्रीबाग-२, अलिबाग,
दि.१-११-१९५१
५)श्रीम.शैलजा गुरूनाथ बांदेकर
पंतनगर, अलिबाग
दि.१-११-१९५१
६)श्रीम.शुभदा शरद देशमुख
पिंपळभाट, अलिबाग
दि.१-११-१९५२
७)श्री.शंकर बाळकृष्ण पाटील
मु.कुरूळ, अलिबाग
दि.१-११-१९४५
८)श्री.सुरेश परशुराम पौडवाल
ठिकरूळ-नाका, अलिबाग
दि.१-११-१९५२

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

पावसाच्या लहरीपणाचा रब्बी हंगामाला फटका

। पाली, । प्रतिनिधी ।

मागील वर्षी परतीच्या लांबलेल्या पावसामुळे रायगड जिल्ह्यातील भातशेतीसह रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान झाले होते. मात्र यावर्षी चित्र पूर्णपणे उलट असून, पाऊस अपुरा पडल्याने आणि तो वेळेआधीच निघून गेल्याने जिल्ह्यावरील शेतीचे संकट कायम आहे. रब्बी हंगामाच्या सुरुवातीलाच पावसाच्या लहरीपणाचा फटका बसल्याने रायगडमधील शेतकऱ्यांचा घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली आहे. परिणामी, शेतकऱ्यांच्या हक्काच्या नाचणी, वरी आणि कडधान्य या नगदी पिकांवर मोठे संकट ओढावले आहे.



रब्बी हंगामाची सुरुवात साधारणपणे ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात होते आणि मार्च-एप्रिलपर्यंत तो चालतो. जिल्ह्यात रब्बी हंगामात साधारण बारा ते साडेपंधरा हजार हेक्टरवर कडधान्याचे पीक घेतले जाते. भातशेतीची कामे आटोपल्यानंतर शेतकरी कडधान्याची लागवड करतात, ज्यामुळे त्यांच्या उत्पन्नात भर पडते. मात्र, यावर्षी पावसाच्या लहरीपणामुळे पिकांना पूरक वातावरण मिळालेले नाही.. शेत व डोंगर उतारावरील जमिनी कोरड्या व कडक पडल्यामुळे तसेच ओलाव्याचा अभाव असल्यामुळे वरी व नाचणीची मशागत करणे शेतकऱ्यांना अशक्य झाले आहे. परिणामी, कडधान्य लागवडिसाठी शेतात पुरेसा ओलावा नसल्याने यंदा उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रायगड हा आदिवासी बहुल जिल्हा असल्याने येथील बांधव डोंगर उतारावर आणि माळरान किंवा वरकस जमिनीवर नाचणी व वरीची शेती करतात.

अनेक शेतकऱ्यांकडे हक्काची सपाट जमीन नसली तरी ते डोंगराळ भागावर जीवापाड मेहनत करून हे पीक घेतात. यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून त्यांचा घरखर्च चालतो आणि खायला धान्यही मिळते. मात्र, यंदा पावसाच्या लहरीपणामुळे शेतीचे नियोजन कोलमडले असून, या संकटाशी सामना कसा करावा, असा प्रश्न आदिवासी बांधवांसमोर उभा ठाकला आहे. मागील वर्षी पाऊस लांबल्यामुळे

● नाचणी, कडधान्य पिके धोक्यात

शेतीचे अतोनात नुकसान झाले होते, तर चालू वर्षी पाऊस कमी पडल्याने आणि तो लवकर गेल्याने रब्बी हंगाम धोक्यात आला आहे. शेतीचे शास्त्र असते, त्यानुसार प्रत्येक हंगाम सांभाळावा लागतो.

वेळेवर पाऊस न पडल्याने जमिनीची योग्य मशागत करता आली नाही आणि कडधान्य पिकाचा हंगाम हातातून निघून चालला आहे. या लहरी हवामानामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.हवामानाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.



वृक्षतोड विरोधात किसान क्रांती संघटना आक्रमक

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जतच्या टोरंट हायड्रो प्रोजेक्टच्या वृक्षतोडीस किसान क्रांती संघटनेचा तीव्र विरोध करण्याची भूमिका जाहीर केली. स्थानिक जंगलाची पाहणी केल्यानंतर किसान क्रांती संघटनेने आदिवासी लोकांशी चर्चा करीत जंगलतोड कायमची थांबली झाली अशी भूमिका घेतली. तर स्थानिकांच्या सोबत राहून आंदोलन करण्याची भूमिका किसान क्रांती संघटनेने जाहीर केली.

तालुक्यात होऊ घातलेल्या टोरंटमुळे होणाऱ्या मोठ्या प्रमाणावर वृक्षतोडीला किसान क्रांती संघटनेने तीव्र विरोध दर्शवला आहे. प्रकल्पाला आमचा विरोध नाही, मात्र पर्यावरणाचा विनाश करून तालुक्याला विनाशाच्या वाटेवर नेणाऱ्या विनाशकारी वृत्तीला आमचा ठाम विरोध आहे, अशी भूमिका संघटनेने घेतली आहे. या आंदोलनात भरत राणे, तालुका अध्यक्ष शरद तवले, काशिनाथ धुळे, रामदास माळी, सुरेश खानविलकर, विनायक देशमुख, रमेश जाधव, साधूराम पाटील, प्रकाश कांबरे, नवनाथ शेळके, रत्नाकर बडेकर, सुरेश राणे, जितेंद्र लेकुरवाले, अनिल गवले, हेमंत कोंडविलकर, धनंजय पाटील, कैलास झांजे आदीने पाहणी केली.

सिडकोच्या जलकुंभातून पाणी विक्रीचा संशय

। पनवेल । प्रतिनिधी ।

खारघर सेक्टर २७ येथील सिडकोच्या जलकुंभातून टेम्पोद्वारे पाणी भरून त्याची खासगीरीत्या विक्री केली जात असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे. या ठिकाणाहून एका टेम्पोतून सुमारे ५०० ते १,००० लिटर पाणी भरून नेले जात असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. या प्रकाराची सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाने तातडीने चौकशी करून अनधिकृत पाणी विक्री होत असल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी रहिवाशांकडून होत आहे.

खारघरमधील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने रहिवाशांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. काही सोसायट्यांना दैनंदिन गरजा भागविण्यासाठी खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. अशा परिस्थितीत सिडकोच्या जलकुंभातून पाणी भरून त्याची खासगी विक्री होत असल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

सिडकोच्या जलकुंभातून टेम्पोद्वारे पाणी भरण्यास कोणाला अधिकृत परवानगी देण्यात आली आहे का, तसेच या पाण्याचा वापर आणि विक्री नियमानुसार केली जात आहे का, याची पडताळणी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. संबंधित जलकुंभाची नियमित तपासणी करून पाणीपुरवठा व्यवस्थेतील संभाव्य गैरप्रकार रोखावेत, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणाची सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाने दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी. तसेच खारघरमधील नागरिकांना पुरेशा दाबाने आणि सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

बेकरेतील साठवण बंधाऱ्यांकडे शासनाचे दुर्लक्ष

। नेरळ । प्रतिनिधी ।

● दुष्काळावर मात करण्यासाठी पाणी अडवण्याचे आवाहन

दुष्काळाची स्थिती लक्षात घेऊन राज्यात पाणी अडवण्याचे आवाहन करण्यात आले होते.मात्र कर्जत तालुक्यात अनेक ठिकाणी पाणी साठवण बंधाऱ्यांमध्ये पाणी अडवण्याचा प्रक्रिया सरकारने पूर्ण केली नाही.कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील बेकरे पूल येथे असलेल्या सिमेंट बंधाऱ्याचे पाण्यावर अनेक नळपाणी योजना असताना देखील तेथील सिमेंट बंधाऱ्याला झडपा लावण्यात आलेल्या नाहीत. दरम्यान,स्थानिक ग्रामस्थांनी याबाबत नाराजी व्यक्त केली असून सरकारचे हेच का पाणी अडवण्याचे धोरण अशी टीका केली आहे.



कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वनराई बंधारे बांधले जात आहेत. मात्र कर्जत तालुक्यात उन्हाळ्यात कोरड्या पडणाऱ्या नद्यांमध्ये नाल्यावर बांधलेले सिमेंट बंधारे यांत अनेक ठिकाणी पाणी अडवण्याचा कार्यवाही सरकारने केलेली नाही.कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील माणगाव तर्फे वरेडी ग्रामपंचायतीमधील बेकरे पूल येथे आठ नळपाणी योजना अवलंबून असलेल्या सिमेंट बंधाऱ्याला अद्याप झडपा लावण्यात आलेल्या नाहीत. पाली भूतिवली धरणांमधून वाहून येणारे पाणी अडवण्यासाठी आणि उन्हाळ्यातील पाण्याची टंचाई कमी करण्यासाठी येथे जिल्हा परिषदकडून सिमेंट बंधारा बांधला आहे. मात्र त्या बंधाऱ्याला दुष्काळाच्या झडपा बसत असून देखील लोखंडी प्लेट लावून पाणी अडवण्याची आठवण कर्जत तालुक्याला प्रशासनाला नाही. याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली असून तालुक्यात दुष्काळ स्थिती असताना केवळ बोलायला पाणी अडवण्याची मोहीम हाती घेतली आहे काय? असा सवाल उपस्थित केला आहे. तर माजी सदस्य ॲड जयेंद्र कराळे यांनी हेच का सरकारचे पाणी अडवण्याचे धोरण असा टोला मारला आहे. तेथील पाणी साठवण बंधाऱ्याचे झडपा बसविल्या नाहीत आणि तेथे सांडवा फुटला असून देखील त्याकडे पाहायला सरकारला वेळ नाही असा आरोप देखील त्यांनी केला आहे.

साप्ताहिक राशिभविष्य दि. ०१ ते ०७ नोव्हेंबर २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

आत्मविश्वासात वाढ होईल

मेष : राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता प्रतिस्पर्धी व शत्रूंवर आपण मात करू शकाल. एकंदरीत भाग्यवृद्धीचा काळ आहे. आपल्या मनात विविध विचारांचे तरंग उमटतील. कुटुंबात सुख-शांती नांदेल. विवाहेच्छुकांच्या विवाहाचा मार्ग मोकळा होईल. भिन्नलिंगी व्यक्तीप्रती आकर्षित व्हाल. मात्र, संबंधात आपला अहंकार बाजूस सारावा लागेल. नवीन प्रकल्पांची सुरवात करू शकाल. प्रियव्यक्तीच्या सहवासाने आनंदित व्हाल. वडिलधाऱ्यांशी आपले संबंध सुधारतील. आपले आरोग्य उत्तम राहील. आजवर केलेल्या कामामुळे यश व कीर्ती यात वाढ होऊन आणखी काही करण्याचा उत्साह निर्माण होईल. आपल्या आत्मविश्वासात वाढ होईल. पाहुणे व मित्रांसह भोजनाचे आयोजन होऊ शकेल. नवीन वस्त्रालंकार व वाहन खरेदी करू शकाल. उत्तरार्धात आपल्या आरोग्यात उल्लेखनीय सुधारणा होऊन चेहेऱ्यावर त्याचे तेज दिसून येईल. **महिलांना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभ दिनांक :** ०२,०३.

दोषांचे निराकरण करा

सिंह : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता पूर्वार्धात चिंतन करून आपण आपल्या काही दोषांचे सुद्धा निराकरण करू शकाल. थोड्या प्रतिकूलतेस सामोरे गेल्या नंतर आपणास हळू हळू दिलासा मिळू लागेल. उत्तरार्धात गृह सजावटीचे कार्य हाती घ्याल. अतिरिक्त कामामुळे शरीरास थोडा थकवा जाणवला तरी त्यामुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता असल्याने आपण काही तक्रार करणार नाही. व्यावसायिक आघाडीवर आपल्या कष्टाचे फळ मिळू लागेल. सुरुवातीस आपली कामे नियोजनानुसार पूर्णत्वास नेण्यात परिश्रम करावे लागले. आपले फासे उलटे पडले तरी निराश न होता प्रयत्न चालू ठेवल्यास उत्तरार्धात यश प्राप्ती होईल. तसेच आपणास मानसिक दिलासा मिळेल. पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठांशी काही कारणाने वाद होणार नाहीत याची काळजी घ्या. कायद्याविरुद्ध कार्य किंवा अनैतिक कार्य करून आर्थिक प्राप्ती करण्याचे विचार मनातून काढून टाका. **महिलांना :** आपल्या प्रियव्यक्तीसाठी एखादी सुंदर वस्तू खरेदी करण्यासाठी आपण खर्च कराल. प्रियव्यक्ती, मित्र, नातेवाईक यांच्या सहवासात बहुतांश वेळ घालवाल. **शुभ दिनांक :** ०१,०४.

विचारपूर्वक निर्णय घ्या

धनु : राशीसाठी या सप्ताहात आपण या कालावधीत आरोग्यास विशेष काही त्रास होण्याची शक्यता नसली तरी पहिल्या तीन दिवसात पित्त प्रकोप, पोटात जळजळ, पायांच्या स्नायूंचे दुखणे होण्याची शक्यता आहे. शक्य तितका स्वभावातील उग्रपणा नियंत्रित ठेवलात तर संबंधात दुरावा निर्माण होणार नाही. प्रियव्यक्तीच्या सहवासाचा आनंद उपभोगू शकाल. एखाद्या रमणीय स्थळी फिरावयास किंवा छोटाश्या प्रवासास जाऊन आनंदात वेळ घालवू शकाल. पूर्वार्धात विद्यार्थ्यांना परिश्रम वाढवावे लागले तरी उत्तरार्धात त्याचे चांगले फळ मिळू शकेल. बौद्धिक प्रवृत्ती व चर्चेस आपण प्राधान्य द्याल. पूर्वार्धात आपणास आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. वाहन चालवताना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. महिलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घ्या. **महिलांना :** हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. **शुभ दिनांक :** ०३,०५.

चुकीचे निर्णय घेण्याची शक्यता

वृषभ : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पूर्वार्धात आपणास पत्नी, संतती, वडीलधारी व मित्र परिवाराकडून सुखद बातम्या मिळण्याची किंवा त्यांच्यामुळे काही फायदा होण्याची शक्यता आहे. कुटुंबियांकडून एखाद्या महागड्या वस्तूंची भेट मिळण्याची अपेक्षा बाळगू शकता. या सप्ताहात कोणत्याही बौद्धिक प्रतिभेशी संबंधित कार्ये, चर्चा इत्यादी दरम्यान थोडी काळजी न घेतल्यास आपणास खोटे ठरविण्यात येण्याची किंवा आपल्या हातून चुकीचे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. आपली विश्लेषण शक्ती मंदावल्यामुळे जेथे बुद्धीची नाही तर श्रमांची गरज असेल अशा गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे. सरकारी व कायदाकीय कारणांसाठी खर्च होऊ शकतो. **महिलांना :** आपली प्रतिमा मलीन होईल अशा कार्यापासून दूर राहावे. सध्या कोणास जामीन राहू नये. बँकेत सुद्धा कोणास जामीन राहू नका. संबंधातील अत्युच्च आनंद उपभोगू शकाल. त्यात सुद्धा उत्तरार्धात भिन्नलिंगी व्यक्तींशी खूप जवळीक साधू शकाल. या सप्ताहात उत्तरार्धात हृदयाच्या ठोक्यांची अनियमितता, पाठदुखी यांचा त्रास संभवतो. **शुभ दिनांक :** ०५,०६.

पदोन्नतीची मिळण्याची शक्यता

कन्या : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण व्यावसायिक आघाडीसाठी पूर्वार्ध अधिक अनुकूल आहे. व्यावसायिक आघाडीवर प्रतिस्पर्धी व शत्रूंवर आपण मात करू शकाल. आपल्या कौशल्याच्या जोरावर आपण लोकांच्या प्रशंसेस पात्र व्हाल. नोकरी करणाऱ्यांच्या कामात व विचारात सर्जनात्मकता दिसून आल्याने पदोन्नतीची शक्यता नाकारता येत नाही. उत्तरार्धात शासकीय व कायदाबाबत अडथळे येऊ शकतात. उत्तरार्धात आपली प्रतिमा मलीन होईल अशा कार्यांपासून दूर राहावे. पूर्वार्धात पिता किंवा वडिलधाऱ्या व्यक्तींकडून लाभ होईल. परंतु उत्तरार्धात पैतृक संपत्तीशी संबंधित कार्यात विघ्ने येण्याची किंवा अपेक्षेनुसार फलप्राप्ती न होण्याची शक्यता आहे. मित्र, पत्नी, संततीकडून लाभ होईल. स्त्री मित्रांकडून लाभ होईल. **महिलांना :** दांपत्य जीवनात सुद्धा पारस्परिक विचारातील प्रगल्भतेमुळे एकमेकांच्या सहवासाचा अत्युच्च आनंद उपभोगू शकाल. पती पत्नीत आपल्या दोघात एकमेकांप्रतीचे आकर्षण टिकून राहील. आरोग्याच्या दृष्टीने पूर्वार्ध चांगला आहे त्याचा आनंद घ्या. **शुभ दिनांक :** ०५, ०६.

दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका

मकर : हा सप्ताह मकरराशीसाठी आपले ग्रहमान पाहता दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत. आरोग्याच्या बाबतीत जे मागील काही दिवसांपासून आजारी होते त्यांना काहीसा दिलासा मिळेल. ज्यांना एलर्जी, त्वचा विकार किंवा एखादी जुनी समस्या असेल तर त्यांना उत्तरार्धात दिलासा मिळू शकेल. प्रणयी जीवनात पुढील वाटचाल गुलाबी होण्याची किंवा नवीन संबंधांची सुरुवात होण्याची शक्यता आहे. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. मोठ्या व्यक्तिनचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **महिलांना :** आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल. कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका. घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही. आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **शुभ दिनांक :** ०२,०५.

धार्मिक कार्यात सहभागी व्हा

मिथुन : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता पूर्वार्धात विद्यार्थ्यांचा अभ्यास उत्तम झाला तरी, उत्तरार्धात कोणत्याही विषयाचे खोलवर अध्ययन करण्यासाठी अधिक कष्ट करण्याची तयारी ठेवावी लागेल. या पूर्वार्धात व्यावसायिक आघाडीवर आपल्या कामांना गती येईल. आपल्या शब्दांचे मोल वाढेल. जी स्वप्ने मागील कालावधीत बघितली असतील ती आता प्रत्यक्षात येतील. आपल्या अंतर्ज्ञानात व कल्पनाशक्तीत भर पडेल. आपण आशावादी व सकारात्मक वृत्तीचे आचरण कराल. काही वेळा आपली गती मंदावली गेली तरी आपल्या वाटचालीत व निर्णयात ठामपणा नक्कीच राहील. आपणास नवीन व चांगल्या कार्याकडे लक्ष द्यावेच लागेल. आपण गृहस्थजीवनास सुद्धा योग्य महत्व देऊन त्यानुसार वाटचाल करण्याची तयारी ठेवाल. **महिलांना :** कुटुंबाप्रती आपला कल वाढत असल्याचे दिसून येईल. सप्ताहाच्या शेवटी आपली मनोरंजनाची इच्छा प्रबळ होईल. सामाजिक किंवा धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. समाजाप्रती आपले ऋण चुकविण्यासाठी आपण सक्रिय व्हाल. **शुभ दिनांक :** ०२, ०७.

वरिष्ठांच्या बोलण्याकडे लक्ष द्या

तुळ : राशीसाठी या सप्ताहात सुरुवातीला तुमचे शत्रू तुमचे काम बिघडवण्याचा प्रयत्न करतील. व्यापार-संबंधित लोकांना नुकसान होऊ शकते. असे झाले तरी तुम्हाला वरिष्ठ लोकांचे आणि कुटुंबातील मोठयांचे भरपूर साहाय्य मिळेल. नकोसे खर्चही वाढू शकतात. नव्या जबाबदाया मिळू शकतात. धनप्राप्तीचे योग आहेत. सामाजिक कार्यात तुम्ही सतत तत्पर राहाल. प्रेम-प्रसंग विवाहापर्यंत पोहोचण्याचे योग आहेत. आई-वडीलांच्या बोलण्याकडे पूर्ण लक्ष द्या, नाहीतर ते नाराज होऊ शकतात. पण व्यवस्थित समजवल्याने त्यांची नाराजी दूर होऊ शकते. स्वास्थ्य उत्तम राहील. कोणतेही नवे काम करण्याआधी त्याच्या प्रत्येक पैलूचा बारकाईने विचार करा. जोडीदारचे हवेत प्रेम आहे, त्याचा फायदा घ्या. कुठलीही गोष्ट मिळवण्यासाठी तुम्ही केलेली घाई-गडबड, नुकसान करू शकते. **महिलांना :** वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. आपण एखाद्या अशा व्यक्तीप्रती आकर्षित व्हाल की, जी आपल्याहून वयाने अधिक मोठी किंवा लहान असेल. **शुभ दिनांक :** ०५,०६.

कौटुंबिक वातावरण बिघडू नका

कुंभ : राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता विद्यार्थ्यांना कोणत्याही विषयाचा खोलवर अभ्यास करताना आपली आकलनशक्ती कमी असल्याचे जाणवेल. तरीही त्यांना अभ्यासाची गोडी लागल्याने उत्तरार्धात त्याचे चांगले परिणाम मिळू शकतील. त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. कामाशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपण कष्ट कराल. नवीन मैत्री करताना सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. नोकरदारांना दिलासा मिळेल. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. **महिलांना :** आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. पर्स भरलेली राहील. **शुभ दिनांक :** ०३,०६.

कुटुंबियांना थोडा वेळ द्या

कर्क : राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण या साप्ताहात कौटुंबिक आघाडीवर एखाद्या व्यक्तींशी आपल्या वागणुकीत उग्रता दिसून येईल. वाणी व वर्तनात काठिण्य राहील, तेव्हा काळजी घ्यावी. कोणत्याही बाबतीत हट्ट सोडण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आपण कुटुंबाप्रती अति संवेदनशील झाल्यामुळेच होणार असले तरी आपल्या भावना समजून घेण्यास कुटुंबियांना थोडा वेळ लागेल. त्यांच्या खुशीसाठी आपण वाहन, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा अन्य एखादी मोठी वस्तू खरेदी करण्याची शक्यता आहे. त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सध्या व्यावसायिक आघाडीवर सुद्धा अतिरिक्त परिश्रम कराल. घरातील संबंधात थोडी काळजी घ्यावी लागेल. विशेषतः जे आधीपासूनच दुर्लक्ष करत आहेत त्यांना प्रियव्यक्तीशी संबंधित एखाद्या बाबतीत सतत काळजी वाटेल. सध्या व्यापारसंबंधात आपणास थोडी अनिश्चितता जाणवेल. **महिलांना :** विवाहेच्छुकांना जोडीदाराची निवड विचारपूर्वक करावी लागेल. उत्तरार्धात प्रियजनांसह बाहेर फिरावयास जाण्याचे तसेच भोजनाचे आयोजन करू शकाल. **शुभ दिनांक :** ०१,०३.

दूरचा प्रवास टाळा

वृश्चिक : राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. व्यवसायात आपली बौद्धिक क्षमता प्रदर्शित झाल्याने नोकरीत पदोन्नती होऊ शकेल. व्यापाऱ्यांना दूरवरचे सौदे प्राप्त होण्याची शक्यता आहे. जे मुद्रण, रसायन, औषधे, शासकीय कार्य किंवा कंत्राट आदींशी संबंधित आहेत त्यांना उत्तरार्ध अधिक फलदायी होऊ शकेल. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पूर्वार्धात चांगली संधी मिळू शकेल. मात्र, व्यापक विचार केल्यास आपणास अभ्यासातील एकाग्रता वाढवावी लागेल. विद्यार्थ्यांना अभ्यासातील समस्यांचे निराकरण झाल्याने दिलासा मिळेल. तरी उत्तरार्धात विशेषतः रक्तदाब, हृदयाच्या ठोक्यांची अनियमितता किंवा डोळ्यांची जळजळ आदी समस्या होण्याची शक्यता आहे. **महिलांना :** नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा. मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. नोकरीत त्रास होईल. आर्थिक स्तरावर त्रासात राहू शकता. जोडीदाराचे वागणेही तुम्हाला त्रासात टाकू शकते. आपले प्राधान्य हे आपल्या कामांनाच असेल. **शुभ दिनांक :** ०६,०७.

मिळकतीचे नवेमार्ग सापडतील

मीन : राशीसाठी आपले ग्रहमान पाहता भौतिक सुखांमध्ये वृद्धी होईल. मिळकतीचे नवे मार्ग उघडतील. जुन्या समस्या निरोप घेण्याच्या मार्गावर आहेत. नव्या संपर्कांचा फायदा होईल. भौतिक सुखांमध्ये वृद्धी होईल. मिळकतीचे नवेमार्ग उघडतील. नोकरी किंवा व्यवसाय संबंधाने शहराच्या बाहेर जाण्याचे योग आहेत. हा सप्ताह साधारण असला तरी स्वास्थ्य ठीक-ठाक राहील. जोडीदाराची साथ मिळेल. तुमच्या बोलण्याचा मान राखला जाईल. धार्मिक कार्यात आवड वाढेल. तब्येत ठीक करण्यासाठी सकाळी फिरायला जावे. मनासारखी स्थळं न मिळाल्याने निराशा राहील. वडील आणि भावाशी वाद होतील. वाहन चालवताना अति-दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. मद्यपान करताना संयम ठेवा. जुनी थांबलेली कामे मार्गी लागतील. कोणालाही खोटे आश्वासन देऊ नका, पाऊस चांगला झाल्याने शेतकऱ्यांनाही फायदा होईल. विरोधक शांत राहतील. **महिलांना :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. **शुभ दिनांक :** ०४,०७.

शाळांचा शैक्षणिक दर्जा घसरतोय

● माजी सभापती रविंद्र लाड यांचा आरोप

शाळा वाचविण्यासाठी आता ठोस उपाययोजनांची गरज

जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी शासनाने आणि शिक्षण प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज आहे. गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी यांसारखी महत्त्वाची पदे शक्य तितक्या लवकर सक्षम अधिकाऱ्यांमार्फत भरावीत, प्रभारी नियुक्त्यांना कायमस्वरूपी पर्याय बनू देऊ नये, शाळांच्या नियमित तपासणीची प्रभावी व्यवस्था निर्माण करावी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन पारदर्शक पद्धतीने करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

। म्हसळा । प्रतिनिधी ।

संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा परिषद शाळांची शैक्षणिक गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत असून, अनेक शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. ग्रामीण भागातील गोरगरीब आणि सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा मुख्य आधार असलेल्या जिल्हा परिषद शाळांची ही अवस्था चिंताजनक आहे. सरकारी शाळांवरील विश्वास कमी होण्यामागे केवळ बदलती परिस्थिती नव्हे, तर शिक्षण विभागातील प्रशासकीय अनागोंदी, जबाबदारी निश्चित करण्यातील उदासीनता आणि सक्षम अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबतची कमकुवत भूमिका कारणीभूत असल्याचा परखड आरोप म्हसळा पंचायत समितीचे माजी सभापती रविंद्र लाड यांनी केला आहे.

यासंदर्भात ते आमच्या प्रतिनिधीशी बोलताना म्हणाले की, जिल्हा परिषद शाळांची परिस्थिती अशीच राहिली, तर भविष्यात गोरगरीब कुटुंबांतील मुलांनी शिक्षण कुठे घ्यायचे आणि त्यांचे शैक्षणिक भविष्य कसे घडणार, हा गंभीर प्रश्न निर्माण होईल. शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क असून, आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये. मात्र, सरकारी शाळांची घसरती गुणवत्ता आणि शाळा बंद होण्याची वाढती समस्या यामुळे सर्वसामान्य पालकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.शिक्षण विभागातील पदे भरणे आणि योग्य प्रशासकीय यंत्रणा कार्यरत ठेवणे, ही शासन व प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. मात्र, वरिष्ठ आणि सक्षम अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबत शासनाची उदासीनता दिसून येत असल्याचा मुद्दा रविंद्र लाड यांनी उपस्थित केला. गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार सक्षम व अनुभवी अधिकाऱ्याकडे सोपविण्याऐवजी एखाद्या केंद्रप्रमुखाकडे सोपविला जात असेल, तर त्याचा परिणाम संपूर्ण शैक्षणिक व्यवस्थेवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे, विस्तार अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार केंद्रप्रमुख किंवा अन्य शिक्षकांकडे सोपविण्याची पद्धतही शैक्षणिक प्रशासनाच्या दृष्टीने योग्य आहे का, याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.प्रभारी अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त जबाबदाऱ्या सोपविताना त्यांची शैक्षणिक पात्रता, प्रशासकीय अनुभव, उपलब्ध वेळ आणि प्रत्यक्ष कामकाजावर होणारा परिणाम यांचा विचार होणे गरजेचे आहे.

प्रभारी पदांवर नियुक्त्या केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांच्या कामाचे नियमित मूल्यमापन, जबाबदारी निश्चित करणे आणि कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मात्र, पदभार दिल्यानंतर संबंधित व्यक्तीच्या कामावर अपेक्षित देखरेख नसेल, तर प्रशासकीय शिस्तीवर परिणाम होऊ शकतो, अशी टीका लाड यांनी केली.

जिल्हा परिषद शाळांची घसरती गुणवत्ता ही केवळ शिक्षण विभागाची अंतर्गत बाब नाही; ती ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित आहे. प्रशासनाने जबाबदारी ओळखून सक्षम अधिकारी नियुक्त करावेत आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी ठोस कृती करावी. अन्यथा, सर्वसामान्य कुटुंबांतील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न अधिक गंभीर होईल, असा इशारा रविंद्र लाड यांनी दिला.

जिल्हा परिषद शाळा या ग्रामीण समाजाच्या शैक्षणिक प्रगतीचा पाया आहेत. त्यामुळे म्हसळा तालुक्यासह राज्यातील जिल्हा परिषद शाळांच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन शिक्षण विभागातील प्रशासकीय त्रुटी दूर करण्यासाठी शासन कोणती ठोस पावले उचलते, याकडे आता सर्वसामान्य पालकांचे लक्ष लागले आहे.

ग्रुप ग्रामपंचायत शेल
मु.शेल, पो.कांबळे तर्फे बिरवाडी, ता.महाड, जि.रायगड

दिनांक : ३१/१०/२०२६

!! जाहीर नोटीस !!

सर्व नागरिकांना व इच्छुक उमेदवारांना याद्वारे कळविण्यात येते की, ग्रामपंचायत शेल अंतर्गत 'शिपाई' (Peon) हे पद मानधनावर/कंत्राटी पद्धतीने/कायमस्वरूपी भरण्यासाठी पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी आपले कर्ज आवश्यक कागदपत्रांसह मुदतीपूर्वी ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावेत.

१. पदाचा तपशील :
पदाचे नाव : शिपाई (Peon)
एकूण पदे : संख्या ०१
मानधन / वेतन : ग्रामपंचायत नियमांनुसार/शासनाच्या नियमांनुसार -

२. शैक्षणिक व इतर पात्रता :
शैक्षणिक पात्रता : किमान इयत्ता ७ वी/१० वी उत्तीर्ण.
वय मर्यादा : किमान १८ वर्षे आणि कमाल ३८/४३ वर्षे
स्थानिक रहिवासी : उमेदवार ग्रामपंचायतीचे शेल गावातील/परिसरातील रहिवासी असावा (प्राधान्य दिले जाईल.)
चारित्र्य : उमेदवारी चारित्र्य चांगले असावे व त्याच्यावर कोणताही गुन्हेगारी खटला नसावा.
३. आवश्यक कागदपत्रे (अर्जासोबत जोडायची यादी) :
* विहित नमुन्यातील अर्ज
* शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र/गुणपत्रक (टीसी/शाळा सोडल्याचा दाखला)
* वयाचा पुरावा.
* जातीचा दाखला.

४. भरतीचे वेळापत्रक :
अर्ज करण्याचे ठिकाण : ग्रामपंचायत कार्यालय शेल,
अर्ज स्वीकारण्याची सुरूवात : दिनांक : ०१/११/२०२६ ते ०४/११/२०२६
वेळ : सकाळी ११:०० ते सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत..
महत्त्वाच्या अटी व शर्ती :
* मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
* अपुर्ण माहिती असलेले किंवा आवश्यक कागदपत्रे नसलेले अर्ज बाद केले जातील.

भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अंतिम अधिकार मा. सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक, ग्रामपंचायत शेल यांच्याकडे राखीव राहतील.

स्थळ: शेल
दिनांक : ३१/१०/२०२६

सही/-
(संतोष रामदास तायडे)
ग्रामपंचायत अधिकारी
ता.महाड, जि.रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत शेल
ता.महाड, जि.रायगड

आदिवासी लोकांचा वन हक्क परत मिळवून द्यावा

आदित्य ठाकरे यांच्याकडे लाखाची वाडी ग्रामस्थांची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

लाखाची वाडी पुलाची वाडी येथील सरकारी जमीन टोरंट कंपनीला भाडेतत्वावर देण्यात आली आहे.ती ९६ एकर जमीन आदिवासी लोकांना वन हक्क कायद्याने परत द्यावी अशी मागणी स्थानिकांनी आदित्य ठाकरे यांच्याकडे केली आहे.



भालीवडी ग्रामपंचायत मधील पुलाचीवाडी आणि लाखाची वाडी या परिसरातील सुमारे ९६.८० एकर जमीन शासनाने टोरंट कंपनीला दिली आहे.या जमिनीच्या हस्तांतरणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून पाली येथील सायडोंगर येथील पंप स्टोरेज प्रकल्पासाठी देण्यात आलेली जमिनीबाबत स्थानिक ग्रामपंचायत आक्रमक आहे. आदिवासी लोकांची अनेक वर्षाची वहिवाट असलेली जमीन देण्यात आल्याने प्रचंड नाराजी पसरली असून न्यायालयापर्यंत दाद मागण्यात आली आहे. त्यानंतर देखील त्या जमिनीवर टोरंट कंपनीने आणखी मोठ्या प्रमाणात अधिकार दाखवला आहे. सदर जमीन आज टोरंट कंपनीशी संबंधित कंपनीच्या नावावर नोंद झाली आहे.पुलाचीवाडी येथील गट क्रमांक ९८/१ मधील ३९.१७ हेक्टर म्हणजेच सुमारे ९६.८० एकर जमिनीची नोंद ६ ऑगस्ट २०२६ रोजी झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या नोंदीची माहिती २२ ऑगस्ट रोजी मिळाल्याचा दावा निवेदनकर्त्यांनी केला आहे. संबंधित फेरफार क्रमांक ९५२ रद्द अथवा स्थगित करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

याबाबत शासन दरबारी पाठपुरावा करणारे स्थानिक शेतकरी मंगेश सोमा म्हसे आणि मिनेश मसणे यांनी शिवसेना नेते आमदार तथा माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांची भेट घेऊन न्याय देण्याची मागणी केली. त्यावेळी खासदार संजय राऊत आणि अँड परब यांच्याशीही या विषयावर चर्चा करून त्यांना संपूर्ण प्रकरणाची माहिती दिल्याचे मंगेश म्हसे यांनी दिली. जमीन हस्तांतरणाच्या प्रक्रियेत विश्वासात घेतले नसल्याचा तसेच ग्रामसभेची प्रक्रिया पार पडली नसल्याचा आरोप केला आहे.

मुख्यमंत्री सचिवालय पथकाची नागोठणे आरोग्य केंद्रास भेट



। नागोठणे। प्रतिनिधी।

राज्यातील आरोग्य केंद्रांची सद्य परिस्थिती तसेच तेथे येणाऱ्या रुग्णांवर करण्यात येणारे उपचार व आवश्यक त्या सोयी सुविधा यांची माहिती घेण्यासाठी मुख्यमंत्री सचिवालयाकडून खास आरोग्य पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. याच आरोग्य पथकाचा सध्या रायगड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देण्याचा कार्यक्रम सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्रात गुरुवार दिनांक २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास मुख्यमंत्री सचिवालयातील सहा जणांचा समावेश असलेल्या या आरोग्य पथकाने भेट देऊन प्राथमिक आरोग्य केंद्राची विविध बाबतीत तपासणी केली. या तपासणीचा अहवाल मुख्यमंत्री सचिवालयाला सादर करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री सचिवालयातील पथकाने नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देऊन केलेल्या तपासणी मध्ये ओ. पी.डी., ट्रीटमेंट रूम, नोंदणी कक्ष, फार्मसी / औषध भांडार, पुरुष वॉर्ड व महिला वॉर्ड, शासकीय विभाग, हिंद लॅब व इन-हाऊस लॅब, एच.ए. रूम या विभागाच्या तपासणीसह विशेष बाब म्हणून ई-शुश्रुत अंतर्गत पेपरलेस पी.एच.सी. पॅटर्नची या पथकाने सविस्तर तपासणी केली व त्याबद्दल नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

पनवेलमध्ये दुचाकी चोर अटकेत

पनवेल : चार लाख रुपये किमतीची बीएमडब्ल्यू मोटारसायकल चोरी केल्याप्रकरणी पोलिसांनी नाशिक येथील अमोल शिरसाठ याला अटक केली आहे. त्याच्याकडून चोरीची बीएमडब्ल्यू मोटारसायकल हस्तगत करण्यात आली असून, तपासादरम्यान कळंबोली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचाही संबंध उघड झाला आहे. या प्रकरणातील संशयित राकेश गोकुळ राठोड हा अद्याप फरार असून, त्याचा शोध सुरू आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

वैद्यकीय महाविद्यालयात कायाकल्प स्वच्छता मोहीम

। रायगड । प्रतिनिधी ।



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अलिबाग येथे ङ्कायाकल्पफ उपक्रमांतर्गत विशेष स्वच्छता मोहिमेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. स्वच्छ, सुंदर, आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक संस्थात्मक परिसर निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या मोहिमेला महाविद्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी या स्वच्छता मोहिमेला सुरुवात झाली. मोहिमेचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी डॉ. महादेव घोरपडे यांनी नोडल अधिकारी म्हणून महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. यावेळी कम्युनिटी मेडिसिन विभागाचे विभागप्रमुख डॉ. संतोष हराळकर यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

या मोहिमेमध्ये महाविद्यालयातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच इतर कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. सर्वांनी एकत्रितपणे श्रमदान करत महाविद्यालयाचा परिसर, कार्यालयीन जागा, विभागांच्या आजूबाजूचा परिसर तसेच सार्वजनिक वापराच्या ठिकाणांची स्वच्छता केली.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सावळे, ता. कर्जत, जि.रायगड येथील हक्कोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक उषा अशोक जोहरी व परशुन अशोक जोहरी यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मौजे सावळे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ	आकार रू.पै
८२	१०	०-१८-००	०-१६

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०१/११/२०२६
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
समीर हरिश्चंद्र लाड
फ्लॅट नं ३०१, राजलक्ष्मी अपार्टमेंट,
अभिनव ज्ञान मंदीर जवळ, कर्जत, कर्जत, रायगड

जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसाद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे सुरई, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकती आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्रीमती. शोभना काशिनाथ गडमुळे आणि विद्यमान मालक श्रीमती तारामती हरिश्चंद्र चुणेकर वगैरे यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरह् मिळकत या निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरुपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरह् मिळकती या निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळवावे.

मौजे सुरई, ता. अलिबाग, जि. रायगड

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	खाते क्र.	क्षेत्रफळ (हे.आर)	आकार (रु.पैसे)	विद्यमान मालकाचे नाव
मौजे सुरई ता. अलिबाग	२८८	१४६	०.८७.८०	१.४२	श्रीमती.शोभना काशिनाथ गडमुळे
		३१३	१.५७.७	२.५६	श्रीमती. तारामती हरिश्चंद्र चुणेकर वगैरे

अलिबाग
दिनांक : ३०/१०/२०२६

ॲड. निखिल चव्हाण
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ७०५७५२०३९८

- जाहीर नोटिस-

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक विवेक रामचंद्र वालावलकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा व्यवहार सुद्धा ठरविला आहे.

बिनशेती मिळकतीचे वर्णन

मौजे वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड भुमापन क्र. व उपविभाग १६६/१९०/१९६/१९७/१९८/१४७, क्षेत्र ४-५०-०० हे.आर., आकार रु.४५.०० ही बिनशेती जमीन मिळकत हा या नोटिसीचा विषय आहे.

तरी वर वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्न-वस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०१.११.२०२६

सही/-
मिलिंद चव्हाण
ॲडव्होकेट
८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२

● नोकरीची सुवर्णसंधी! - अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!, ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक, आकर्षक पगार, नोकरीचे ठिकाण: अलिबाग, रायगड मुलाखतीसाठी आजच संपर्क साधा! ९९२३७५०५३९/९१०५७१७०३८ इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा! चांगल्या पगारासह नोकरीची उत्तम संधी!

● Vacancy in Office Education- Bsc/Bcom, Salary - 15000 Per month, Location - Bamansure, Contacat- 9823585321

● Vacancy in Furniture Showroom Education- Bsc/Bcom, Experience -2 Years, Salary - 20,000 Per month, Location - Zirad, Contacat- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

न्यू इंग्लिश स्कूल जोहे येथे 'न्यूजपेपर क्लब'



। भाकरवड । वार्ताहर ।

जे. एस. डब्ल्यू एस्पायर डोलवी मॅजिक बस इंडिया फाऊंडेशन आणि बाल पंचायतीचा पुढाकाराने न्यू इंग्लिश स्कूलमध्ये न्यूजपेपर क्लबची स्थापना करण्यात आली आहे.

हा क्लब सुरू करण्यासाठी शाळेत स्थापन करण्यात आलेल्या बाल पंचायतीने पुढाकार घेतला असून, शाळेतील शिक्षक आणि ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. यासाठी एकदंत मित्र मंडळ जोहे आणि किनारा फाउंडेशन यांच्या माध्यमातून दर महिन्याला शाळेला वर्तमानपत्रे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रे वाचता यावीत, यासाठी शाळेने स्वतंत्र कोपरा उपलब्ध करून दिला आहे. या ठिकाणी वर्तमानपत्रे व्यवस्थित ठेवणे, त्यांचे वितरण करणे, वर्तमानपत्रे कोणत्या विद्यार्थ्यांनी वाचली याची नोंद ठेवणे तसेच त्यांची योग्य काळजी घेणे, या सर्व जबाबदाऱ्या बाल पंचायतीचे सदस्य पार पाडणार आहेत.

या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शाळेच्या दैनंदिन परिपाठामध्ये वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या बातम्या आणि घडामोडी वाचण्यात येणार आहेत.

कामगारांच्या मागण्यांचे संयुक्त निवेदन

उरण : पोर्ट तुतीकोरीन येथे कामगारांच्या प्रश्नावर महत्वाची बैठक संपन्न झाली.भारतातील १२ प्रमुख बंदर प्राधिकरणांमधील कंत्राटी कामगारांसाठी समान वेतन, सामाजिक सुरक्षा आणि योग्य सेवा शुर्तींची मागणी करण्यासाठी मान्यताप्राप्त कामगार महासंघांनी संयुक्त निवेदन दिले आहे. दीर्घकाळापासून सुरू असलेल्या भरती बंदीमुळे बंदरांवर कंत्राटी कामगारांचे प्रमाण वाढले आहे. समान श्रेणीतील नियमित कर्मचाऱ्यांच्या सुरुवातीच्या वेतनाएवढे असावे, अशी मागणी करण्यात आली होती.

सराई नजीक प्राचीन कलावंतीणीचा वाडा भग्नावस्थेत

। चौल । प्रतिनिधी ।

चौलला ऐतिहासीक वारसा आहे, येथे अनेक प्राचीन मंदिरे तसेच वास्तू आजही पहावयास मिळतात. चौल परिसरातील सराई नजीक कलावंतीणीचा वाडा हा त्यापैकीच एक आहे. मुसलमानी पध्दतीचा आदिलशाही व निजामशाही राजवाटीच्या काळात करमणुकीसाठी कलावंतीणीचा वाडा बांधला असावा असे सांगितले जाते. त्याकाळी कलावंतीणीचा वाडा चौलची ओळख होती असे इतिहासात वाचावयास मिळते. पुरातत्व खात्याकडे असलेल्या कलावंतीचा वाडा पूर्णतः भग्नावस्थेत असल्याचे दिसून येते.



चौल ते वावे मुख्यः रस्त्यालगत चौल ग्रा.प.हद्दीतील सराई नजीक प्राचीन कलावंतीणीचा वाडा आहे. या वाड्याच्या समोरील व मागील बाजू ठीकठाक अवस्थेत आहे, मात्र आजूबाजूची तटबंदी पूर्णतः भग्न झालेली दिसते. त्याच्या दर्शनी बाजूस घडीव दगडाच्या तीन शिखर असलेल्या कमानी व तीन विटांनी बांधलेले घुमट होते.

सभागृहात तीन घुमट व दोन्ही बाजूस दोन मोठया देवळया होत्या. त्याच्या पश्चिमेला ५० पावले रूंद व ७० पावले लांब अशी चहुबाजूनी भिंती बांधलेली जागा होती. या कलावंतीनीच्या वाड्याच्या पाठीमागे मोठे तळे आहे, प्राचीन काळी येथील कलाकारासाठी पाण्याची सोय असू शकेल. ऐतिहासीक नजरेतून त्या वास्तूत शांतपणे उभे राहिल्यास प्राचीन काळी धिरकणाऱ्या घुंगराचा आवाज आणि नाद कानावर पडल्याशिवाय राहत नाही.

ऐतिहासिक काळाचा साक्षीदार असलेला कलावंतीणीचा वाडा पूर्णतः भग्नावस्थेत असून या ऐतिहासिक ठेवाची जपणूक करणे गरजेचे आहे. सध्या कलावंतीणीचा वाड्याच्या आतील बाजूस शेतीक केली जात आहे. तर बाजूकडील तलावाचे पाणी स्थानिक ग्रामस्थांच्या पाण्याची गरज भागविते.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



राशीभविष्य

- **मेष** : वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात संधींचा लाभ घ्यावा. स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **वृषभ** : कलाकारांचा उत्साह वाढेल. मनाप्रमाणे सारं घडत जाईल. गेलेल्या संधी पुन्हा चालून येणार आहेत.
- **मिथुन** : किरकोळ बाबींचा ताण राहील. संततीबाबत चिंता निर्माण होईल. वाहन, यंत्राचा वापर जपून करा.
- **कर्क** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. आर्थिक स्थैर्य लाभेल.
- **सिंह** : जुनी येणी वसूल होतील. नव्या योजना मार्गी लागतील. महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील.
- **कन्या** : विवाहाबाबत तडजोडीची भूमिका ठेवावी. कौटुंबिक समस्यांबाबत समाधान लाभेल. चिंता करू नये.
- **तूळ** : अचानक धनलाभ संभवतो. वास्तुविषयक प्रश्नातून मार्ग निघेल. महत्त्वाचे करार फायदेशीर ठरतील.
- **वृश्चिक** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **धनु** : विचारांना कृतीची जोड मिळेल. एकाच वेळी विविध कामांवर लक्ष द्याल. प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **मकर** : चिंता वाढवणाऱ्या घटना संभवतात. विद्यार्थ्यांना अडचणी येतील. प्रवासात सावधगिरी बाळगावी.
- **कुंभ** : अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल. भागीदारी व्यवसायात प्रगती होईल. स्थावर प्रश्नात लाभ होईल.
- **मीन** : महत्त्वाच्या कामात दिलासा मिळेल. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. कौटुंबिक सौख्य लाभेल.

१ नोव्हेंबर

दिन विशेष

१९५२ : अमेरिकेकडून पहिल्या हायड्रोजन बॉंबची चाचणी.
१९६७ : आकाशवाणीने 'विविध भारती' या कार्यक्रमामध्ये प्रथमच मुंबई, पुणे आणि नागपूरहून जाहिरात प्रसारण सेवा सुरू केली.
१९७३ : लखदीव, मिनिकॉय आणि अग्निदीव या द्वीपसमूहांचं लक्षद्वीप असं नामकरण करण्यात आलं.
२०१३ : 'पाकिस्तान तालिबान'चा प्रमुख हकीमुल्ला महसूदचा अमेरिकेच्या ड्रोन हल्ल्यात खात्मा.

आरोग्यमंत्र

जंतूसंसर्ग टाळण्यासाठी...

जखम उघडी राहिली तर जंतूसंसर्गाचा धोका असतो. म्हणूनच छोट्या-मोठ्या जखमेकडे दुर्लक्ष न करता तातडीने उपचार घ्यायला हवेत. जखमेतून खूप रक्त गेल्यास तब्येतीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते त्याचबरोबर फारसं रक्त गेलं नसलं तरी जंतूसंसर्गामुळे आतल्या अवयवांना धोका पोहोचण्याची शक्यता असते. त्यामुळे साधी जखम झाली तरी लगेच डॉक्टरांकडे जायला हवं. अपघात किंवा इतर कारणांमुळे तीव्र स्वरूपाची जखम होते. यात त्वचा आणि टिश्यू फाटल्यामुळे बराच रक्तस्राव होतो. या जखमेवर तातडीच्या उपचारांची गरज असते हेदेखील लक्षात घ्यावं. साध्या जखमेवर घरच्या घरी उपचार करता येतात. सर्वात आधी जखम स्वच्छ करून घ्यावी. जखमेवर लागलेली घाण, कचरा काढून टाकावी. साधी जखम बरी व्हायला साधारण पाच दिवसांचा काळ लागतो. या काळात जखम स्वच्छ आणि कोरडी ठेवणं महत्त्वाचं असतं. या काळात भरपूर आराम करायला हवा. जखमेवर बँडेज बांधता येईल. साध्या जखमा बँडेजशिवायही बऱ्या होतात. मात्र जखम चिघळताना दिसल्यास डॉक्टरकडे जायला हवं. त्याचबरोबर जखम अर्ध्या इंचापेक्षा जास्त खोल असल्यास, रक्तस्राव न थांबल्यास, रक्तस्राव २० मिनिटांपेक्षा जास्त काळ होत असल्यास, गंभीर अपघातानंतर रक्तस्राव होत असल्यास डॉक्टरांकडे जायला हवं. यावेळी तज्ज्ञांकडे जाणं टाळणं घातक ठरु शकतं.



कोण होणार?

भूगोल आवडतो?

मुलांनो, शाळेत तुम्ही भूगोल शिकता. भूगोल आवडत असेल तर त्यात उच्च शिक्षण घेता येईल. भूगोलाशी संबंधित विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. जिओग्राफी, हायड्रोग्राफी तसंच आयटीमधली पदवी मिळवून तुम्ही या क्षेत्रात करीअर करू शकता. आता जिओग्राफिक इन्फॉर्मेशन सिस्टिमचा आवाका खूपच वाढला आहे. तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे या क्षेत्रात असंख्य संधी निर्माण झाल्या आहेत. स्मार्ट गाइडन्स सिस्टिम तयार करण्यापासून नैसर्गिक स्रोतांचा शोध घेण्यासाठी उपग्रहांची मदत घेईपर्यंत बऱ्याच गोष्टींसाठी भूगोलाची मदत घ्यावी लागते. बारावीनंतर या क्षेत्रात विविध अभ्यासक्रम करता येतील. जियोइन्फॉरमेटिक्समध्ये बीई, रिमोट सेन्सिगमध्ये बीई किंवा बीटेक, जीआयएस अँड रिमोट सेन्सिंगमध्ये बीटेक करून पुढे जाता येईल. नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर, इंडियन रिमोट सेंसिंग एजन्सी, प्लॅनिंग कमिशन, जियोलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, युनिक आयडेंटिफिकेशन ॲथोरिटी ऑफ इंडिया आदी संस्थांमध्ये तुम्ही काम करू शकता. त्यामुळे ही वेगळी वाट आहे असंच म्हणता येईल.

ग्रूमिंग

- आपण घाईगडबडीत जोरात केस पुसतो. यामुळे केस गळू लागतात. म्हणूनच हलक्या हातांनी केस पुसा.
- केसांना शँपू लाऊन भागणार नाही. स्कॅल्पलाही नीट शँपू लावा. यामुळे स्कॅल्पवरची धूळ, घाण निघून जाईल.
- केसांवर फार प्रयोग करू नका. विविध उत्पादनांचा मारा करू नका. जेल किंवा स्प्रे अगदी कमी प्रमाणात लावा.

ब्युटी टॉक

टिकवा त्वचेचा तजेला

- सीरममुळेही त्वचेचा पोत सुधारतो. क जीवनसत्त्वयुक्त सीरमचा वापर करा. यामुळे त्वचेला नवतजेला मिळेल. दिवसातून दोनदा टोनरचा वापर करा.
- थंडीतही सनस्क्रीन आवश्यक आहे. दिवसा घराबाहेर पडताना चेहऱ्याला सनस्क्रीन लावा. यामुळे सूर्याच्या घातक किरणांचा प्रभाव त्वचेवर पडणार नाही.
- त्वचेला वेळोवेळी एक्सफोलाइट करणं गरजेचं आहे. यासाठी चांगल्या स्क्रबचा वापर करा. स्क्रबमुळे मृत त्वचा निघून जाते आणि तुमचा चेहरा छान तजेलदार दिसतो.
- मेक अप केल्यानंतर तो काढणंही गरजेचं आहे. यासाठी मेक अप रिमूव्हर जवळ बाळगा. वॉटर प्रूफ मेक अप काढणं खूप गरजेचं आहे. त्यामुळे मेक अप रिमूव्हर घेताना कोणतीही तडजोड करू नका.

पंचांग

रविवार, १ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अश्विन कृ. ७, चंद्रराशी : कर्क, नक्षत्र : पुष्य, योग : साध्य, सूर्योदय ६.४१, सूर्यास्त ६.०३

फॉरवर्ड्स

ग़लत हैं ये यारो क़ि हम वफ़ादार नहीं...

सच तो ये हैं क़ी हम अदाकार नहीं...!

करिअरवाटा

काय आहे वेलनेस कन्सल्टन्सी?

अलिकडच्या काळात ब्युटी पार्लरला जोडून वेलनेस कन्सल्टंट हा व्यवसाय विकसित झाला आहे. ब्युटी पार्लरमध्ये प्रसाधनांच्या वापराने चेहरा उठावदार केला जातो. परंतु त्वचेचा प्रकार आणि मूळ व्यक्तिमत्व यांचा विचार करून एखाद्या स्त्रीला नेमकी कोणती प्रसाधनं योग्य ठरतील याचा निर्णय वेलनेस कन्सल्टंट घेत असतो. केवळ प्रसाधनांचा वापर केल्यामुळे माणूस परिपूर्ण होत नाही. त्यासाठी चेहऱ्याचा रंग, केशरचना, कपडे, जीवनशैली आणि माणसाचा एकंदर स्वभाव, व्यवसाय, वय, शरीराची ठेवण या सगळ्यांचा साकल्याने विचार करावा लागतो. हा विचार वेलनेस कन्सल्टन्सीमध्ये येतो. इमारतीच्या बांधकामामध्ये आर्किटेक्टची भूमिका असते तीच भूमिका वेलनेस कन्सल्टंटची माणसाच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीत असते. या संदर्भातील अभ्यासक्रम हा पूर्णपणे व्यावसायिक असतात. त्यादृष्टीने पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अशा स्वरूपाचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. हे अभ्यासक्रम उपलब्ध असणाऱ्या संस्थांची माहिती विद्यापीठांमधून तसंच इंटरेटद्वारेही प्राप्त करता येईल. आगळीवेगळी कारकिर्द म्हणून या संधीचा विचार अवश्य करायला हवा



खेचाखेची

लय भारी

कॉलेजला असताना मी एवढा भारी दिसायचो, की दुसऱ्या मुलीकडे बघायला लागलो तर...

मॅडम म्हणायच्या, तिकडे बघू नको, माझ्याकडे लक्ष दे!

वेगळं काही

चीनमधल्या झेजियांग प्रांतातल्या शाळकरी मुलांना रात्री दहा वाजता झोपणं अनिवार्य करण्यात आलं आहे. गृहपाठ उरला तरी तो न करता मुलांनी झोपायला हवं, असं फर्मान काढण्यात आलं आहे. इथल्या शिक्षण विभागाने ३३ सूत्री अजेंडा जारी केला आहे. इतकंच नाही, तर इतरांशी आपल्या मुलांची तुलना करू नये, अशी सूचना पालकांना करण्यात आली आहे. अर्थात पालकांचा या नियमाला विरोध आहे. पालकांच्या मते हा होमवर्क कर्फ्यु आहे. मुलांनी गृहपाठ केला नाही तर ती स्पर्धेत मागे पडतील अशी भीती पालकांनी व्यक्त केली आहे. यासोबतच सुट्टीच्या दिवशी मुलांकडून जास्तीचा अभ्यास करून घेऊ नये, अशी सूचनाही करण्यात आली आहे.

महिलायन

सामोपचाराची भूमिका ठेव

मी सोळा वर्षांच्या मुलाची आई आहे. माझा पतीशी वाद आहे, त्यामुळे मी घटस्फोट घेऊ इच्छिते. पण असं केल्यास मी बाबांबरोबर राहणार असं मुलाचं ठाम मत आहे. मी मात्र मुलाशिवाय राहू शकणार नाही. यामुळे सध्या मी पूर्ण निराश आहे. काय करु?

– विचारभिन्नता, मतभेद, तणावग्रस्त संबंध ही बऱ्याच जोडप्यांमधील विसंवादाची कारणं आहेत. तुझ्याप्रमाणे संसारात मन रमत नसणाऱ्या अनेक स्त्रिया केवळ मुलांकडे बघून दिवस ढकलत राहतात. पण एका टप्प्यानंतर त्यांचे ते प्रयत्नही फसतात. तू देखील याच कारणामुळे व्यग्र आहेस. पण धीर सोडू नकोस. आधी मुलाला विश्वासात घे. त्याला तुमच्यामधील विसंवादाची कल्पना दे. पतीशी संबंध सुधारण्यासाठी तू घेतलेले प्रयत्नही त्याला समजायला हवेत. शक्य असेल तर पतीशी संवाद साधून संसार वाचवण्याचा प्रयत्न कर. कारण मुलगा मोठा झाला म्हणजे तुम्ही संगोपनाच्या जबाबदारीतून मोकळे झाला असं नाही. दोघांनीही तडजोड करुन संसार वाचवण्याचा प्रयत्न करा. ते साधलं तर चांगलं.



सुडोकू १६९

	३	७	९		८		१	
५		८					९	३
२			१		३			
		४	५	९				
	७	२				३	५	
				३	२	६		
			३		६			७
४	८					२		५
	९		४		५	८	६	


टीप -

- या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
- आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
- अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत

सुडोकू १६८ चे उत्तर

३	७	२	४	१	८	६	९	५
५	९	८	७	३	६	२	४	१
६	१	४	२	९	५	७	३	८
१	६	९	३	५	४	८	२	७
२	३	५	६	८	७	४	१	९
८	४	७	९	२	१	५	६	३
४	२	३	५	७	९	१	८	६
९	५	१	८	६	२	३	७	४
७	८	६	१	४	३	९	५	२

शब्दकोडे क्रमांक १६९



आडवे शब्द :-

१) *** *** *** *** धम्मक लाडू, एक बालगीत
१०) पुष्परस
१२) अरण्य
१३) डोंगराचा तुटलेला भाग
१४) फुगणे, फोपावणे
१६) चुलता(हिं.)
१७) काव्य करणारा
१८) सौम्य धोरण
२०) एक अधिक एक चतुर्थांश
२१) खण, कप्पा
२३) धरणी
२५) पंख
२७) वरपांगी
२९) शरीरात सर्व भागात रक्त फिरणे
३२) कट्टा
३३) नेत्र
३५) शोध, माग
३६) च्या सह
३८) कलावंत
४०) मित्र
४१) गदळ, घाण
४३) मान्यता
४४) हालचालीवर ठेवलेली नजर
४५) आवाजांचा गोंधळ
४८) सदन
५०) चंद्र
५१) चादर
५२) रावणाला ठार मारणारा
५४) छोटी लढाई
५५) छाया
५७) शेवटच्या श्वासाचा आवाज
६०) च्या जवळ
६१) माराची उमटलेली खूण
६२) अनेकांच्या हाती सत्ता अव्यस्थित कारभार
६७) पोळी भाजण्याचे पात्र
६९) रेशमी धोतर
७०) अटीच्या भाषेतील दोन शब्द
७२) सदोदित
७३) मला टोचणारे दु:ख
७४) प्रज्वलित, तापलेले

उभे शब्द:-

२) अतिशयोक्ती करणे (वा.प्र.)
३) विद्यापीठातील विभागप्रमुख (इं.)
४) विद्यापीठाची पदवी प्राप्त झालेला
५) अंकुर
६) हिंदीत गूळ
७) हत्तीचे ओरडणे
८) तत्क्षपोशी, कडीपाट,
९) मोड
१०) एक सुगंधी वनस्पती
११) कोथिंनीरीचे बीज
१५) रेशीमाचे जाडसर कापड
१६) एक समसंख्या
१९) मन, मनातील विचार
२२) स्त्री, बाई
२४) नदीचा काठ
२५) अट, शर्त
२६) पातळसर
२८) छाती
३०) किरात
३१) उसाचे गुऱ्हाळ
३२) लहान बाळाचे चुंबन
३३) डोके
३४) पुष्पगुच्छ
३५) हद्दपार
३७) एकाग्र नजर
३८) भयंकर
३९) कावीळ, हळद्या रोग
४०) युद्ध भूमी
४२) छोटी लढाई
४६) मोठी कळशी
४७) डोक्यावर मारलेली हलकीशी चापट
४८) पक्का, भरपूर
४९) फजिती
५०) आठवड्यातील पहिला कामाचा दिवस
५२) श्रीरामाचे एक नाव
५३) असह्य वेदना
५६) खेकसणारा, तोंडाळ
५८) जननी
५९) धन्यवादाचा एक शब्द
६२) ढग
६३) सूर्याचे एक नाव
६४) नोकर
६५) चांदी
६६) रत्न
६८) दिवस
६९) सत्वांश
७१) दारूचा एक प्रकार
७५) नमन, वंदन

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

रा	ख		रा	त्रं	दि	व	स		ता	प	ट		प	व	न
म		भा	स		व		व	रो	जा		ण		हा	र	
र	पे	ट		वा	स	ला	त		त	ड	क	सा	र		वा
स	ट		क	ल	भ			ल	वा			सू		चां	दी
		आं			र	म	णी		ना	त			पां	ग	
ह	स्तां	दो	ल	न		नो		व		ला	ज	रा		ला	
य		ल		व	खा	र		सा	क	व			पा		त
ग		न	ख	रा		थ	र		म		स	ड	क		न
य	क्ष		वा	न	र		स	र	ळ		न	ग		सा	य
		का		व		त		क		म	ग	र	मि	ठी	
पा	ड		सु	री		मा	त	म		दा	र		ला		पो
व		मा	र		स		गा		वा	री		अ	व	क	ळा
न	व	ला	ई		ध		ई	श्व	र		क	प	ट		
खिं		मा		ह	न	न		स		प	सा	रा		म	स
ड	ब	ल		त्या		म	द	न	ता	त		ध	ड	ध	ड
	क		श	र	म		शा		ट	न			फ		का

‘आबांची झाडे’



धनंजय शेटये

झाडे हीच खरी आपली संपत्ती आहे. झाडे हेच खरे सखेसोबती आहेत. झाडं आहेत म्हणून आपण आहोत. झाड प्राणवायू देतात म्हणून आपण जीवंत आहोत. या वृक्षवल्लीचं आपण अमाप देणं लागतो पण आपण मात्र या निसर्गाची विल्हेवाट लावण्यासाठी नेहमीच तयार असतो. विकासाच्या नावाखाली अनेक झाडांची कत्तल करून टाकली जात आहे. परिणामी पावसाचे प्रमाण अत्यल्प होत चालले यांचे दुष्परिणाम मानवाला भोगावे लागत आहेत. आपणच आपल्या पायावर दगड पाडून घेण्यासाठी आपण सज्ज झालो आहेत. एकदिवस आपल्या याच कृत्याने आपला घात होणार आहे. आपल्या पूर्वज वनराईला देवासमान मानत होते. वनराई कोयता लावत नव्हते म्हणून सुखसंपत्ती नांदत होती.

कोकणातल्या लाल मातीत, निसर्गाच्या कुशीत विसावलेल्या त्या चार एकर रानात एक वेगळीच जिवंत सृष्टी श्वास घेत होती. आबा व्हाळकरांच्या त्या हिरव्यागार बागेत उंचच उंच गेलेली सागाची झाडे आकाशाला गवसणी घालत होती, तर आंबा आणि फणसाच्या झाडांच्या फांद्या फळांच्या भाराने नव्हे, तर प्रेमाने जमिनीकडे झुकल्या होत्या. आज वयाची सत्तरी ओलांडलेल्या आबांचा जीव या प्रत्येक झाडात, त्यांच्या प्रत्येक पानात आणि फांदीत गुंतलेला होता. जेव्हा आबा शाळेत जाणारे एक निष्पाप मूल होते, त्याच कोवळ्या वयात त्यांनी आपल्या हातांनी या इवल्या इवल्या रोपांना मातीत रुजवले होते. आबांच्या वाढत्या वयासोबतच ही रोपेही लहानाची मोठी झाली आणि आज ती डेरेदार, छत्रछाया देणारी भलीमोठी झाडे बनून डौलाने उभी होती.

एकेकाळी आबांचा संसार गजबजलेला होता. शेतीवाडी, वावरे आणि गोठ्यात दावणीला बांधलेली दुभती जनावरे असा भरलापुरा संसार होता त्यांचा. उभ्या आयुष्यात आबा शेतात राब राब राबले; मातीशी इमान राखत त्यांनी घाम गाळला. पण संसाराचा गाडा हाकता हाकता स्वतःच्या गाठीशी मात्र त्यांनी कधी काही शिल्लक ठेवले नाही. आबांना तीन मुलगे आणि एक लाडकी कन्या. घरादाराला शोभा आणणारी ही लेकरे मोठी झाली आणि पोटापाण्याच्या, उदरनिर्वाहाच्या निमित्ताने शहराच्या धकाधकीत निघून गेली. दुर्दैवाने आबांची अर्धांगिनीही फार लवकर संसार अर्ध्यावर सोडून देवाघरी निघून गेली. तरीही आबा खचले नाहीत. त्यांनी रक्ताचे पाणी करून, थाटामाटात चारही मुला-मुलींची लग्ने लावून दिली आणि त्यांचे संसार उभे केले. पण काळाचा महिमा कसा विचित्र असतो! ज्या लेकरांसाठी आबांनी संपूर्ण आयुष्य वेचले, तीच मुले आपापल्या संसारात, नोकरीत आणि पैशांच्या हव्यासामध्ये एवढी मग्न झाली की, त्यांना गावाकडच्या म्हाताऱ्या बापाचा पुरता विसर पडला. ज्या वाड्यात कधी मुलांच्या किलबिलाटाने आनंदाचे उधाण येत असे, आज त्याच अथांग पसरलेल्या प्रशस्त घरात आबा अगदी एकाकी, निष्प्रभपणे जगत होते. बोलायला, सुख-दुःख वाटून घ्यायला चिटपाखरूही सोबत नव्हते. स्वतःच्या रक्ताने जन्म दिलेल्या पोटच्या पोरांना म्हातारा बाप म्हणजे घराच्या अडगळीत टाकून दिलेली जुनी, निरुपयोगी वस्तू वाटू लागली होती. काही वर्षांपूर्वी आबा मुंबईला आपल्या मुलांकडे, नातवंडांच्या गोतावळ्यात राहायला गेले खरे; पण सिमेंटच्या जंगलात, फ्लॅटच्या बंदिस्त भिंतींमध्ये आणि माणसांच्या आक्रंदत्या गर्दीत आबांचा जीव गुदमरू लागला. त्यांना तेथील कृत्रिम हवामान आणि नात्यांमधील कोरडेपणा अजिबात मानवला नाही. शेवटी आबा शहराचा तो पाषाणी पसारा सोडून सरळ आपल्या मातीत परतले; आपल्या मूळ कुटुंबात, म्हणजेच त्या हिरव्यागार झाडांच्या कुशीत परत आले.

आता आबांचा खराखुरा परिवार, त्यांचे सखे-सोबती म्हणजे ही झाडेच होती. आजही आबांचा दिनक्रम अगदी आखीव-रेखीव होता. रोज तिन्हीसांजेच्या वेळी आबा मंद पावलांनी आपल्या झाडांच्या भेटीला जात. एखाद्या लहान बाळाच्या अंगावरून मायेने हात फिरवावा, तसे ते खोडांवरून हात फिरवत. सुकलेल्या फांद्या अलगद तोडून झाडांची निगा राखत. एखाद्या लहान रोपाची पाने करपलेली दिसली, तर स्वतः घागरीतून पाणी आणून मोठ्या वात्सल्याने त्याला तृप्त करत. आबा झाडांशी मनातल्या गुजगोष्टी करत आणि झाडेही आपल्या पानांच्या मंद सळसळीतून आबांशी जणू संवाद साधत असत.

यंदा तर जणू निसर्गालाच आबांचे पांग फेडायचे होते. बागेतील हापूस आणि पायरीच्या आंब्यांना सोन्यासारखा बहर आला होता. फांद्या लदबदून गेल्या होत्या. पोटच्या पोरांनी ज्या बापाला म्हातारपणात वाऱ्यावर सोडले होते, त्याच बापाचे अश्रू पुसण्यासाठी या मुक्या आंबा-फणसाच्या झाडांनी वात्सल्याची अखंड परतफेड सुरू केली होती. फळांच्या विक्रीतून आबांच्या गाठीशी या वर्षी चार सुखाचे पैसेही जमा झाले होते.

पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच होते. एके दिवशी दुपारी आबा बागेत आंब्याच्या झाडावर चढून मोठ्या कौतुकाने आंबे काढत होते. अचानक आबांचे डोके गरगरले, दृष्टीसमोर अंधारी आली आणि क्षणात आबांचा तोल जाऊन ते जमिनीवर जोराने कोसळले. काळजाचा ठोका चुकावा असा तो प्रसंग होता. आबा जमिनीवर निपचित पडले आणि त्याच क्षणी, जणू संपूर्ण बागेत एक भीषण शांतता पसरली. ज्या माऊलीने आयुष्यभर आपल्याला पाणी घातले, अंगाखांद्यावर खेळवले, तीच माऊली आज रक्ताच्या थारोळ्यात संकटात पडलेली पाहून आंबा, फणस आणि सागाच्या झाडांच्या पानापानांवरून भयाचे शहारे दाटून आले. पानांची सळसळ थांबली होती, पक्ष्यांचे गाणे मूक झाले होते; आबांची ती लाडकी झाडे जणू आकाशाकडे पाहत मुक्याने टाहो फोडत होती. सुदैवाने, बागेजवळून जाणाऱ्या वाडीतल्या ग्रामस्थांच्या नजरेस आबा पडले. त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता आबांना उचलले आणि नजीकच्या मोठ्या रुग्णालयात दाखल केले. वेळेत उपचार मिळाल्यामुळे आबांचे प्राण थोडक्यात वाचले; पण डॉक्टरांनी तपासणी करून सांगितले की, त्यांच्यावर तात्काळ एक गंभीर शस्त्रक्रिया करावी लागेल आणि त्यासाठी किमान नव्वद हजार रुपयांचा खर्च येईल.

एवढी मोठी रक्कम ऐकताच गावकरी काळजीत पडले. सत्तरीच्या म्हाताऱ्या आबांकडे एवढे पैसे कुठून असणार? रुग्णालयाच्या व्हरांड्यात उभे असलेले गावातील काही तरुण अस्वस्थपणे कुजबुजू लागले, ‘‘एवढा मोठा खर्च आबा कसा करणार? आबांच्या शहरातल्या मुलांनाच फोन करूया आणि त्यांना पैशांची व्यवस्था करायला सांगूया. शेवटी त्यांचीच ती जबाबदारी आहे.’’ ‘‘अरे पोरांनो, थांबवा तो फोन! नका करू त्या शहरातल्या लेकरांना लाचार होऊन याचना. अरे, या वर्षी माझ्या पोटच्या पोरांनी भलेही माझ्याकडे पाठ फिरवली असेल, पण माझ्या या जमिनीवरच्या मुक्या पोरांनी माझ्या बागेतल्या झाडांनी आपल्या बापाचे ऋण व्याजासकट फेडले आहे! आंब्याचे आणि काजूचे मिळून हक्काचे ऐंशी हजार रुपये माझ्या पेटीत जमा आहेत आणि दहा हजार रुपये माझ्या कमरेच्या धोतराला बांधलेले आहेत. नव्वद हजार पूर्ण आहेत माझ्याकडे! अरे, ही माझी झाडे म्हणजे केवळ लाकडे नव्हेत, हाच माझा खराखुरा श्वास आणि परिवार आहे. कोण म्हणतं या झाडांना भावना नसतात? त्यांना काळीज नसतं? मी असा संकटात पडणार आहे हे बहुधा माझ्या या हिरव्या लेकरांना आधीच ठाऊक असावे, म्हणूनच त्यांनी या वर्षी एवढे भरघोस पीक देऊन आपल्या म्हाताऱ्या बापाच्या शस्त्रक्रियेची सोय आधीच करून ठेवली होती!’’आबांची शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वी झाली. काही दिवसांतच आबा खडखडीत बरे होऊन पुन्हा आपल्या लाडक्या बागेत परतले. गावकऱ्यांनी जेव्हा आबांना पुन्हा झाडांना प्रेमाने कवटाळताना पाहिले, तेव्हा संपूर्ण गावाला झाडांचे खरे मोल, त्यांचे अस्तित्व आणि पर्यावरणाचे महत्त्व लखखपणे समजले. ●

जीवनदान जिल्हा परिषद शाळांना!



संजय कचरे

शाळा वाचविण्यापासून गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या परिवर्तनापर्यंत...

शाळा म्हणजे केवळ इमारत नाही, तर एका पिढीच्या भविष्याचा आधार !ग्रामीण भारताच्या सामाजिक आणि शैक्षणिक विकासामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः ग्रामीण, दुर्गम, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलांसाठी या शाळा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचे एक महत्त्वाचे माध्यम आहेत. अनेक गावांमध्ये जिल्हा परिषद शाळा ही मुलांच्या शिक्षणाची पहिली आणि अनेकदा एकमेव सहज उपलब्ध संधी असते.

या शाळा केवळ अक्षरओळख करून देत नाहीत, तर मातृभाषेतून शिक्षण, जीवनशिक्षण, व्यवहारज्ञान, सामाजिक जाणीव, संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासाची पायाभरणी करतात. ग्रामीण भागातील अनेक पिढ्यांचे शैक्षणिक भविष्य घडविण्यात या शाळांचा मोठा वाटा राहिला आहे.मात्र आज याच शाळांसमोर अस्तित्वाचे गंभीर आव्हान उभे राहिले आहे. महाराष्ट्रातील अनेक मराठी माध्यमाच्या जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थीसंख्या कमी होत आहे. कमी पटसंख्येमुळे काही शाळा बंद पडण्याच्या किंवा इतर शाळांमध्ये विलीन होण्याच्या मार्गावर आहेत. एखादी शाळा बंद होणे म्हणजे केवळ एक शैक्षणिक संस्था बंद होणे नव्हे; तर त्या गावातील पुढच्या पिढीच्या शिक्षणाचा एक महत्त्वाचा आधार कमकुवत होणे होय. विशेषतः दुर्गम भागांमध्ये पर्यायी शाळा दूर असल्यास मुलांच्या शिक्षणात खंड पडण्याची, मुलींचे शिक्षण थांबण्याची आणि वंचित समाजघटक पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर जाण्याची शक्यता निर्माण होते.

म्हणूनच आज प्रश्न केवळ शाळा वाचविण्याचा नाही, तर त्या शाळांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या सक्षम संस्था बनविण्याचा आहे.

१. जिल्हा परिषद शाळांसमोरील आव्हाने : विद्यार्थीसंख्या कमी होण्यामागील कारणे

शाळांमधील विद्यार्थीसंख्या कमी होण्यामागे एकच कारण नाही. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय अशा अनेक घटकांचा एकत्रित परिणाम यामागे आहे.

१. रोजगारासाठी ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर

ग्रामीण भागातील मर्यादित रोजगाराच्या संधींमुळे अनेक कुटुंबे शहरांकडे आणि औद्योगिक क्षेत्रांकडे स्थलांतरित होतात. ऊसतोड कामगार, बांधकाम मजूर, शेतमजूर आणि रोजंदारीवर काम करणाऱ्या कुटुंबांच्या मुलांचे शिक्षण वारंवार खंडित होते. काही मुले स्थलांतरित पालकांसोबत गावाबाहेर जातात, तर काहींचे शैक्षणिक सातत्य टिकविणे कठीण होते. परिणामी गावातील शाळांची विद्यार्थीसंख्या कमी होते.

२. इंग्रजी माध्यमाचे वाढते आकर्षण आणि सामाजिक दबाव

आज समाजामध्ये इंग्रजी माध्यम म्हणजे गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उज्ज्वल भविष्य, अशी धारणा निर्माण झाली आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे पालकांचा वाढता कल दिसून येतो. मराठी माध्यमातून शिक्षण घेतल्यास मुलांच्या भवितव्यावर मर्यादा येतील, अशी भीती अनेक पालकांच्या मनात निर्माण झाली आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थिती अनुकूल नसतानाही पालक मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पाठविण्याचा प्रयत्न करतात.

३. शैक्षणिक गुणवत्ता आणि पायाभूत सुविधांमधील तफावत

काही जिल्हा परिषद शाळांमध्ये आधुनिक शैक्षणिक साधने, डिजिटल शिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय, खेळाचे साहित्य, स्वच्छतागृहे आणि बालस्नेही वातावरण यांचा अभाव आहे. बदलत्या शैक्षणिक अपेक्षा आणि पालकांच्या गरजांनुसार शाळांमध्ये आवश्यक सुधारणा न झाल्यास पालकांचा विश्वास कमी होतो.

४. शासकीय स्तरावरील नियोजन आणि अंमलबजावणीतील मर्यादा

शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक असलेले सातत्यपूर्ण नियोजन, पुरेशा संसाधनांची उपलब्धता, वेळेवर निर्णय, शैक्षणिक निरीक्षण आणि स्थानिक गरजांनुसार हस्तक्षेप यामध्ये अनेकदा मर्यादा जाणवतात. केवळ विद्यार्थीसंख्येच्या निकषावर शाळांचे भवितव्य ठरविण्याऐवजी त्या शाळेचे भौगोलिक स्थान, सामाजिक महत्त्व आणि स्थानिक समुदायाची गरज लक्षात घेणे आवश्यक आहे.

५. शिक्षकांवरील अतिरिक्त कामांचा ताण आणि उत्तरदायित्वाचा अभाव

शिक्षक हे शिक्षणव्यवस्थेचे केंद्रबिंदू आहेत. मात्र अध्यापनाव्यतिरिक्त विविध प्रशासकीय कामे, सर्वेक्षणे आणि इतर जबाबदाऱ्यांमुळे त्यांच्या अध्यापनाच्या वेळेवर परिणाम होतो. त्याचबरोबर काही ठिकाणी अध्यापनातील उदासीनता, नव्या पद्धती स्वीकारण्याबाबतचा अभाव आणि व्यावसायिक बांधिलकीची कमतरता यांचाही शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होतो. शिक्षकांना आवश्यक सहकार्य आणि उत्तरदायित्व या दोन्ही गोष्टींचा समतोल राखणे गरजेचे आहे.

६. पालक आणि स्थानिक समुदायाचा अपुरा सहभाग

शाळा ही केवळ शासनाची किंवा शिक्षकांची जबाबदारी नसून संपूर्ण गावाची सामूहिक जबाबदारी आहे. मात्र अनेक ठिकाणी पालक, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती आणि स्थानिक संस्था यांच्यात अपेक्षित समन्वय आणि सक्रिय सहभाग दिसून येत नाही.

२. शाळा बंद पडल्यास होणारे सामाजिक आणि शैक्षणिक परिणाम

शाळेची विद्यार्थीसंख्या कमी होणे ही केवळ शैक्षणिक आकडेवारीतील बाब नाही. तिचे परिणाम संपूर्ण ग्रामीण समाजाच्या विकासावर होऊ शकतात.

शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका: दुर्गम भागातील मुलांना पुढील शाळा दूर असल्यास प्रवास, वाहतूक आणि सुरक्षिततेच्या अडचणी निर्माण होतात.

मुलींच्या शिक्षणावर परिणाम: शाळेचे अंतर वाढल्यास आणि सुरक्षित वाहतुकीची सुविधा नसल्यास मुलींचे शिक्षण थांबण्याची शक्यता वाढते.

आदिवासी आणि वंचित समाजाचे नुकसान: आधीच मर्यादित शैक्षणिक संधी असलेल्या समाजघटकांसाठी शिक्षणाचा उपलब्ध आधार
कमकुवत होतो.स्थलांतरित मुलांचे शैक्षणिक नुकसान: वारंवार स्थलांतरामुळे शाळेतील सातत्य आणि अध्ययन प्रक्रिया प्रभावित होते.

मातृभाषेतील शिक्षणाच्या संधी कमी होणे: मुलांच्या भाषिक समज, सांस्कृतिक जडणघडण आणि अभिव्यक्तीला मातृभाषेतील शिक्षणाचा महत्त्वाचा आधार मिळतो.गावाच्या सामाजिक विकासावर परिणाम: शाळा ही गावातील सामाजिक, सांस्कृतिक आणि सामुदायिक जीवनाचे महत्त्वाचे केंद्र असते. तिचे अस्तित्व संपल्यास गावाच्या सामूहिक विकासावरही परिणाम होतो.

३. आता गरज आहे ती केवळ शाळा वाचविण्याची नाही, तर शाळा बदलण्याची!

मराठी जिल्हा परिषद शाळा टिकल्या पाहिजेत, परंतु त्या केवळ अस्तित्व टिकविणाऱ्या नसाव्यात. त्या आधुनिक, गुणवत्तापूर्ण, आनंददायी, विद्यार्थी-केंद्रित आणि जीवनोपयोगी शिक्षण देणाऱ्या बनल्या पाहिजेत.

शाळांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी शासन, शिक्षण विभाग, शिक्षक, पालक, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था आणि संस्था यांनी एकत्रितपणे नियोजनबद्ध प्रयत्न करणे आवश्यक आहे.

४. जिल्हा परिषद शाळांच्या पुनरुज्जीवनासाठी महत्त्वाच्या उपाययोजना

१. शाळांचे सर्वांगीण मूल्यांकन

प्रत्येक शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, पायाभूत सुविधा, शिक्षकांची उपलब्धता, विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता, स्वच्छता, सुरक्षितता आणि शाळेतील वातावरण यांचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करावे. केवळ सुविधा उपलब्ध आहेत का, हे न पाहता त्यांचा प्रत्यक्ष वापर आणि परिणाम तपासावा. त्यावर आधारित शाळानिहाय विकास आराखडा तयार करावा.

२. गुणवत्ता व्यवस्थापन आणि आधारित शाळा विकास

शाळांमध्ये ९००१:२०१५ सारख्या गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीचा अवलंब करून शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रक्रियांमध्ये शिस्त, सातत्य आणि उत्तरदायित्व निर्माण करता येईल. अध्यापन, विद्यार्थी उपस्थिती, पालक सहभाग, स्वच्छता, सुरक्षा आणि शाळा व्यवस्थापनासाठी निश्चित कार्यपद्धती विकसित करता येतील. गुणवत्ता ही केवळ प्रमाणपत्रापुरती मर्यादित न राहता शाळेच्या दैनंदिन कामकाजाचा भाग बनली पाहिजे.

३. आधुनिक आणि डिजिटल शिक्षण सुविधा

डिजिटल वर्गखोल्या, स्मार्ट टीव्ही, संगणक, विज्ञान साहित्य, समृद्ध ग्रंथालय, शैक्षणिक खेळ आणि प्रयोगाधारित शिक्षणाच्या माध्यमातून मुलांना आनंददायी व अनुभवाधारित शिक्षण देता येईल. तंत्रज्ञानाचा वापर हा शिक्षकांना पर्याय म्हणून नव्हे, तर अध्यापन अधिक परिणामकारक करण्यासाठी केला पाहिजे.

४. शिक्षक सक्षमीकरण आणि व्यावसायिक विकास

शिक्षकांसाठी आधुनिक अध्यापन पद्धती, डिजिटल साधनांचा वापर, बालमानसशास्त्र, कृतीआधारित शिक्षण आणि अध्ययन निष्पत्ती यांवर नियमित प्रशिक्षण आयोजित करावे. शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ, शैक्षणिक संसाधने आणि आवश्यक संस्थात्मक पाठबळ उपलब्ध करून द्यावे. शिक्षकांच्या नवकल्पना आणि चांगल्या कार्यपद्धतींचा गौरव करावा.

(क्रमशः)

पालकांना समजून घेणारी शाळा आणि शाळेला विश्वासाने साथ देणारे पालक



सुनील गवळी

शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी नात्यांमधील विश्वास, परस्पर आदर आणि सहकार्याची नवी दिशा देण्याकरिता सामाजिक शैक्षणिक भान ठेवणे किंवा चिंतन करणे आवश्यक असते

शिक्षणव्यवस्थेच्या गुणवत्तेचा विचार करताना आपण अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, शिक्षकांची पात्रता, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती आणि शाळेतील सुविधांना महत्त्व देतो. मात्र, या सर्व घटकांना जोडणारा एक अत्यंत महत्त्वाचा दुवा अनेकदा दुर्लक्षित राहतो. तो म्हणजे पालक आणि शाळा यांच्यातील संबंध. मुलाच्या शिक्षणाची सुरुवात घरातून होते आणि त्याला औपचारिक दिशा शाळेत मिळते. या दोन्ही ठिकाणी मिळणारे अनुभव परस्परांना पूरक ठरले, तर मुलाच्या विकासाला बळ मिळते. परंतु घर आणि शाळा यांच्यात अविश्वास, गैरसमज किंवा संवादाचा अभाव निर्माण झाला, तर त्याचा परिणाम केवळ पालक-शिक्षक संबंधांवर होत नाही; विद्यार्थ्याच्या शिकण्याच्या अनुभवावरही होऊ शकतो.

शाळेचे यश केवळ विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या गुणांवर ठरत नाही; तर शाळा आणि कुटुंब यांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या विकासासाठी किती विश्वासार्ह वातावरण निर्माण केले आहे, यावरही ते अवलंबून असते. म्हणूनच पालकांकडे केवळ शाळेच्या सूचनांचे पालन करणारा घटक म्हणून पाहण्याऐवजी शिक्षणप्रक्रियेतील महत्त्वाचा भागीदार म्हणून पाहणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शिक्षकांकडे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणारे कर्मचारी म्हणून न पाहता विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित करण्यासाठी कार्य करणारे व्यावसायिक मार्गदर्शक म्हणून पाहिले पाहिजे. दोन्ही बाजूंनी परस्परांच्या भूमिकेचा आदर केला, तर सहकार्याची भक्कम पायाभरणी होऊ शकते.

प्रत्येक पालकाची कौटुंबिक परिस्थिती, शैक्षणिक पार्श्वभूमी, आर्थिक क्षमता, सामाजिक अनुभव आणि मुलांच्या भवितव्याविषयीच्या अपेक्षा वेगवेगळ्या असतात. काही पालक स्वतः उच्चशिक्षित असल्यामुळे मुलांच्या अभ्यासात सक्रिय सहभाग घेऊ शकतात. काही पालकांना मुलांच्या अभ्यासक्रमातील संकल्पना समजावून सांगणे कठीण जाते. काहींना कामाच्या वेळांमुळे शाळेत वारंवार येणे शक्य होत नाही, तर काही पालकांना शिक्षणाचे महत्त्व पूर्णपणे मान्य असूनही आपल्या मुलाला घरी अभ्यासासाठी आवश्यक वातावरण उपलब्ध करून देताना अडचणी येतात. या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून सर्व पालकांकडून समान प्रकारच्या सहभागाची अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही.

पालकांच्या अपेक्षांमागेही अनेकदा त्यांचे स्वतःचे जीवनानुभव असतात. ज्यांना शिक्षणामुळे जीवनात प्रगती करता आली नाही, ते आपल्या मुलाने मोठे यश मिळवावे अशी तीव्र अपेक्षा बाळगू शकतात. काही पालकांना आर्थिक सुरक्षिततेची चिंता असते, तर काहींना सामाजिक प्रतिष्ठा आणि भविष्यातील स्थैर्य महत्त्वाचे वाटते. या अपेक्षा चुकीच्या आहेत असे सरसकट म्हणता येणार नाही. मात्र, पालकांच्या स्वप्नांचा भार मुलाच्या क्षमतेपेक्षा अधिक झाला, तर शिक्षणाचा आनंद कमी होऊ शकतो. त्यामुळे शिक्षकांनी पालकांच्या अपेक्षा नाकारण्याऐवजी त्या समजून घ्याव्यात आणि विद्यार्थ्याची वास्तविक प्रगती, आवड, क्षमता व गरजा यांच्याशी त्यांचा योग्य मेळ घालण्यासाठी संवाद साधावा.

येथे शिक्षकांची भूमिका केवळ विद्यार्थ्यांच्या कामगिरीचा अहवाल देण्यापुरती मर्यादित राहत नाही. पालकांना मुलाच्या विकासाचे व्यापक चित्र समजावून सांगणे, त्याच्या प्रगतीतील सकारात्मक बाबी दाखवून देणे आणि पुढील वाटचालीसाठी वास्तववादी दिशा सुचवणे हेही महत्त्वाचे ठरते. एखाद्या विद्यार्थ्याला अपेक्षित गुण मिळाले नाहीत, तर केवळ त्याच्या कमतरतांची यादी पालकांसमोर ठेवण्याऐवजी त्याला कोणत्या बाबतीत प्रगती करता आली, कोणत्या कौशल्यासाठी अधिक सराव आवश्यक आहे आणि घरातून कोणत्या प्रकारचे सहकार्य मिळू शकते, यावर चर्चा करावी. अशा संवादामुळे पालकांना समस्या समजते आणि त्यावर कृती करण्यासाठी स्पष्ट दिशा मिळते.

विश्वास निर्माण करण्यासाठी संवाद असणे पुरेसे नाही; त्या संवादामध्ये प्रामाणिकपणा, आदर आणि समोरच्या व्यक्तीचे म्हणणे समजून घेण्याची तयारी असणे आवश्यक आहे. पालक शाळेबद्दल एखादी तक्रार मांडतात, तेव्हा शिक्षकांनी ती वैयक्तिक टीका म्हणून न घेता त्यांच्या चिंतेचा विषय समजून घ्यावा. त्याचप्रमाणे शिक्षक एखादी अडचण सांगतात, तेव्हा पालकांनीही त्यामागील शैक्षणिक परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. प्रत्येक तक्रार योग्यच असेल असे नाही आणि प्रत्येक निर्णय निर्विवादपणे बरोबरच असेल असेही नाही. परंतु मतभेद असतानाही सभ्यपणे चर्चा करण्याची पद्धत विकसित झाली, तर गैरसमजांचे निराकरण अधिक परिणामकारकपणे होऊ शकते. आजच्या सामाजिक परिस्थितीत कुटुंबव्यवस्थेत अनेक बदल झाले आहेत. संयुक्त कुटुंबांचे प्रमाण, रोजगारासाठी होणारे स्थलांतर, बदलत्या कामाच्या वेळा, डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव आणि पालकांवरील आर्थिक जबाबदाऱ्या यांमुळे मुलांच्या संगोपनाचे स्वरूप बदलत आहे. काही मुलांना घरी अभ्यासासाठी मदत करणारी व्यक्ती उपलब्ध असते; काही मुलांना स्वतःच वेळेचे नियोजन करावे लागते. काही कुटुंबांना शैक्षणिक साधने सहज उपलब्ध असतात, तर काहींना मूलभूत सुविधांसाठीही प्रयत्न करावे लागतात. अशा विविधतेकडे संवेदनशीलतेने पाहणे ही आधुनिक शिक्षणव्यवस्थेची गरज आहे.

शाळेने सर्व पालकांना एकाच पद्धतीने सहभागी करून घेण्याऐवजी विविध पर्याय उपलब्ध करून द्यावेत. नियमित पालकसभा, आवश्यकतेनुसार वैयक्तिक चर्चा, सोप्या भाषेतील लेखी सूचना, दूरध्वनीद्वारे संपर्क आणि पालकांसाठी मार्गदर्शनपर उपक्रम यांचा योग्य वापर करता येतो. संवादाचे माध्यम कोणतेही असले, तरी त्याचा उद्देश पालकांवर अतिरिक्त भार टाकणे नसून त्यांना मुलाच्या शिक्षणात सहभागी होणे अधिक सुलभ करणे हा असावा. पालकांच्या वेळेचा आणि परिस्थितीचा आदर केला, तर त्यांचा सहभाग अधिक अर्थपूर्ण होण्याची शक्यता वाढते. शाळा आणि कुटुंब यांच्यातील सहकार्य केवळ समस्या निर्माण झाल्यानंतरच सुरू व्हावे असे नाही. एखाद्या विद्यार्थ्याच्या वर्तनाबाबत तक्रार आली, गुण कमी झाले किंवा उपस्थिती घटली, तेव्हाच पालकांना बोलावण्याची पद्धत बदलणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने केलेली चांगली प्रगती, एखाद्या उपक्रमातील सहभाग, सहकार्याची वृत्ती किंवा नवीन कौशल्य आत्मसात केल्याची माहितीही पालकांपर्यंत पोहोचवली पाहिजे. शाळेकडून केवळ नकारात्मक बातम्या मिळतात, अशी भावना पालकांच्या मनात निर्माण झाली, तर संपर्काबद्दल संकोच किंवा भीती वाटू शकते. सकारात्मक अनुभवांची दखल घेतल्याने शाळा आणि कुटुंब यांच्यातील संबंध अधिक सहज आणि विश्वासार्ह बनू शकतात.पालकसभेचे स्वरूपही नव्याने विचारात घेण्यासारखे आहे. विद्यार्थ्यांचे गुण सांगणे, सूचना वाचून दाखवणे आणि पालकांच्या सह्या घेणे एवढ्यापुरती सभा मर्यादित राहू नये. पालकांना मुलांच्या अभ्यासातील अडचणी समजून घेण्यासाठी, वयोगटानुसार बदलणाऱ्या गरजांवर चर्चा करण्यासाठी आणि घरातील शैक्षणिक वातावरण सुधारण्यासाठी मार्गदर्शन मिळाले पाहिजे. त्याचबरोबर पालकांचे अनुभव ऐकण्याची संधीही असावी. एखाद्या पालकाने आपल्या मुलाच्या शिकण्याबाबत केलेला उपयुक्त प्रयोग, घरात वाचनाची सवय निर्माण करण्याचा प्रयत्न किंवा मुलाच्या आवडीला दिलेले प्रोत्साहन इतर पालकांसाठी प्रेरणादायी ठरू शकते.

शिक्षकांसाठीही पालकांशी संवाद साधणे हे एक कौशल्य आहे आणि त्याचा विकास नियोजनपूर्वक करता येतो. पालकांच्या प्रश्नांना शांतपणे उत्तर देणे, गैरसमज दूर करण्यासाठी आवश्यक माहिती उपलब्ध करून देणे, कठीण विषय संवेदनशीलतेने मांडणे आणि मतभेदांच्या वेळी व्यावसायिक मर्यादा राखणे या बाबी शिक्षकांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहेत. त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण, अनुभवांची देवाणघेवाण आणि संस्थात्मक पाठबळ मिळाले पाहिजे. पालक-शिक्षक संबंध सुधारण्याची संपूर्ण जबाबदारी एखाद्या एकाच व्यक्तीवर टाकण्याऐवजी शाळेने त्यासाठी स्पष्ट आणि सुसंगत पद्धती विकसित करणे आवश्यक आहे.पालकांनीही शिक्षकांकडून सर्व प्रश्नांची तत्काळ उत्तरे किंवा प्रत्येक समस्येवर त्वरित उपाय मिळण्याची अपेक्षा न ठेवता सहकार्याची भूमिका स्वीकारावी. शिक्षकांकडे अनेक विद्यार्थ्यांची जबाबदारी असते आणि प्रत्येक मुलाची परिस्थिती वेगळी असते. त्यामुळे एखादी अडचण समोर आल्यास तिचे स्वरूप स्पष्टपणे मांडणे, आवश्यक माहिती देणे आणि ठरवलेल्या उपाययोजनांचा आढावा घेणे उपयुक्त ठरते. त्याचबरोबर शाळेच्या निर्णयांबाबत प्रश्न विचारण्याचा आणि योग्य प्रक्रियेद्वारे आपली बाजू मांडण्याचा पालकांचा अधिकारही महत्त्वाचा आहे. सहकार्य म्हणजे प्रश्न न विचारणे नव्हे; तर प्रश्नांची उत्तरे शोधताना परस्पर सन्मान राखणे होय.


या संपूर्ण प्रक्रियेचा सर्वांत मोठा लाभ विद्यार्थ्याला होतो. त्याला घर आणि शाळा या दोन वेगळ्या जगांमध्ये विरोधाभासी संदेश मिळण्याऐवजी परस्परपूरक मार्गदर्शन मिळते. त्याच्या क्षमतांची दखल घेतली जाते, अडचणींवर एकत्रितपणे काम केले जाते आणि भविष्यासाठी अधिक स्पष्ट दिशा आखता येते. विद्यार्थ्याच्या विकासासाठी पालक आणि शिक्षक यांच्यातील नाते हे स्पर्धेचे नसून सहकार्याचे असावे. मुलाच्या यशाचे श्रेय कोणाला मिळेल, यापेक्षा त्याच्या प्रगतीसाठी आणखी काय करता येईल, हा प्रश्न दोन्ही बाजूंनी विचारला गेला पाहिजे.

शिक्षणातील खरी भागीदारी तेव्हाच निर्माण होते, जेव्हा शाळा पालकांना दोष देण्याऐवजी त्यांना समजून घेते, पालक शिक्षकांच्या कार्याचा आदर राखून संवाद साधतात आणि दोघेही विद्यार्थ्यांच्या गरजांना केंद्रस्थानी ठेवतात. अशा वातावरणात प्रत्येकाला आपले मत मांडण्याची संधी मिळते, अडचणी लपवण्याऐवजी त्यांवर चर्चा होते आणि शिक्षण ही केवळ शाळेची जबाबदारी न राहता कुटुंब व समाज यांच्या सहभागातून पुढे जाणारी सामूहिक प्रक्रिया बनते.

शेवटी, शाळेची इमारत ज्ञानासाठी जागा उपलब्ध करून देते; शिक्षक ज्ञानाला दिशा देतात; पालक त्या प्रवासाला भावनिक आणि सामाजिक आधार देतात; तर विद्यार्थी या सर्व अनुभवांतून स्वतःचे भविष्य घडवतात. या साखळीतील कोणताही घटक एकट्याने संपूर्ण यशाची हमी देऊ शकत नाही. परंतु परस्परांवर विश्वास ठेवणारे, एकमेकांच्या मर्यादा समजून घेणारे आणि समान उद्दिष्टासाठी प्रयत्न करणारे घटक एकत्र आले, तर शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी भक्कम पाया तयार होतो.

पालकांना ऐकणारी शाळा, शिक्षकांचा आदर करणारे कुटुंब आणि स्वतःच्या विकासात सक्रिय सहभाग घेणारा विद्यार्थी,हीच गुणवत्तापूर्ण शिक्षणाची खरी त्रिसूत्री आहे. नात्यांमध्ये विश्वास निर्माण झाला की सहकार्याला दिशा मिळते; सहकार्याला दिशा मिळाली की विद्यार्थ्यांच्या विकासासाठी नव्या शक्यता निर्माण होतात. ●

विकृत वर्तमान भेदायला निघालेली घणाघाती कविता



'अस्वस्थ वर्तमानाचा बर्म्युडा ट्रँगल' कवी संजय घाडगे नावाच्या अस्सल वादळी कवीने आपली नाममुद्रा 'वणवा' 'अंधाराला डोळे फुटता', 'निळ्या आभाळाचे गाणे', 'कविता तुझ्या माझ्या' या कविता संग्राहातून समर्थपणे उमटवली आहे. कवीला मी अनेक कवी संमेलनांत गेय कविता सादर करून, श्रोत्यांना प्रभावीत करतांना अनुभवले आहे. त्यांच्या गेय कविता रसीकांच्या मनाला भुरळ पाडतात. महाराष्ट्रातील कवितेच्या, प्रांतात प्रख्यात असं नाव म्हणून कवी संजय घाडगे याचं नक्कीच घ्यावे लागेल.

'अस्वस्थ वर्तमानाचा बर्म्युडा ट्रँगल' हे कविता संग्रहाचे मार्मिक शीर्षक सजग मनाला अस्वस्थ करून विचार करायला भाग पाडते. व्यवस्थेने मूल्य पोखरून टाकले आहे. अहिंसा, समता, मानवता, ममता, सहृदयता हे शब्दअर्थ हरवुन बसले आहेत. बर्म्युडा ट्रँगलचा शोध लागलाच नाही. शोध घेणाराच वाटेत हरवला अशी भीषण अख्यायिका आहे. क्रुर व्यवस्थेने असा महाक्रूर भेसूर, बर्म्युडा ट्रँगल समाजाभोवती उभा केला आहे. त्याला भेदण्याचा धाडसी, बेधडक प्रयत्न संजय घाडगे नावाचा बलदंड कवी करतोय हे महत्त्वाचे वाटते. कटी, मिठीवर कविता लिहिणाऱ्या फुशारक्या कवींच्या कुवतीबाहेरचे हे अवघड काम आहे. या चिंतनशील कवीचे मी मनापासून अभिनंदन करतो. शब्दांचे शिवधनुष्य घेऊन तो बर्म्युडा ट्रँगल भेदायला निघालेला भीम सेनानी आहे! त्यांच्या धनुष्यातून निघालेला बाण व्यवस्थेच्या उराला भेदणारा आहे. या चिंतनशील विवेकी कवीला नवा सम तामय सुंदर समाज निर्माण करायचा आहे. नवा छिपा भेदभाव मिटवायचा आहे. भेय-भेदाच्या भिंती नष्ट करून टाकायच्या आहेत. करूणेची फुले व ममतेच्या कळया फुलत रहाव्यात असा त्यांचा ध्यास आहे. पितृऋण फेडणारा कवी म्हणतो

''उमलून यावे दुःख तरारुन पिकात
डोलावी कविता
प्रसन्न व्हावे अवघे जगणे 'बा' च्या
डोळ्यांत हसावी कविता''

कवीला अस्वस्थ अशांत व्हावं लागतं. तरच अस्सल कवितेचा जन्म होतो. ''माझ्यातल्या अस्वस्थ ज्वालामुखीचा उद्रेक कधी होईल हे सांगता येत नाही.'' असं हा कवी म्हणतो. म्हणूनच त्याच्या काव्यरुपी पिस्तूलमधून ज्वालामुखीच्या ठिणग्या बाहेर पडल्या आहेत.

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा/ काय केले बापा आम्हासाठी

देवशरणतेवर घणाघात करणारी ही कविता संग्रहाची शान आहे.

''जीव ओवाळून टाकी साऱ्या घरावर माय
साऱ्या घराची सावली जशी हंबरते गाय

''आईची महती अशा भावगर्भ शब्दांत साकार झाली आहे . मानवतेच्या आड येणारा प्रत्येक बर्म्युडा ट्रँगल गाडायची शपथ घेणाऱ्या या कवीला सलाम केला पाहिजे.

''बाप कुणबी हो माझा
माय कुणब्याची लेक
नका विचारू कहाणी
माझ्या काळजाला भोकं''

अन्नदात्याची व्यथा कवी अशा भेदक शब्दात मांडतो.

'कविता म्हणजे काय असते' ही कवीची आशयघन कविता मनाचा ठाव घेते. कविता कवीचा श्वास, कवीचा ध्यास असंही कवी

दत्तप्रसाद जगतपुरीया

म्हणतो. मी तर म्हणतो-

''ममतेचा पंख / गर्जनेचा शंख बंडाचा डंख असते !'' -

निसर्गावर, पाखरांवरही अशा चौफेर विषयावर दमदार कविता लिहिणारा हा निष्णांत कवी आहे.

''अंधार पेरला का वस्तीत पाखरांच्या
धर्मांध माजला का वस्तीत पाखरांच्या शोधून काढ आता माणूस झोपलेला
अंगार पेटलेला वस्तीत पांखरांच्या''

वणव्यासारखं पेटत राहावं लागतं, आतलं असहिष्णुत्व जाळून टाकावं लागत! विवेकी विद्रोह हाच परिवर्तन घडवू शकतो याची कवीला जाण आहे. कर्मठ चालीरितींच्या नरक यातना भोगणा-या हताश, निराश समाजाला विज्ञानाचा झोत दाखवत मनात लखख उजेड पाडणारा हा जिंदादिल कवी आहे. कविता लिहिण्यासाठी कविला गर्भार व्हावं लागत म्हणजे खुप चिंतन मनन करावं लागतं हेच कवीला म्हणायचं आहे. 'फक्त जिंकण्यासाठी' ही या झुंजार कवीची झुंजार कविता आहे. हिंदू धर्म खतरे में है म्हणा-यांना हा कवी अनावृत्त करतो. दीन दुबळयांचं, वंचित, दलित, पीडितांचं, नाडलेल्या, पिचलेल्यांचं दुःख कवेत घेतो चोरांच्या उलटया बोंबाना कवितेच्या भक्कम घणाने ठेचून ठेचून टाकतो! क्या बात है!

एका कवितेत कवी म्हणतो.

''ह्या आदिम दुःखाच्या
आदिम कहाण्या
प्रतिज्ञा करणाऱ्या या वचनबद्ध कवीने आदर्श घालून दिला आहे. तो गावच्या मातीला विसरत नाही. जात- पात न विचारणा-या पावसाची महती विसरत नाही. माणूस जातीचा गौरवशाली इतिहास विसरत नाही. म्हणूनच त्याची कविता चिंतनीय, मननीय अभिजनवादी कवितेच्या उरात धडकी भरवणारी सूर्यसन्मुख प्रकाशमान कविता आहे.

सूया घे बिबं घे ' म्हणत
ती दारी आली
पाठीवरच्या झोळीत तिच्या
कोवळं मूल बांधलेलं
उन्हाच्या किर्र पा-यात''

अशा दुर्लक्षत विषयावरची कविता लिहून झपाटून गेलेला कवी संजय घाडगेच लिहू शकतो.

ही कविता आंबेडकरवादी कवितेचं दालन समृध्द करेल यात शंका नाही,

कवी म्हणतो-

''बाबासाहेब,
तुमच्यानंतर पिसाळलेल्या प्रतिगाम्यांच्या प्रखर धर्मांधतेच्या ज्वाला प्यायलो आहे
संघर्ष नावाचा अग्निकल्लोळ
माझ्या आत रिचवून,
अहिंसात्मक प्रबुध्द भारत व्हावा म्हणून
मी स्थितप्रज्ञ बुध्दाच्या
शांत, शीतल सावलीत
विसावलो आहे! ''

''अशा शब्दांच्या घणाने मस्तवाल प्रतिगाम्यांना वाकवायला निघालेल्या या घणाघाती कवीस पुढील वाटचालीस खूप खूप हार्दीक शुभेच्छा !

कुरवाळत- कुरवाळत
जगतोय मी!''

कवीचं हे सोसणं समाजाच्या उज्वल भविष्यासाठी आहे. त्याचा निर्धार ऊर्जापूर्ण आहे

''निर्धार उर्जापूर्ण असला की,
वादळही थोपवता येतं
समतेंच्या शत्रुंना कबरीत झोपवता येतं''

समतेच्या शत्रुंना कबरीत झोपवणारा, त्यांच्यावर वज्रमूठ उगारणारा हा निर्भय कवी आहे.

दुष्काळाच्या कवितेत कवीने म्हटलंय -

''कुणी धाडा हो निरोप
मायबाप सरकारला
सा-या जगाचा पोशिंदा
अन्नपाण्याविना मेला''

या ओळी संवदेनशील माणसाचं काळीज पिळवटून टाकणाऱ्या आहेत.

''सूर्य संबुध्द झालं की
आभाळही कवेत घेता येतं
जे आजन्म अंधाराचे यात्री
त्यांच्या हाती उजेड देता येतं''

कवीच्या प्रभावी सर्जन प्रतिभेतून आलेल्या या श्रीमंत ओळी आहेत. माणूस ही एकच जात आहे असा संदेश भाळावरती कोरायचा सल्ला कवीने दिला आहे. काळया कातळावर उद्याची पहाट गाणी लिहायची. ●

वाचनीय...

दीर्घकाळ वाचन केल्यानंतर...



सुजाण वाचकाला चरित्र, आत्मचरित्र वाचण्याची ओढ वाटते. चरित्र आणि आत्मचरित्रांच्या वाचनातून, अनेक गोष्टी समजतात, ज्या वास्तवाशी निगडित असतात. नुकतेच असे छोटेसे आत्मचरित्र वाचण्याची संधी मिळाली. निंभर, या आपल्या आत्मचरित्रात, 'पुस्तक वाचण्यापूर्वी' या पहिल्या प्रकरणात प्रा.जयप्रकाश म्हात्रे यांनी आपले 'मनोगत' मांडले आहे. निंभर म्हणजे ऊन. लहानपणी सवंगड्यांत वा भावंडात भांडणे झाली की, आई सांगत असे, ''थांब! त्याचे घर आपण निंभरात बांधू!'' उन्हाळ्यातले ऊन, हे त्या काळात तापदायक ठरे. आताच्या रायगड जिल्ह्यातील, अलिबाग तालुक्यातील, शिरवली या निसर्गरम्य, छोट्याशा गावात जयप्रकाश यांचे बालपण व्यतीत झाले. तेथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. सुमारे ७० वर्षांपूर्वी, गावातील बहुसंख्य प्रौढांचा शिक्षणाकडे ओढा नसल्यामुळे, बहुसंख्य मुले शाळेकडे दुर्लक्ष करीत. मात्र शाळेतील गुरुजी वेळोवेळी मुलांना शाळेत शिकविण्याचा सल्ला मुलांच्या आई-वडिलांना देत असत.

शिरवली गावातील बहुसंख्य लोकांचे जीवन शेती आणि मासेमारी यावर कसे अवलंबून होते, हे जयप्रकाश यांनी, तेथील बोलीभाषेत उत्तम प्रकारे मांडले आहे. मासेमारी, शेती कशा प्रकारे केली जात असे, हे सोदाहरण स्पष्ट केले आहे. शिरवली हे जेम तेम शंभर-सव्वाशे घरांचे गाव. जयप्रकाश यांच्या जन्माच्यावेळी गावात प्लेगची साथ सुरू असल्याने, राहती घरे सोडून, सर्व गावाच्या बाहेर, तात्पुरत्या निवाऱ्यात राहत होते. जयप्रकाश यांचे बाबा, चौथी पास झाल्यानंतर त्यांच्या वडिलांबरोबर मुंबईत गेले. त्यांनी हॉटेलमध्ये हरकाम्या म्हणून काम केले. चौथीपर्यंतचे शिक्षण घेतानाच्या आपल्या सवंगड्यांबरोबरच गुरुजींचेही वर्णन केले आहे. त्यावेळचे गणपत मास्तर चौथीच्या वर्गापर्यंतच्या सर्व मुलांना, एकटेच शिकवायचे. कंटाळा येऊ नये, म्हणून मुलांना गाणी, गमतीचे खेळ शिकवायचे. पाचवीनंतर जयप्रकाश दीड मैल अंतरावरील, हाशिवरे गावातील शाळेत जाऊ लागले. पावसाळ्यात शाळेत जाणे, येणे, नदी- नाले यांच्यामुळे कसे अवघड होत असे, तेही जयप्रकाश यांनी मांडले आहे. गावातील विविध सणांचे वर्णन, तसेच घरातील विविध प्रौढ व्यक्ती यांची व्यक्तिचित्रे उत्तमप्रकारे रेखाटली आहेत. नववीत दाखल झाल्यानंतर नव्याने शाळेत दाखल झालेले, घाटे सर आणि त्यांचा मुलगा सुरेश, यांच्यामुळे आपल्यात जणु क्रांती घडून आली, असे जयप्रकाश यांनी लिहिले आहे. गणित आणि इंग्रजी हे अवघड वाटणारे विषय घाटे सर सोपे करून शिकवायचे. त्यामुळे गणित, इंग्रजी शिकण्यातील आनंद जयप्रकाश यांना लाभला. त्यावेळचे अनुभव त्यांनी सविस्तरपणे मांडले आहेत. ''शिकवणीचे पैसे किती'', असे विचारल्यावर, घाटे सर म्हणाले, ''कसले पैसे? मुलगा हुशार आहे, तो पुढे गेला पाहिजे असे मनापासून वाटते म्हणून त्याला घरी शिकायला ये म्हटले.'' सरांनी असे म्हणताच, आश्चर्यचकित झालेल्या, जयप्रकाश यांच्या वडिलांचे डोळे पाणावले होते. त्यावेळी उत्तम शिक्षक लाभल्यामुळे, मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण उत्तम प्रकारे पार पडल्याचे जयप्रकाश नोंदवितात. त्यांना साठ टक्के गुण मिळाले. त्यांच्या या यशाने घरातील, गावातील सर्व आनंदी झाले आणि आश्चर्यचकितही!

मॅट्रिकला चांगले गुण मिळाल्यामुळे पुढील शिक्षण, अलिबाग येथे नव्याने सुरू झालेल्या,जनता शिक्षण मंडळाच्या कला,वाणिज्य,विज्ञान महाविद्यालयात प्रवेश घेण्याचे ठरले. तीन वर्षे शिक्षण कसे झाले, ते सविस्तरपणे मांडले आहे. अलिबाग महाविद्यालयातील विविध प्राध्यापकांचा, त्यांच्या उत्तम शिकविण्याचा, जयप्रकाश यांनी आवर्जून उल्लेख केला आहे. दुसऱ्या वर्षाला असताना प्राणी, वनस्पतींचे नमुने गोळा करण्यासाठी 'एस्कर्शन टूर' आखली गेली होती. त्यानंतरचे उच्च शिक्षण घेण्यासाठी आणि प्राणीशास्त्र हा विशेष विषय अलिबागच्या महाविद्यालयात त्यावेळी नसल्यामुळे, बी.एससी. साठी पुण्याच्या वाडिया कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. अलिबाग कॉलेजच्या तुलनेने, वाडिया कॉलेज हे भव्य आणि प्रशस्त अशा व्हिक्टोरियन बांधणीच्या दगडी इमारती सामावलेले होते. जयप्रकाश यांच्या वर्गात भारताच्या विविध प्रांतांतूनच नव्हे, तर विविध देशांतील आलेली

मुलेमुली वर्गात शिकत होती. त्या सर्वांची ओळख हळूहळू होत गेली. बहुतेक श्रीमंत घरातून आल्यामुळे त्यांची राहणी श्रीमंती थाटाची होती. त्यामुळे सुरुवातीला जयप्रकाश यांना अवघडल्यासारखे वाटे. परंतु सतत अभ्यासात मग्न असल्यामुळे, सर्व त्यांच्याशी प्रेमाने आणि आपुलकीने वागत असत. वाडिया कॉलेजमध्ये असलेल्या वातावरणामुळे जाती, धर्म, प्रांत, देश या पलीकडे 'माणुसकी' नावाची चीज असते, याचे भान जयप्रकाश यांना आले. वाडिया कॉलेजमधील विविध ठिकाणी झालेल्या, कलेक्शन टूरचा अनुभव त्यांनी मांडला आहे. वाडिया कॉलेजमध्ये चांगल्या गुणांनी पास झाल्यानंतर, जयप्रकाश यांनी पदव्युत्तर शिक्षण घेण्याचे ठरवले. त्यासाठी पुणे विद्यापीठात प्रवेश घेतला. त्यांना विद्यापीठाच्या होस्टेलमध्ये प्रवेश मिळाला. पदव्युत्तर शिक्षणाचे काळातील, विविध अनुभव, जयप्रकाश यांनी सविस्तरपणे नोंदविले आहेत. उच्च शिक्षण घेण्याच्या या काळात, आपल्यात वैचारिक बदल कसे झाले, ते लेखकाने नोंदविले आहे.

पंढरपूर आणि मालेगाव येथील महाविद्यालयांमध्ये जयप्रकाश यांना काही काळ, तेथील कॉलेजमध्ये शिकवण्याचा अनुभव मिळाला. पंढरपूर सोडताना, तेथील विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी गेले असता, आलेला अनुभव वाचकांसमोर मांडला आहे. दर्शनासाठी आलेल्या भक्तांना बडवे बखोटी पकडून त्यांचे डोके विठुरायाच्या चरणी आपटत होते, दक्षिणेचा आग्रह करत होते, हे पाहून त्यांचे संवेदनशील मन अस्वस्थ झाले. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करणारे तसे पत्र आईला लिहिले होते. १५ जून १९७३ रोजी, नाशिकमधील, पंचवटीतील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात जयप्रकाश व्याख्याता म्हणून रुजू झाले. मालेगावच्या एम.एस.जी. कॉलेजातील प्राणीशास्त्र विभाग प्रमुख रमेश मांडवडे यांची तेथे प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याने, त्यांनी आपल्याबरोबर, जयप्रकाश यांना नाशिकला प्रमोशनवर आणले होते. त्यामुळे डेमॉन्स्ट्रेटरपदावरून, जयप्रकाश यांची व्याख्यातापदी पदोन्नती झाली. ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर जयप्रकाश, याच महाविद्यालयातून निवृत्त झाले.

प्राध्यापकांच्या विविध आर्थिक आणि अन्य प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी, जयप्रकाश प्राध्यापक संघटनेत सक्रिय सहभागी झाले होते. विद्यापीठ संघटनेचे ते सरचिटणीस आणि संघटनेच्या बुलेटिनचे संपादकही होते. या सर्व काळात पत्नीच्या दक्षतेमुळे आणि हुशारीमुळे मुलांचे शिक्षण व्यवस्थित झाल्याचे त्यांनी मोकळेपणाने मान्य केले आहे. कॉलेजात शिकवण्याचे काम करीत असतानाच ते पत्नीसह विविध सामाजिक चळवळीत सहभागी झाले होते. त्याविषयी त्यांनी लिहिले आहे. पंचवटीमध्ये दीर्घकाळ राहिल्यानंतर, त्यांनी बोरगडमध्ये घेतलेल्या प्लॉटवर बंगला बांधला. तेथे तळमजल्यावर ते राहतात. वरच्या दोन मजल्यांवर ''संत गाडगेबाबा अभ्यासिका व ग्रंथालय'' आहे. सुमारे सव्वाशे ते दीडशे मुलेमुली तेथे अभ्यास करतात. आतापर्यंत शंभरपेक्षा जास्त विद्यार्थी स्पर्धापरीक्षा उत्तीर्ण होऊन, नोकरी करू लागले आहेत. या अभ्यासिकेमुळे गरीब, आदिवासी मुलांचे कल्याण झाले. ग्रंथालयामध्ये विविध प्रकारची वृत्तपत्रे, नियतकालिके आणि ग्रंथ उपलब्ध असल्यामुळे, मुलांचे अवांतर वाचन वाढून, त्यांच्या ज्ञानकक्षा रुंदावतात. मुले, नातवंडे इंग्लंडमध्ये असल्यामुळे, त्यांचा सहा वेळा, परदेश प्रवास घडला. तेथे पाहिलेल्या विविध संस्मरणीय स्थळांचे त्यांनी उल्लेख केले आहेत. मलपष्ठावर प्रा.जयप्रकाश बाळकृष्ण म्हात्रे यांच्या जीवनकार्याचा सविस्तर, सचित्र परिचय दिला आहे. प्रा. जयप्रकाश म्हात्रे यांनी ''निंभर'' या पुस्तकाद्वारे आपले जीवनकार्य वाचकांसमोर मांडले आहे. मात्र हे सारे त्रोटकपणे मांडल्याचे जाणवते. उच्च शिक्षणामुळे आपल्यामध्ये वैचारिक बदल कसे झाले, तसेच प्राध्यापक म्हणून कार्य करत असताना, सामाजिक कार्य कोणत्या प्रकारचे आणि का केले, ते सविस्तरपणे लिहिण्याची आवश्यकता जाणवते. त्यांनी सुरू केलेल्या अभ्यासिकेतून जे विद्यार्थी स्पर्धापरीक्षा देऊन यशस्वी झाले, त्यांची निवडक मनोगते या पुस्तकात समाविष्ट व्हायला हवी होती. म्हणजे अशा खाजगी अभ्यासिकांचे, ग्रंथालयांचे महत्त्व समाजासमोर आले असते. पुस्तकातील काही राहून गेलेले मुद्रणदोष खटकतात. पृष्ठ पन्नासवरील शेवटचे वाक्य अपूर्ण असल्याने, त्याचा अर्थ समजत नाही. ●

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

पुस्तकाचे नाव : निंभर
लेखक : प्रा. जयप्रकाश म्हात्रे, ९४२२२५९०९६
प्रकाशक : समता प्रकाशन, बोरगड नाशिक
प्रथमावृत्ती : मे, २०२५
मुखपृष्ठ : डॉ.समीर म्हात्रे, पृष्ठे : ८०

भन्नाट प्रश्न, वैज्ञानिक उत्तरे

कोजागरीच्या चंद्रप्रकाशात खरंच काही जादू असते ?



विद्यालंकार घारपूरे

कोजागरी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी सचिन आणि मनीषा विज्ञानखेळघरात आले. दोघांनीही आदल्या रात्री मित्रमंडळींबरोबर कोजागरी साजरी केली होती. गच्चीवर बसून चंद्र पाहिला होता आणि मसालेदार दूधही प्यायले होते.

सचिनने आत येताच मोबाईल काढला.

''काका, काल आम्ही जे दूध प्यायलो ना, त्यामागे किती विज्ञान आहे, माहीत आहे?''

मनीषा म्हणाली, ''अरे, आधी काका-काकूंना ती पोस्ट दाखव! मला तर त्यातलं बरंच काही पटलेलं नाही.''

''पण का पटलेलं नाही, हे सांगता येत नाही ना?'' सचिनने चिडवले.

''म्हणूनच इथे आलोय!''

समाधानकाकांनी पोस्ट वाचली. शीर्षक होते, 'कोजागरी पौर्णिमा : श्रद्धा नाही, विज्ञान समजून घेऊया.'

''वा!'' काका म्हणाले, ''शीर्षक तर छान आहे. पाहूया त्यात विज्ञान किती आहे ते!''

चौघांनी ती पोस्ट वाचली.

सचिन म्हणाला, ''पृथ्वीचा अक्ष साडेतेवीस अंश कललेला असल्यामुळे कोजागरीचा चंद्र सर्वांत मोठा, तेजस्वी आणि जास्त वेळ दिसतो, असं लिहिलंय.''

समाधानकाका म्हणाले, ''पृथ्वीचा अक्ष कललेला आहे, हे खरं. पण त्यामुळे कोजागरीचा चंद्र पृथ्वीच्या सर्वांत जवळ येत नाही. चंद्राची कक्षा लंबवर्तुळाकार असल्यामुळे त्याचं अंतर बदलतं. तो जवळ असताना पौर्णिमा आली तर त्याला सुपरमून म्हणतात. प्रत्येक कोजागरीला सुपरमून नसतो.''

''पण काल चंद्र खूप मोठा दिसत होता!'' मनीषा म्हणाली.

''क्षितिजाजवळ चंद्र मोठा भासतो. हा दृष्टिभ्रम आहे. त्याला म्हणतात.''

''मग?'' सचिनने विचारलं.

''शरद संपाताच्या सर्वांत जवळच्या पौर्णिमेला म्हणतात. त्या काळात सलग काही दिवस चंद्रोदयाच्या वेळेत तुलनेने कमी फरक पडतो. त्यामुळे पूर्वी शेतकऱ्यांना सूर्यास्तानंतर चंद्रप्रकाशात काम करणं सोयीचं होतं. पण आणि कोजागरी नेहमी एकाच दिवशी येतात असं नाही.''

उत्तराकाकी म्हणाल्या, ''आता दुधाचं विज्ञान पाहूया.''

सचिनने वाचलं, ''चंद्रप्रकाशात दूध ठेवल्यामुळे ते थंड होतं. दवामुळे लॅक्टिक ॲसिड तयार होण्याची क्रिया मंदावते. वेलची-केशरामुळे दूध टिकतं. ही प्राचीन अन्नपरिरक्षण पद्धत होती!''

मनीषा लगेच म्हणाली, ''पण काल दूध चांगलं उकळलं होतं. मग ते झाकून ठेवलं. आम्ही गच्चीवर नेऊन थोड्याच वेळात प्यायलो. दवाचे थेंब दुधात पडणार कुठून?''

काकी म्हणाल्या, ''अगदी योग्य प्रश्न! दूध उकळल्यामुळे अनेक सूक्ष्मजीव नष्ट होतात. चंद्रप्रकाशामुळे नव्हे. रात्री हवा थंड असेल तर दूध थंड होऊ शकतं. उघड्या आकाशाखाली भांड्यातून उष्णतेचं प्रारणही होतं. पण त्यासाठी चंद्रप्रकाशाची गरज नाही. अमावास्येलाही हे घडतं.''

''मग दवाचं काय?'' सचिनने विचारलं.

''दव म्हणजे हवेतल्या पाण्याच्या वाफेचं थंड पृष्ठभागावर होणारं संघनन. त्याचा दुधातील लॅक्टिक ॲसिड तयार होण्याशी संबंध नाही. काही सूक्ष्मजीव दुधातील साखरेचं लॅक्टिक ॲसिडमध्ये रूपांतर करतात. तापमान कमी झालं तर त्यांची वाढ मंदावू शकते. पण पंधरा-वीस अंश तापमान दूध सुरक्षित ठेवण्यासाठी पुरेसं कमी नाही.'' काकी म्हणाल्या?

''आणि वेलची-केशर? त्याने दुधाला काय मस्त चव आली होती!'' मनिषाने विचारलं.

''त्यांतील काही पदार्थांनी प्रयोगशाळेत सूक्ष्मजीवरोधी गुणधर्म दाखवले आहेत. पण दुधात घातलेल्या थोड्याशा वेलची-केशरामुळे दूध तासन्तास सुरक्षित राहतं, असा पुरावा नाही. हा! दूध त्यामुळे चविष्ट नक्कीच होतं. दूध थंड ठेवण्यासाठी साधारण चार अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा कमी तापमान योग्य असतं.''

मनीषा म्हणाली, ''म्हणजे चंद्रप्रकाशात दूध ठेवण्याची प्रथा अन्नपरिरक्षणासाठीच सुरू झाली, यालाही पुरावा नाही!''

''बरोबर! असलाच तर तो ऐतिहासिक पुरावाही या पोस्टमध्ये नाही,'' उत्तराकाकी म्हणाल्या.

सचिनने पुढचा परिच्छेद वाचला. ''पौर्णिमेला समुद्राला मोठी भरती येते. आपल्या शरीरातही सत्तर टक्के पाणी असल्यामुळे चंद्राचा शरीरावर परिणाम होतो!''

समाधानकाका म्हणाले, ''प्रौढ माणसाच्या शरीरात साधारण पन्नास ते साठ टक्के पाणी असतं. ते पेशींमध्ये, रक्तात आणि इतर ऊतींमध्ये विखुरलेलं असतं. समुद्रासारखा एकत्रित जलाशय नसतो.''

''म्हणून शरीरात भरती येत नाही?'' सचिनने विचारलं.

''तेवढंच कारण नाही. भरती निर्माण होण्यामागे चंद्राच्या गुरुत्वीय आकर्षणात वेगवेगळ्या ठिकाणी पडणारा फरक महत्त्वाचा असतो. पृथ्वीचा व्यास सुमारे बारा हजार सातशे किलोमीटर आहे. माणसाची उंची जेमतेम एक-दोन मीटर! एवढ्या लहान अंतरावर हा फरक अत्यंत नगण्य असतो,'' काकी म्हणाल्या.

''पण पौर्णिमेलाच मोठी भरती का?'' मनीषाने विचारलं.

''पौर्णिमा आणि अमावास्येला सूर्य व चंद्र यांच्या भरती निर्माण करणाऱ्या प्रभावांची बेरीज होते. म्हणून दोन्ही वेळी मोठी भरती-ओहोटी होऊ शकते. पौर्णिमेला जशी मोठी भरती येते, तशी अमावस्येलाही येते, याचा पोस्टमध्ये उल्लेखच नाहीय!'' काकी म्हणाल्या.

''मग चंद्रामुळे झोप आणि मनःस्थिती बदलते?'' सचिनने विचारलं.

उत्तराकाकी म्हणाल्या, ''चंद्राच्या कलांचा झोपेशी काही संबंध आहे का, यावर संशोधन सुरू आहे. अजून ठोस निष्कर्ष नाही. पण शरीरातील पाण्याला भरती येते म्हणून मनःस्थिती बदलते, हे स्पष्टीकरण चुकीचं आहे.''

''पोस्टमध्ये तर रात्रभर जागल्यामुळे जैविक घड्याळ निसर्गाशी जुळतं, असंही म्हटलंय!'' मनीषा म्हणाली.

''उलट नियमित आणि पुरेशी झोप जैविक घड्याळासाठी महत्त्वाची असते. एक रात्र जागरण केल्याने ते सुधारतं, याला पुरावा नाही,'' काकी म्हणाल्या.

''खरंतर कोजागरीला काल उशीरापर्यंत जागल्यामुळे माझी झोपच पुरी झाली नाहीये. डोळे चुरचुरतायत'' सचिन डोळे चोळत म्हणाला.

''को जागरती?' म्हणजे 'कोण जागं आहे?' या पारंपरिक प्रश्नाला निसर्गाबद्दल जागरूक राहण्याचा आधुनिक अर्थ देता येईल. पण तो मूळ प्रथेचा वैज्ञानिक हेतू होता, असं सिद्ध होत नाही.'' काका म्हणाले.

मनीषा म्हणाली, ''आणि चंद्रप्रकाशात अमृत पडतं, त्याचं काय?''

''चंद्र सूर्यप्रकाश परावर्तित करतो. त्यातून दुधात अमृत किंवा विशेष आरोग्यदायी पदार्थ पडत नाहीत,'' काका म्हणाले.

काकी पुढे म्हणाल्या, ''परंपरेचा आनंद घेण्यात काहीच गैर नाही. पण तिच्यामागे विज्ञान आहे असं सांगताना पुरावा हवा. वैज्ञानिक शब्द वापरले म्हणजे विधान वैज्ञानिक होत नाही. ही पोस्ट छद्म विज्ञानाचा उत्तम नमुना आहे!''

सचिनने मोबाईल बंद केला. ''म्हणजे काल आम्ही चंद्रप्रकाशात दूध प्यायलो, मजा केली. पण आज या पोस्टमधलं छद्मविज्ञान पटतही नाही आणि पचतही नाहीय!''

मनीषा हसून म्हणाली, ''दूध पचलं ना? मग बरं आहे. कारण ही छद्म विज्ञान पोस्ट पचायला, उपाय म्हणून वेलची-केशरही उपयोगी पडणार नाही!''

विज्ञान खेळघरात हशा पिकला. ●

निवडक



टॅलेंट हंटमधून क्रिकेटपटूंची निवड

मुंबई : नॅशनल क्रिकेट क्लब, मुंबईतर्फे नुकत्याच पार पडलेल्या टॅलेंट हंटमधून निवड झालेल्या प्रतिभावान युवा क्रिकेटपटूंची घोषणा करण्यासाठी आज क्लबमध्ये गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून एकूण ४५ खेळाडूंची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये १६ फलंदाज, १४ गोलंदाज, १२ अष्टपैलू खेळाडू आणि ३ विशेष यष्टिरक्षकांचा समावेश आहे. नॅशनल क्रिकेट क्लबचे अध्यक्ष आणि मुंबई टी लीग गव्हर्निंग कौन्सिलचे अध्यक्ष राजदीप गुप्ता यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी एमसीएच्या शिखर परिषदेचे इतर सदस्यही उपस्थित होते. २६ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या टॅलेंट हंटचा उद्देश दर्जेदार प्रशिक्षण सुविधा आणि व्यावसायिक मार्गदर्शन उपलब्ध होऊ शकत नसलेल्या १६ ते २३ वयोगटातील प्रतिभावान क्रिकेटपटूंचा शोध घेणे हा होता. निवड समितीमध्ये किरण देसाई, राहुल पांडे, रवींद्र सोलंकी, जितेंद्र कनोजिया, प्रमोद यादव आणि संजय निकम यांचा समावेश होता.

वेस्ट इंडिजला १७० धावांचे लक्ष्य

मीरपूर : बांगलादेशने मीरपूर कसोटीत वेस्ट इंडिजविरुद्ध १७० धावांचे लक्ष्य ठेवले आहे. संघ आपल्या दुसऱ्या डावात १४२ धावांवर सर्वबाद झाला. सामन्याच्या चौथ्या दिवशी बांगलादेशच्या संघाने ७९/६ या धावसंख्येपासून खेळाला सुरुवात केली. पहिल्या सत्रात ६३ धावा करताना त्यांचे उर्वरित ४ फलंदाज बाद झाले.वेस्ट इंडिजकडून रोस्टन चेस-ने ५ बळी घेतले. जोमेल वॉरिकनने ४ बळी मिळवले. शमार जोसेफला एक बळी मिळाला. नईम हसनने आपल्या डावाला १८ धावांपासून पुढे सुरुवात केली. तो ९१ चेंडूंमध्ये ५२ धावा करून बाद झाला. नईमने कसोटी कारकिर्दीतील पहिले अर्धशतक झळकावले. याचप्रमाणे, जाकिर अलीने २२ धावा केल्या. मेहदी हसन मिराज ९ धावा करून बाद झाला. शेपटाच्या फलंदाजांपैकी एकालाही दुहेरी आकडा गाठता आला नाही. पहिल्या डावात २७ धावांची आघाडी मिळाली होती.

आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धा ; जपानवर ४-१ ने मात

भारत उपांत्य फेरीत





। मुंबई । प्रतिनिधी ।

आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारतीय संघाची प्रभावी कामगिरी सुरूच आहे. स्पर्धेतील आपल्या तिसऱ्या सामन्यात, पाच वेळच्या विजेत्या भारताने जपानला ४-१ ने पराभूत करून विजयांची हॅट्ट्रिक नोंदवली. या दणदणीत विजयामुळे भारतीय संघाने गुणतालिकेतील आपले वर्चस्व आणखी मजबूत केले आहे. संघाच्या या सलग तिसऱ्या विजयात युवा स्ट्रायकर अभिषेक नैनची कामगिरी कौतुकास्पद होती.

या सामन्याचे मुख्य आकर्षण स्ट्रायकर अभिषेक नैनची उत्कृष्ट कामगिरी होती, ज्याने दोन अप्रतिम मैदानी गोल करून आपला १५० वा आंतरराष्ट्रीय सामना संस्मरणीय बनवला. त्याने सामन्याच्या ११ व्या आणि ५१ व्या मिनिटाला गोल करून जपानच्या बचावाला खिंडार पाडले. अभिषेक व्यतिरिक्त, कर्णधार हरमनप्रीत सिंगने ४७ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर केले, तर विष्णुकांत सिंगने ५६ व्या मिनिटाला चौथा मैदानी गोल करून जपानच्या पुनरागमनाचे सर्व मार्ग बंद केले. शोटा यामादाने १५ व्या मिनिटाला पेनल्टी स्ट्रोकद्वारे जपानसाठी एकमेव गोल केला.

सामन्याच्या सुरुवातीला जपानी संघ आक्रमक दिसत होता आणि त्यांनी भारतीय बचावपटूंवर दबाव आणण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. सुरुवातीच्या काही मिनिटांत, भारतीय मिडफिल्ड आणि फॉरवर्ड लाईनमध्ये समन्वयाचा अभाव होता. नियमित खेळाडू मनदीप सिंगच्या अनुपस्थितीत, भारतीय आक्रमण सुरुवातीला थोडे कमकुवत दिसत होते. उपकर्णधार हार्दिक सिंगने मध्यभागी एकट्याने खूप मेहनत घेतली आणि अखेरीस, ११ व्या मिनिटाला, सुखजीत आणि अभिषेक यांच्यासोबत मिळून संघाचा पहिला गोल घडवून आणला.

जपानने सामना बरोबरीत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. पहिल्या क्वार्टरच्या शेवटच्या क्षणांमध्ये, त्यांना सलग पेनल्टी कॉर्नर मिळाले. अशाच एका घटनेदरम्यान, चेंडू भारतीय खेळाडू संजयच्या शरीराला लागल्याने जपानला पेनल्टी स्ट्रोक मिळाला, जो शोटा यामादाने गोलमध्ये रूपांतरित करून स्कोअर १-१ असा बरोबर केला. त्यानंतर जपानी बचावपटूंनी उत्कृष्ट मॅन-टू-मॅन मार्किंग दाखवत फॉरवर्ड्सना मोकळेपणाने खेळण्यापासून रोखले आणि मध्यंतरापर्यंत दोन्ही संघ १-१ असे बरोबरीत राहिले.

भारतीय संघ उत्कृष्ट फॉर्ममध्ये

भारतीय संघाने आपली रणनीती बदलली आणि खेळाचा वेग वाढवला. भारतीय खेळाडूंनी छोटे पास आणि उत्कृष्ट चालींनी जपानी बचाव भेदण्यास सुरुवात केली. शेवटच्या दोन क्वार्टर्समध्ये सलग तीन गोल करून भारताने सामना जपानच्या आवाक्याबाहेर नेला. आपल्या मागील साम न्यांमध्ये बांगलादेशला १३-० आणि चीनला ५-२ ने पराभूत केल्यानंतर, भारतीय संघ आता रविवारी आपल्या पुढील सामन्यात मलेशियाचा सामना करेल.

जागतिक कुस्ती स्पर्धा; भारताचा तिरंगा फडकला

मनीषा भनवालाने जिंकले 'सुवर्ण'

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय कुस्ती क्षेत्रासाठी अभिमानास्पद कामगिरी करत मनीषा भनवाला यांनी जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत ऐतिहासिक सुवर्णपदक पटकावले आहे. महिलांच्या ५९ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत अमेरिकेच्या एबिगेल नेट यांचा ८-६ असा पराभव करत मनीषा यांनी सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या विजयासह जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला कुस्तीपटू ठरल्या आहेत. त्यांच्या या यशामुळे भारतीय कुस्ती क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



मनीषा भनवाला या हरियाणातील जींद येथील रहिवासी असून त्यांचे कुटुंब शेती व्यवसायाशी संबंधित आहे. त्यांच्या कुटुंबात खेळांची परंपरा आहे. त्यांचे भाऊ रिंकू हे कबड्डीपटू आहेत, तर त्यांच्या वहिनी ममता सिहाग यादेखील कुस्तीपटू आहेत. कुटुंबातील खेळाचे वातावरण आणि गावातील क्रीडा संस्कृतीमुळे मनीषा यांना कुस्तीची आवड निर्माण झाली. कुस्तीच्या कारकिर्दीत त्यांनी विविध वजनी गटांमध्ये सहभाग घेतला. ६२ किलो, ६५ किलो आणि ५७ किलो अशा वेगवेगळ्या गटांमध्ये त्यांनी स्पर्धा केली. मात्र, २९व्या वर्षी त्यांनी ५९ किलो या ऑलिम्पिकमध्ये समाविष्ट नसलेल्या वजनी गटात जागतिक स्तरावर सर्वोच्च यश मिळवले.

मनीषा भनवाला यांच्या आयुष्यातील सर्वात कठीण काळ म्हणजे त्यांच्या वडिलांचे निधन. २०२२ मध्ये मंगोलियात होणाऱ्या आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी रवाना होण्याच्या आदल्या रात्री त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. त्यांचे वडील सुरेश हे एका जागरणासाठी गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी झोपेतच त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचे निधन झाले. या घटनेमुळे मनीषा पूर्णपणे खचल्या होत्या. त्यांना घराबाहेर पडण्याचीही इच्छा होत नव्हती. काही काळ त्यांनी कुस्ती सोडण्याचा विचारही केला.मात्र, वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या जिद्दीने त्यांनी पुन्हा कुस्तीच्या मैदानात पाऊल ठेवले.

राज्य शॉटगन नेमबाजीत चुरस

पुणे : राज्य शॉटगन स्पर्धेला शुक्रवारी स्पर्धापूर्व सरावाने सुरुवात झाली. शनिवारपासून ट्रॅप आणि स्कीट गटातील वर्चस्वासाठी चुरस असेल. सुरुवातीस होणाऱ्या ट्रॅप प्रकाराच्या स्पर्धेत एकूण बारा संघांत चुरस असेल. पुण्यातील बालेवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलातील शॉटगन शूटिंग रेंजवर ही स्पर्धा होणार आहे. त्यात अभिषेक पाटील, समरजित इंगळे, कृष्णा दाभाडे, राजकुवर इंगळे, अनिका मुसळे या गतविजेत्यांना आव्हान देण्यात येईल.



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन | सत्यमेव जयते | NATIONAL HEALTH MISSION MAHARASHTRA NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी राज्यव्यापी **१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२६**

'आरोग्य संवाद यात्रा'



- नवीन आरोग्य संस्थांचे लोकार्पण.
- नागरिकांशी थेट संवाद.
- महात्मा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) अंगीकृत रुग्णालयांना भेट.
- खाजगी डॉक्टरांशी संवाद.

०१ शासकीय आरोग्य संस्थांच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी व आढावा.

०२ ०३ ०४ ०५ ०६
- आरोग्य योजनांची जनजागृती.
- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) अंतर्गत तपासणी करण्यात आलेल्या शाळा/अंगणवाडी यांना भेट.

जिल्हा एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती, विधानसभा मतदारसंघ समिती, रुग्ण कल्याण समिती, जन आरोग्य समिती, ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती सदस्यांशी संवाद.

०७ रुग्ण गृहभेट व संवाद

पॅलिएटिव्ह केअर, सिकलसेल, संस्थात्मक प्रसूती झालेल्या माता, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत शस्त्रक्रिया झालेली बालके, क्षयरोग व कुष्ठरोग रुग्ण, जननी सुरक्षा योजना लाभार्थी, कर्करोग तपासणी मोहिमेतील रुग्ण, **महात्मा फुले जन आरोग्य योजना रुग्ण भेट.**

लोकसहभागातून घडवूया
माझं गाव आरोग्यसंपन्न गाव



देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री | एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री | सुनेत्रा अजित पवार, उपमुख्यमंत्री | प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | मेघना साकोरे - बोर्डीकर, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री

phd.maharashtra.gov.in

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)